फ्रांसचे चैथे गणतंत्र, पश्चिम जर्मनी, इटली, कॅनडा, श्रीलंका आणि जपान इत्यादी देशांमध्ये आघाडी सरकारे स्थापन झालेली आहेत. फ्रान्सच्या चैथ्या गणराज्यामध्ये (१९४६-५८) स्थापन झालेली सर्व मंत्रिमंडळे आघाडी सरकारचीच होती. पश्चिम जर्मनीमध्ये क्रिश्चियन डेमोक्रेट आणि सोशल डेमॉक्रेट यांनी मिळून शासन चालविले. बहुपक्षीय व्यवस्थेमुळे १९४८ पासून आजतागायत इटलीमध्ये अनेकवेळा आघाडी सरकारे स्थापन झालेली आहेत. कॅनडामध्ये देखिल आघाडी सरकारे स्थापन झालेली आहेत. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळालेल्या श्रीलंका सरकारची सुरूवातच आघाडीच्या सरकारने झाली होती. १९७७ मध्ये नविन संविधानाचा स्वीकार होईपर्यंत तेथे आघाड्यांचे शासन ही एक सामान्य स्थिती होती.[5]

स्वीडन मध्ये कधी-कधी सोशल डेमॉक्रेटिक पार्टी स्वबळावर सरकार स्थापन करते. परंतू जेव्हा ते शक्य नसते तेव्हा हा पक्ष इतर मध्यममार्गी उदारवादी पक्षांसोबत आघाडीचे सरकार स्थापन करतो. काही काळापूर्वी या सोशल डेमॉक्रेटिक पक्षाने साम्यवादी पक्षांसोबत आघाडी केली होती. १९७६ पासून १९८२ पर्यंत आणि १९९१ पासून १९९४ पर्यंत तेथे दक्षिणपंथी मध्यममार्गी पक्षांना आणि क्रिश्चियन डेमॉक्रेटिक पक्षांना स्थिर आघाडी करण्यामध्ये कोणत्याही अडचणी आल्या नाही.[6] नेदरलँड मध्ये सप्टेंबर १९८९ नंतर अनेक क्रिश्चियन डेमॉक्रेटिक पक्ष आणि दोन लिबरल पक्ष, अशा एकुण नऊ संसदीय पक्षांची स्थिर आघाडी कार्यरत होती. १९९४ नंतर वामपंथी आणि दक्षिणपंथी पक्षांचे जे 'नील-लोहित आघाडी' (Purple Coalition) तयार झाली, ती काही वर्षे चालली. अशीच एक आघाडी फिनलँड मध्येही होती.[7] याप्रकारे जगातील अनेक देशांमध्ये आघाडीच्या राजकारणाचे प्रयोग यशस्वी होत आहेत.

**निष्कर्ष**

साधारणतः ज्या देशांमध्ये अनेक लहान-लहान राजकीय पक्ष असतात आणि सभागृहात स्वबळावर बहुमत प्राप्त होईल असा कोणताही एखादा प्रभावशाली पक्ष असत नाही, तेथे म्हणजेच बहुपक्ष पध्दती असणाऱ्या व्यवस्थांमध्ये अनेक किंवा काही राजकीय पक्षांचे मिळून सरकार स्थापन करणे अपरिहार्य असते. यालाच आघाडीचे सरकार असे म्हणतात. द्विपक्ष पध्दती असणाऱ्या देशात देखिल तिसऱ्या राजकीय पक्षाच्या उदयामुळे आघाडी सरकार स्थापना होऊ शकते. उदा. इंग्लंडमध्ये द्विपक्ष पध्दती असल्यामुळे तेथे एकाच पक्षाचे सरकार स्थापन होत असते, परंतू तेथे तिसऱ्या अल्पशक्ति असणाऱ्या पक्षांचेही अस्तित्व असलयामुळे अपवादात्मक परिस्थितीत आघाडीच्या सरकारची स्थापना होते. दुसऱ्या महायुध्दानंतर पहिल्यांदा इंग्लंडमध्ये २०१० मध्ये अशाप्रकारचे आघाडी शासन स्थापन झाले होते. मात्र आघाडी सरकारे ही प्रामुख्याने बहुपक्षीय व्यवस्थेतच खऱ्या अर्थाने स्थापन होत असतात. आज जगातील बहुसंख्य राष्ट्रांमध्ये आघाडीची सरकारे स्थापन होण्यासाठी पुरक बहुपक्ष पध्दतीचा विकास होत असल्यामुळे भारत, इंग्लंड, फ्रांन्स, जर्मनी, जपान, कॅनडा, बेल्जियम, न्यूझिलंड, ऑस्ट्रेलिया, हंगेरी, चेकोस्लाविया, इस्त्राईल या देशांप्रमाणेच श्रीलंका, पाकिस्तान व नेपाळ या देशांमध्येही आघाडीची सरकारे स्थापन होत आहेत.

**संदर्भ सूची:**

१. व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास, (संपा.), १९८७, 'राज्यशास्त्र कोष', दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, पृ.२३२
२. गाबा ओम प्रकाश, २००७, 'विवेचनात्मक राजनीति विज्ञान कोष', मयूर पेपरबैक्स नौएडा, पृ.५४
३. सिंह बालेन्द्र, २०१२, 'भारतीय राजव्यवस्था में साझा सरकारे : चुनौतिया एवं संभावनाएँ आरबीएसए पब्लिशर्स, जयपुर, पृ.६
४. प्रतियोगिता दर्पण, हिंदी मासिक, जुलै २०१०, पृ.२१२६
५. फड़िया बी.एल., २०१३, 'भारतीय प्रशासन', साहित्यभवन पब्लिकेशन्स, आगरा, पृ.९३९
६. गाबा ओम प्रकाश, २००४, तुलनात्मक राजनीती की रुपरेखा, मयूर पेपरबैक्स नौएडा, पृ.१४४
७. कित्ता, पृ.१४५

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule



PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - II**
**Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development**

October 2020










**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor :Prin. Dr. R K Pardeshi**

Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**Co-Editor : Dr. S. V. Tathe**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal ISSN : 2229-4929
''Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development'' RNI : MAHMAR - 36829-2010 October – 2020

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

## October – 2020

## Special Issue-II

## On

## *Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development*

**Chief Editor**

**Dr. Nanasaheb Suryawanshi**

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR, DIST. LATUR, -433515, MAHARASHTRA

**Executive Editor**

**Prin. Dr. R. K. Pardeshi**

Principal

Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi

Dist. Jalna

**Co-Editor**

Dr. S.V. Tathe

**Editorial Board**

Dr. R.S Dhaye

Dr. R.K. Raut

Dr. G.R. Awachar

Prof. S.V. Samag

**Published by-** Prin. Dr. R K Pardeshi, Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers .**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal, ISSN: 2229-4929, October 2020
Special Issue "Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development"

# मोदींच्या नेतृत्वातील रालोआ सरकार : कलम ३७० ची गच्छती

**प्रा. शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला
व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री, ता. साक्री जि. धुळे (महाराष्ट्र)

**सारांश (Abstract)**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात 2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला दुसऱ्यांदा बहुमत प्राप्त झाले आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार पुन्हा सत्तारूढ झालेया सरकारवर मोदी व भाजपचेच संपूर्ण वर्चस्व असल्यामुळे भाजपने आपल्या . त्यास विरोध क .जाहीरनाम्यातील आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी पावले उचललीरण्याचे बळ विरोधकांकडे नसल्यामुळे याविरोधात कोणतीही ठोस कृती ते करू शकत नाही याचे भान भाजपला होतेमंत्रिमंडळात गृहमंत्रीपदी अमित शहा यांची निवड झाली तेव्हाच . काश्मीर बाबत या सरकारकडून काही तरी कठोर निर्णय घेतला जाऊ शकतो असा अंदाज अनेकांनी व्यक्त केला.जम्मू होतातो खरा . ठरवत ऑगस्ट2019 मध्ये भाजप सरकारने काश्मीर राज्याला स्वायत्तता देणारे राज्यघटनेतील कलम 370 रद्दबादल करून जम्मू-काश्मीर दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन करण्यासाठी दोन विधेयके संसदेमध्ये सादर केली व त्यांना दोन्ही-काश्मीर राज्याचे जम्मू सभागृहातील बहुमताच्या जोरावर मंजूर करून घेतले .या प्रकारे भाजपने आपल्या जाहीरनाम्यातील मूळ कार्यक्रमाची पूर्तता केली . परंतु हा भारताचा अंतर्गत प्रश्न असल्याचे भारत .जम्मू काश्मीर व पाकिस्तानसह आंतरराष्ट्रीय स्तरावर यासंबंधी प्रतिक्रिया उमटल्या .सरकारने स्पष्ट केले

**प्रस्तावना**

२०१४ व २०१९ च्या दोनही सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत भाजपला नरेंद्र मोदी यांच्या नावावर स्वबळावर पूर्ण बहुमत मिळाल्यामुळे रालोआ शासनावर केवळ भाजप आणि नरेंद्र मोदी यांचेच एकहाती वर्चस्व प्रस्थपित झाले व रालोआ'मधील इतर घटकपक्षांना फारसे महत्व उरले नाही. पूर्ण बहुमत मिळाल्यामुळे भाजपला आपल्या जाहीरनाम्यातील विषयांना धसास लावण्यास वाव मिळाला आणि भाजपने कलम ३७० रद्द करण्याचे आपले उद्दिष्ट पूर्णत्वास नेले. त्याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**जम्मू-काश्मीर'च्या स्वायत्ततेची पार्श्वभूमी व त्यासंबधीचा विवाद**

भारत – पाकिस्तान फाळणीनंतर ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तानने काश्मीरचा ताबा घेण्यासाठी घुसखोर पाठवल्यावर काश्मीरचे महाराज हरिसिंग यांनी भारताकडे लष्करी मदत मागितली. तेंव्हा भारत सरकारने भारतीय संघराज्यात विलीन होण्याच्या प्रस्तावावर महाराज हरिसिंग यांची स्वाक्षरी घेतली. परिस्थिती सुधारल्यावर जम्मू-काश्मीरच्या भविष्याचा निर्णय जनमत चाचणीद्वारे करण्यात येईल असेही ठरले आणि तोपर्यंत भारत सरकार जम्मू-काश्मीरची स्वायत्तता टिकविण्यासाठी तयार झाले. त्यासाठी भारताच्या घटनेत कलम ३७० ची तरतूद करून जम्मू-काश्मीरच्या स्वायत्ततेला घटनात्मक दर्जा देण्यात आला.[१] मात्र जम्मू-काश्मीरची परिस्थिती आजपर्यंत सुधारली नाही व काश्मीरच्या दर्जाबद्दल भारतात नेहमीच वाद होत राहिलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० अन्वये जम्मू-काश्मीर'ला विशेष दर्जा प्राप्त झालेला असुन या राज्याला स्वतःची स्वतंत्र राज्यघटना आहे व भारतीय संविधानाच्या सर्व तरतुदी यास लागू होत नाहीत. भारताच्या संसदेद्वारे संमत केलेले कायदे या राज्याच्या परवानगीनंतरच तेथे लागू करता येऊ शकतात. यामुळे दोन विरोधी प्रतिक्रिया निर्माण झाल्या. जम्मू-काश्मीर बाहेरच्या एका गटाच्या मते, कलम ३७० नुसार विशेष दर्जा दिल्यामुळे जम्मू-काश्मीर भारतास पूर्णपणे जोडले गेले नाही. म्हणून कलम ३७० रद्द केले पाहिजे, तर काश्मिरी जनतेच्या मते, ३७० व्या कलमाने दिलेली स्वायत्तता पुरेशी नाही. तसेच त्यांच्या तीन मुख्य तक्रारी आहेत. पहिली, जम्मू-काश्मीर मधील परिस्थिती सामान्य झाल्यावर विलीनीकरणाच्या प्रश्नावर जनमत चाचणी घेण्याचे भारत सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही. दुसरे, कलम ३७० नुसार देण्यात आलेला विशेष दर्जा पूर्णपणे अंमलात आलेला नाही व तिसरी तक्रार म्हणजे भारतात इतर भागात ज्याप्रमाणे लोकशाहीची अंमलबजावणी करण्यात येते, त्याप्रमाणे संस्थात्मक लोकशाही व्यवहार जम्मू-काश्मीरमध्ये होत नाही.[२] असे परस्परविरोधी दावे-प्रतिदावे दोन्ही पक्ष करतात.

**कलम - ३७० ची गच्छती आणि जम्मू-काश्मीर राज्याचे विभाजन**

मोदी (रालोआ) सरकारने जम्मू-काश्मीरला विषेश राज्याचा दर्जा देणारे कलम ३७० वे रद्द करण्याचा ऐतिहासिक व धाडसी निर्णय घेतल्यामुळे जम्मू-काश्मीर मधील स्वतंत्र राज्यघटना, स्वतंत्र ध्वज, संपत्ती वाटपातील वेगळे नियम, मालमत्ता खरेदीवरील बंदी अशा तरतूदी रद्द ठरल्या आहेत. कोणत्याही राज्याला दिलेला विषेश दर्जा, कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा विषेशाधिकार राष्ट्रपतींना राज्यघटनेतील कमल २ आणि ३ नुसार आहे. त्याचा वापर राष्ट्रपतींनी केला आणि एक अधिसुचना जारी करून कलम ३७० रद्दबादल



PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ठरवले. तसेच ३७० व्या कलमाचा आधार घेऊन १९५४ मध्ये लागू केलेले 'कलम ३५ (अ)' देखिल आता घटनाबाह्य ठरले आहे.[३] भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी दि.१४ मे १९५४ रोजी दिलेल्या आदेशाद्वारे कलम ३५ (अ) लागू करण्यात आले होते व ते कलम ३७० चाच भाग होता.[४]

गृहमंत्री अमित शहा यांनी दि५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू-काश्मीरच्या संदर्भातील कलम ३७० रद्द करण्यासह, राज्याची पुनर्रचना करण्याचे दोन संकल्प आणि दोन विधेयके मांडली यापैकी 'कलम ३७०' व त्याअंतर्गत येणारे 'कलम ३५ (अ)' रद्द करण्याच्या विधेयकावर आवाजी मतदानाने शिक्कामोर्तब झाले.[५] या विधेयकावरील चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उत्तर देतांना गृहमंत्री अमित शहा म्हणले, "हे कमल रद्द झाल्याने विषशतः काश्मीरसाठी विकासाची नवी दारे उघडतील. याबाबत काश्मीरमधील युवकांना मी आश्वस्त करू इच्छितो की, आगामी पाच वर्षात जम्मू-काश्मीर देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे राज्य बनेल. कलम ३७० रद्द झाल्याने आता जम्मू-काश्मीर राज्य हे विधानसभेच्या निवडणूका होईपर्यंत केंद्रशासित प्रदेश बनेल. राज्यातील परिस्थिती सामान्य होताक्षणी जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूका घेतल्या जातील व हा केंद्रशासित प्रदेश राहणार नाही."[६] असे आश्वासनही शहा यांनी दिले.

राज्यसभेत सदर विधेयके सादर झाल्यावर त्याविरोधात मेहबुबा मुफ्ती यांच्या 'पीडीपी' पक्षाचे 'नजीर अहमद लावे' या खासदाराने भर सभागृहात राज्यघटना फाडून तिचे तुकडे हवेत भिरकावले. तसेच 'फैयाज अहमद मीर' यांनाही स्वतःचे कपडे फाडून तीव्र निषेध नोंदवला. या दोघांना राज्यसभेचे अध्यक्ष वेंकय्या नायडू यांनी मार्शलकरवी सभागृहाबाहेर काढले[७] 'रालोआ'सह बसपा, आप, वायएसआर कॉंग्रेस, बिजू जनता दल, अन्ना द्रमुक, तेलगू देसम या विरोधी पक्षांनी विधेयकांच्या बाजूने मतदान केले, तर तृणमूल कॉंग्रेसने सभात्याग केला. कॉंग्रेस, द्रमुक, डावे, जेडीयू यांनी या विधेयकांना विरोध केला. एमआयएम'ने मात्र या प्रस्तावाचा विरोध केला नाही.

जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा प्रदान करणारे कलम ३७० रद्द करण्यासाठीचे व जम्मू-काश्मीरची पुनर्रचना करण्याशी संबधित विधेयकांवर राज्यसभा पाठोपाठ लोकसभेत देखील दि६ ऑगस्ट २०१९ रोजी बहुमताची मोहोर उमटली. लोकसभेत कलम ३७० रद्द करणाऱ्या ऐतिहासिक विधेयकाच्या बाजूने ३७० तर विरोधात ७० मते पडली. तर जम्मु आणि काश्मीर राज्यपुनर्रचना विधेयकाच्या बाजुने ३५१ तर विरोधात ७२ मते पडली. या विधेयकांच्या मंजुरीसाठी गृहमंत्री अमित शहा यांनी जोरदार युक्तीवाद केला. राज्यसभेत ही विधेयके १२५ विरुध्द ६१ मतांनी संमत झाल्यानंतर मोदी सरकारचे प्रचंड बहुमत असलेल्या लोकसभेत गृहमंत्री शहा यांनी ही विधयके मांडली होती. "कलम ३७० समाप्त होईल, तो क्षण देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल" अशी भावना शहा यांनी ही विधेयके मांडतांना व्यक्त केली होती[८] राज्यसभेप्रमाणेच लोकसभेतही कलम ३७० वरील चर्चा वादळी ठरली. चर्चेच्या सुरूवातीलाच तृणमूल कॉंग्रेसने प्रस्ताव व फेरचनेला विरोध करत सभात्याग केला. कॉंग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि डाव्या पक्षांनी केंद्र सरकारच्या प्रस्ताव विधयेकांना विरोध केला.[९] केंद्रसरकारने जम्मू-काश्मीरचे विभाजन करून जम्मू-काश्मीर आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेश करण्याचा निर्णय घेतल्यावर त्याचा निषेध करतांना नॅशनल कॉन्फरन्स'चे नेते फारूक अब्दूल्ला म्हणाले की, "सरकारचा हा निर्णय लोकशाही मार्गाने घेतलेला नसून हुकुमशाही मार्गाने घेतलेला आहे. जम्मू-काश्मीरची दारे उर्वरित देशासाठी ज्याक्षणी खुली होतील, त्याक्षणी आमचे नागरिक बेघर होतील."[१०] अशी भावना त्यांनी व्यक्त केली. जनसंघ आणि त्यानंतर भाजपने गेली सत्तर वर्षे कलम ३७० विरोधात राजकारण केले. या पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात सातत्याने हे कलम रद्द करण्याची ग्वाही दिली जात होती. त्या ग्वाहीचीच पूर्तता नरेंद्र मोदी यांच्या सरकारने अखेर केली.[११] भाजप दुसऱ्यांदा बहुमतानिशी सत्तेवर आल्यावर नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात अमित शहा यांचा गृहमंत्री म्हणून समावेश झाल्यावर हे सरकार काश्मीर संदर्भात काही महत्वाचे निर्णय घेईल असा अंदाज व्यक्त केला जात होता. जम्मू-काश्मीर राज्याला घटनेने दिलेला विशेष दर्जा संपविणे हा भाजपच्या जाहिरनाम्याच भाग होता. जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी हे 'एक देश में दो विधान, नहीं चलेंगे' असे सांगत होते. त्याच परंपरेतील व आक्रमक व्यूहनीतीसाठी प्रसिध्द असलेल्या मोदी - शहा या जोडगोळीने ३७० कमल रद्द करण्याचे पाऊल उचलणे, हे काही फार मोठे आश्चर्य नाही.[१२]

**निष्कर्ष**

२०१९ मध्ये पूर्ण बहुमतानिशी केंद्रात सत्तेवर आलेल्या भाजपने अत्यंत चतुराईने जम्मू-काश्मिर'ला विशेष दर्जा बहाल करणारे राज्यघटनेतील ३७० वे कलम रद्द करण्यासाठी सुरुवातीला राष्ट्रपतींचा अध्यादेश काढुन नंतर त्यास लोकसभा व राज्यसभेत मंजुरी मिळवली. तसेच संसदेच्या दोन्ही सदनातील बहुमताच्या बळावर जम्मू-काश्मिर राज्याचे जम्मू-काश्मिर व लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन करण्यासंबधीच्या विधेयकास देखिल मंजूर करून घेतले. यामुळे जम्मू-काश्मिर राज्याचे भारतीय संघराज्यात खऱ्या अर्थाने विलीनीकरण होण्याची प्रक्रिया सुरु झाली असुन भाजप (रालोआ) सरकारने पाकिस्तानला देखील याद्वारे मोठा शह दिला आहे. मात्र हे निर्णय ज्याप्रदेशासाठी घेतला गेला तेथील नेत्यांना याबाबत विश्वासात घेतले गेले नाही हे नैतिकदृष्ट्या चुकीचे असले तरी त्याकडे एक रणनीतीचा भाग म्हणून पाहावे लागेल.



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

**संदर्भ सूची :**


१. दातार अभय व घोटाळे विवेक (अनु.), २०१२, 'स्वातंत्र्यापासूनचे भारताचे राजकारण' प्रगत अध्ययन केंद्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ.१४६

२. कित्ता, पृ.१४१,१४२

३. लोकसत्ता, दि. ६ ऑगस्ट २०१९, पृ.१

४. महाराष्ट्र टाइम्स, दि. ६ ऑगस्ट २०१९, पृ.२

५. कित्ता, पृ.१

६. सकाळ, दि. ६ ऑगस्ट २०१९, पृ.१,८

७. कित्ता, पृ.२

८. महाराष्ट्र टाइम्स, दि. ७ ऑगस्ट २०१९, पृ.१,१०

९. लोकसत्ता, दि. ७ ऑगस्ट २०१९, पृ.२

१०. उपरोक्त क्र.८, पृ.१४

११. उपरोक्त क्र.३, पृ.१

१२. उपरोक्त क्र.६, पृ.४


PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - II**
**Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development**

October 2020










**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor :Prin. Dr. R K Pardeshi**

Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**Co-Editor : Dr. S. V. Tathe**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL
## October – 2020
## Special Issue-II
## On
## *Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR, DIST. LATUR, -433515, MAHARASHTRA

**Executive Editor**
**Prin. Dr. R. K. Pardeshi**
Principal
Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi
Dist. Jalna

**Co-Editor**
Dr. S.V. Tathe

**Editorial Board**
Dr. R.S Dhaye
Dr. R.K. Raut
Dr. G.R. Awachar
Prof. S.V. Samag

**Published by-** Prin. Dr. R K Pardeshi, Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers .**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule ★

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

# महाविकास आघाडी शासन : शिवसेनेचे वर्चस्ववादी राजकारण

प्रा. शरद बाबुराव सोनवणे[1] अनिता महादेव हुसे[2]
1सहाय्यक प्राध्यापक - राज्यशास्त्र विभाग, श्रीमती बिमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान, महाविद्यालय, साक्री. जि.धुळे
2संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद (महाराष्ट्र)

**सारांश (Abstract)**

२०१४ नंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पुन्हा बहुमत स्पष्ट बहुमत प्राप्त झाल्यावर भाजप'ची एकपक्ष वर्चस्व पद्धतीकडे वाटचाल सुरु झाली व केंद्रातील रालोआ सरकारवर पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपचेच एकहाती वर्चस्व राहिले. परिणामी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांना दुर्लक्षित करून स्वतःची शक्ती वाढवण्याचे विस्तारवादी धोरण भाजपने अंगिकारले. महाराष्ट्रात शिवसेना हा प्रादेशिक पक्ष २०१४ मध्येच भाजपच्या या रणनीतीचा बळी ठरला. मोदी लाटेत स्वबळावर महाराष्ट्रात सत्ता संपादन करता येईल या अंदाजातून भाजपने सेनेसोबतची आपली जुनी युती तोडून स्वबळावर निवडणूक लढवली, मात्र सत्तास्थापनेसाठी भाजपला सेनेची मदत घ्यावी लागली. पुढे २०१९ मध्ये हे दोन्ही पक्ष लोकसभा व विधानसभा निवडणुका एकत्रितपणे लढले. निवडणूक निकालानंतर कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नसले तरी सेना-भाजप युतीला जनमताचा कौल मिळाला होता. मात्र शिवसेनेने भाजपकडे अधीच वर्षे मुख्यमंत्री पदाची मागणी करून सौदेबाजीचे राजकारण सुरु केले. मात्र, भाजपने त्यास नकार देऊन केंद्रातील सत्तेच्या बळावर सेनेला शह देण्याचा प्रयत्न केला. मात्र, अखेरीस शिवसेनेने राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस या राष्ट्रीय पक्षांबरोबर किमान समान कार्यक्रमाच्या आधारावर महाविकास आघाडीचे शासन स्थापन केले आणि राज्याच्या राजकारणातील आपल्या प्रभावशिलतेस अधोरेखित केले.

**प्रस्तावना**

शिवसेना हा महाराष्ट्रातील एक प्रभावशाली प्रादेशिक पक्ष असुन केंद्रातील भाजप'प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी'चा तो सुरुवातीपासूनचा घटक पक्ष राहिलेला आहे. महाराष्ट्रात तर १९८९ पासून सेना-भाजप युती अस्तित्वात आलेली आहे. २०१४ मध्ये मोदी लाटेमुळे केंद्रात प्रथमच भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आणि देशभर भाजपची विजयी पताका फडकू लागली. यानंतर भाजपने आपल्या मित्रपक्षांना देखील गिळंकृत करण्याचे धोरण स्वीकारले. भाजपच्या या रणनीतीमुळे २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीपासून शिवसेनेला सतत दुय्यम आणि अपमानास्पद वागणूक मिळाली. मात्र २०१९ च्या महाराष्ट्र विधासभा निवडणूक निकालानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत प्रभावी राजकारण करत शिवसेनेने भाजपला सत्तेपासून रोखले तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस या पक्षांना बरोबर घेऊन किमान समान कार्यक्रमाच्या आधारावर महाविकास आघाडीचे शासन स्थापन केले. शिवसेना या महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षाच्या वर्चस्ववादी राजकारणाचा वेध प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे

**आघाडी शासन : अर्थ व स्वरूप**

'आघाडी' हा शब्द 'कोलीशन' या इंग्रजी शब्दाचा मराठी भाषेतील पर्यायवाचक षब्द असून 'कोलीशन' या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील 'कोलेसर' या शब्दापासून झालेली आहे. त्याचा अर्थ 'एकत्रित येणे', 'एका गटात, सामिल होणे' किंवा 'एकमेकांसोबत असणे' असा होतो. इंग्रजी भाषेतील 'कोलीशन' शब्दाचे उपरोक्त सर्व अर्थ घेतले जातात.[१] इंग्रजी भाषेत 'कोलीशन' या शब्दासाठी पर्यायी शब्द म्हणून 'अलायन्स' या शब्दाचा वापर केला जातो आणि मराठी भाषेत या दोन्ही शब्दांसाठी संयोग, युती, आघाडी, एकी, मैत्रीकरार असे पर्यायवाचक शब्द आहेत. त्यावरूनच दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या सरकारसाठी संमिश्र सरकार, गठबंधन सरकार, आघाडी सरकार, युती सरकार किंवा मिश्रित सरकार असे शब्दप्रयोग वापरले जातात.

संसदीय शासनव्यवस्थेत ज्या पक्षाला कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहात पूर्ण बहूमत प्राप्त होते, त्याचे सरकार स्थापन होते. जर विधिमंडळात कोणत्याच पक्षाला पुर्ण बहुमत मिळाले नसेल तर समान विचारसरणीचे काही पक्ष मिळुन आपले बहुमत सिध्द करू शकतात आणि एखाद्या सामान्य कार्यक्रमाच्या आधारे सरकार चालवू शकतात. यालाच आघाडीचे किंवा संमिश्र सरकार असे म्हणतात.[२] याठिकाणी आणखी एक बाब लक्षात घेणे गरजेचे आहे; ती म्हणजे, आघाडी सरकारमध्ये जे घटकपक्ष सामिल होतात ते सरकार स्थापनेसाठी एकत्र आले असले तरी आपले वेगळेपण कायम ठेवत असतात. याचा अर्थ, आघाडी किंवा संमिश्र सरकार स्थापन करणाऱ्या राजकीय पक्षांचा विलय होत नसतो. कोणताही घटकपक्ष कधीही आपला पाठिंबा काढुन घेऊन आघाडी सरकारमधुन बाहेर पडू शकतो. कधी-कधी असेही होते, की एखादा राजकीय पक्ष मंत्रिमंडळात सहभागी न होता आघाडीच्या सरकारला पाठिंबा देतो.

ऑग, या अभ्यासकाच्या मतानुसार, आघाडी सरकार हे अशा एका सहयोगी व्यवस्थेचे नाव आहे, की ज्यामध्ये सरकारची स्थापना किंवा मंत्रिमंडळाच्या निर्मितीसाठी विभिन्न राजकीय पक्षांचे सदस्य एकत्र येतात. आघाडी सरकार हे काही तात्कालिक आणि विशिष्ट हेतूसाठी उदयाला आलेल्या राजकीय समुदायांची किंवा शक्तींची युती असते. सरकारची स्थापना करून ते टिकविण्यासाठी राजकीय पक्षांचा हा संयोग झालेला असतो. ज्या राजकीय पक्षांच्या सहकार्याने असे आघाडी सरकार स्थापन झालेले असते, त्या पक्षांचे एका मूलभूत राजकीय कार्यक्रमावर एकमत झालेले असते.[३] या आघाडी सरकारमध्ये कमीत-कमी दोन राजकीय पक्ष सहभागी झालेले असतात. आघाडीमधील घटकपक्षांची संख्या 3, 5, 8, 10 किंवा 15 देखिल असू शकते. परंतू किमान दोन पक्ष सरकारमध्ये भागीदार असल्यावरच त्यास आघाडी सरकार म्हणता येते.[४]



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**भाजपची एकपक्षीय वर्चस्वाकडे वाटचाल : मित्रपक्षांकडे दुर्लक्ष**

महाराष्ट्राच्या राजकारणात १९८९ पासून भाजप व शिवसेना यांची विचारधारेवर आधारित युती (आघाडी) आकाराला आली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्यावेळी ही युती तुटली आणि दोघे पक्ष स्वतंत्रपणे निवडणुका लढले. निवडणुकीनंतर पुनः दोन्ही पक्षांनी युतीचे (आघाडी) सरकार स्थापन केले व त्यांनी आपला पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण केला. २०१९ ची लोकसभा व विधानसभा निवडणूक भाजप व शिवसेना यांनी एकत्रितपणे लढविली व लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी'ला प्रचंड बहुमत मिळाले. एकट्या भाजप'ला ३०३ जागा मिळाल्या. त्यामुळे नरेंद्र मोदी व भाजपचे पूर्ण वर्चस्व असलेल्या केंद्रातील रालोआ सरकार'मध्ये इतर घटकपक्षांप्रमाणेच शिवसेनेलाही फारसे महत्व मिळाले नाही.

**महाराष्ट्रातील सत्तानाट्य आणि राज्यपालाची भूमिका**

२१ ऑक्टोबर २०१९ रोजी झालेली महाराष्ट्र विधानसभा निवडणूक भाजप व शिवसेना एकत्रित लढले. "२४ ऑक्टोबरला निकाल जाहीर झाले व कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. भाजप'ला १०५ जागा मिळाल्या तर शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसला ५४ व कॉंग्रेसला ४४ जागा मिळाल्या. अशा परिस्थितीत शिवसेनेने मुख्यमंत्रीपदाची मागणी केल्यामुळे शिवसेना-भाजप युती तुटली"[४] व राज्यपालांनी निकाल जाहीर झाल्यानंतर जवळजवळ १५ दिवसांनी सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपला सरकार स्थापनेसाठी ७२ तासांची मुदत दिली. त्यानंतर शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेसला २४ तासाची मुदत दिली, परंतु दिलेल्या वेळेत कोणताच पक्ष आपल्याकडे आवश्यक बहुमताचा पाठिंबा असल्याचे पत्र राज्यपालाला देऊ न शकल्यामुळे राज्यपालांनी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची केंद्र शासनाकडे शिफारस केली. दरम्यानच्या काळात शिवसेना व भाजप यांच्यातील वाकयुद्ध वाढतच गेले, यामध्ये शिवसेना नेते संजय राऊत यांनी सेनेची बाजु भक्कमपणे पुढे रेटली. परंतु भाजप काही शिवसेनेला अडीच वर्षांसाठी मुख्यमंत्रीपद देण्यास तयार न झाल्यामुळे शिवसेनेने आपले सर्व पर्याय खुले असल्याचे सांगत कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या सोबतीने महाविकास आघाडीचे शासन स्थापन करण्याचे संकेत दिले. त्यादृष्टीने तिन्ही पक्षांची बोलनी सुरु होऊन वाटाघाटी झाल्या आणि मुख्यमंत्री पदासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नावावर सहमती झाली. "२२ नोव्हेंबर २०१९ रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत तिन्ही पक्षांनी २३ तारखेला राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा करणार असल्याची घोषणा केली. इकडे सत्तास्थापनेच्या वाटाघाटी पूर्ण होत नाही तोवरच देवेंद्र फडणवीस ह्यांनी २२ तारखेच्या रात्री ९:३० वाजता दिल्लीला आपण सरकार स्थापन करणार असल्याचा निर्णय कळवला व रात्री ११:३० वाजता राज्यपालांनी राष्ट्रपती राजवट उठवण्याची शिफारस केली आणि पंतप्रधानांनी मंत्रिमंडळाची बैठक न घेता (Union Government's Transaction of Business Rules मधील) नियम १२ चा फायदा घेत राष्ट्रपतींना महाराष्ट्रातील राष्ट्रपती राजवट उठविण्याचे निर्देश दिले. २३ नोव्हेंबरच्या पहाटे ५:४५ वाजता महाराष्ट्रातील राष्ट्रपती राजवट उठविण्यात येऊन सकाळी ७:४५ वाजता देवेंद्र फडणवीस व अजित पवार ह्यांनी अनुक्रमे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून शपथग्रहण केली अजित पवार ह्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ५४ आमदारांच्या सह्यांचा कागद राज्यपालांना सदर केला अर्थात पुढे शरद पवार यांनी अजित पवार ह्यांनी हे पत्र पक्षाच्या निर्णयाविरुद्ध दिले असल्याचा खुलासा केला."[५] अर्थातच पुढील तीन-चार दिवसातच फडणवीस यांना राजीनामा द्यावा लागला. मात्र या सत्तानाट्यामुळे भाजप व राज्यपालाच्या भूमिकेवर सर्वस्तरातून टीका झाली, तर अनेकांना शिवसेनेची भूमिका देखील आवडली नव्हती.

**महाराष्ट्रातील महाविकासआघाडी शासन : शिवसेनेचे मध्यवर्ती स्थान**

महाराष्ट्रातील सत्तानाट्य प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेल्यानंतर अखेरीस उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस या तीन पक्षांनी किमान समान कार्यक्रमाच्या आधारावर महाविकास आघाडीचे शासन स्थापन झाले. शिवसेना पक्षप्रमुख "श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी २८ नोव्हेंबर २०१९ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता शिवाजी पार्क येथील शिवतीर्थावर महाराष्ट्राचे २९ वे मुख्यमंत्री म्हणून प्रचंड संख्येने जमलेल्या जनसमुदायासमोर शपथ घेतली आणि महाराष्ट्रात नव्या पर्वाचा प्रारंभ झाला."[७] याच कार्यक्रमात एकनाथ शिंदे, सुभाष देसाई, जयंत पाटील, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात आणि नितीन राऊत यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. शपथविधीच्या या सोहळ्यालाराज्य आणि देशपातळीवरचे दिग्गज नेते उपस्थित होते.[८] त्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते अहमद पटेल, कपिल सिब्बल, मल्लिकार्जुन खरगे, अभिषेक मनु सिंघवी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री कमलनाथ, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, द्रमुक नेते एम. स्टॅलिन, टी.आर.बालू, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील व उद्योगपती मुकेश अंबानी आदी मान्यवर उपस्थित होते[९]

या नव्या आघाडीच्या राजकारणावर अनेकांनी टीका केली, परंतु ज्येष्ठ राजकीय विश्लेषक सुहास पळशीकर यांनी म्हटले की, "विभिन्न विचारांच्या पक्षांनी एकत्र येऊन मर्यादित उद्दिष्ट ठेऊन सरकार चालवणे हे काही आक्रित नाही आणि प.बंगाल, केरळपासून याचा अनुभव आलेला आहे. तसेच अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात राष्ट्रीय लोकशाही आघाडी चालवतांना शिवसेना वगळली तर इतर कोणत्याही घटकपक्षाचा भाजप'च्या काही मुलभूत कार्यक्रमांना पाठिंबा नव्हता, तरीही ती आघाडी झाली, चालली आणि टिकली. थोडक्यात, राजकीय सोय म्हणून आणि राजकीय परिपक्वता म्हणूनही अशा मर्यादित सहमतीच्या आघाड्या झालेल्या आपण पाहिलेले आहे."[१०] मुळात हा कोणत्याही राजकीय पक्षांच्या युतीत नैसर्गिक असते, ती फक्त सत्ताकांक्षा ! फक्त तीच कोणत्याही दोन पक्षांना बांधून



PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

ठेऊ शकते. सत्ता मिळविण्यासाठी किंवा सत्तेला विरोध करण्यासाठी युती होत राहतात. त्या युतीला लोकांनी समर्थन दिले, तर ती युती टिकते नाहीतर कोलमडते."[११] या प्रक्रियेला कोणताच पक्ष व आघाडी अपवाद नाही.

**निष्कर्ष**

२०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकित कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरी शिवसेना–भाजप युतीला स्पष्ट जनादेश मिळाला. मात्र निवडणूक निकालामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा शिवसेनेने फायदा घेण्याचे ठरवुन अर्धीच वर्षे मुख्यमंत्रीपदाची मागणी भाजपकडे केली. भाजपने त्यास नकार देताच शिवसेनेने मुख्यमंत्री शिवसेनेचाच ही भूमिका घेवून भाजप या राष्ट्रीय पक्षाला वेठीस धरले आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस या राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांबरोबर सत्तास्थापनेसाठी बोलणी सुरु केली. त्याचवेळी भाजपने सेनेला शह देऊन सत्तास्थापनेचा प्रयत्न केला, मात्र तो फारसा यशस्वी झाला नाही. अखेरीस महाराष्ट्रातील या चौरंगी सत्तास्पर्धेत शिवसेना हा प्रादेशिक पक्ष आपले वर्चस्ववादी राजकारण पुढे रेटण्यात सफल ठरला. आरंभीपासून भाजप'प्रणित रालोआ'चा घटकपक्ष राहिलेल्या शिवसेनेने रालोआ'मधून बाहेर पडून भाजप'ला दिलेल्या धक्क्यामुळे पुढे जेडीयू व अकाली दल या भाजपच्या मित्रपक्षांनी देखील आपल्या मागण्यांसाठी दबावतंत्राचा वापर सुरु केल्याचे दिसते २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालानंतर शिवसेनेने प्रभावी भूमिका बजावून प्रादेशिक राजकारणातील आपले वर्चस्व अधोरेखित केल्याचे दिसते.

**संदर्भ सूची :**

१. फड़िया बी.एल., १९८४, 'स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया' रेडिएन्ट पब्लिशर्स, न्यू दिल्ली, पृ.४०१
२. गाबा ओम प्रकाश, २००४, 'तुलनात्मक राजनीति की रुपरेखा', मयूर पेपरबैक्स, नौएडा, पृ.१२७
३. सुभाष काश्यप व विश्वप्रकाश गुप्त, २०११, 'राजनीति कोष', हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, पृ.५७
४. फड़िया बी.एल., २०१३, 'भारतीय प्रशासन', साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा,पृ.९३७
५. परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ डिसेंबर २०१९, पृ.५
६. कित्ता, पृ.५
७. लोकराज्य, नोव्हेंबर-डिसेंबर २०१९, पृ.५
८. कित्ता, पृ.८
९. महाराष्ट्र टाइम्स, दि.२९ नोव्हेंबर २०१९, पृ.३
१०. चित्रलेखा, २ डिसेंबर २०१९, पृ.१८
११. कित्ता, पृ.१९

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College, Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - III**
**Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development**

October 2020










**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor :Prin. Dr. R K Pardeshi**

Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**Co-Editor : Dr. S. V. Tathe**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL
## October – 2020
## Special Issue-III
## On
## *Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR, DIST. LATUR, -433515, MAHARASHTRA

**Executive Editor**
**Prin. Dr. R. K. Pardeshi**
Principal
Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi
Dist. Jalna

**Co-Editor**
Dr. S.V. Tathe

**Editorial Board**
Dr. R.S Dhaye
Dr. R.K. Raut
Dr. G.R. Awachar
Prof. S.V. Samag

**Published by-** Prin. Dr. R K Pardeshi, Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers .**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal, ISSN: 2229-4929, October- 2020
Special Issue "Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development"

# शिरोमणी अकाली दलाच्या राजकारणाची बदलती दिशा

प्रा. शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री. ता. साक्री जि. धुळे (महाराष्ट्र)
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**प्रस्तावना**

शिरोमणी अकाली दल हा पंजाब राज्यातील प्रादेशिक पक्ष असुन तो शिखांची सामाजिक व राजकीय संस्था आहे या पक्षाच्या संस्थापकांमध्ये मास्टर तारासिंग, संत फत्तेसिंह संत चानन सिंह आणि न्या. गुरुनाम सिंह यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात शीख गुरुद्वारांमध्ये धार्मिक सुधारणा करण्यासाठी स्थापन झालेल्या या पक्षाने स्वातंत्र्योत्तर काळातपंजाब राज्याच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावण्यास सुरुवात करून पंजाबच्या व देशाच्या राजकारणात पक्षाने आपला प्रभाव निर्माण केला आहे. काही दिवसांपूर्वी अकाली दलाने केंद्र सरकारने आणलेल्या कृषी विधेयकावर आक्षेप घेत रालोआ'मधून बाहेर पडून, भाजप'शी फारकत घेण्याचा निर्णय घेतला. शिरोमणी अकाली दलाचा हा निर्णय राजकीय रणनीतीचा भाग देखील असू शकतो. मात्र याद्वारे तो आपल्या राजकारणास अधिक प्रवाही करू इच्छित असल्याचे दिसते. पंजाबच्या राजकारणात प्रभावशाली प्रादेशिक पक्ष म्हणून भूमिका बजावणाऱ्या शिरोमणी अकाली दलाच्या बदलत्या राजकारणाची मीमांसा प्रस्तुत शोध निबंधात केली आहे.

**शिरोमणी अकाली दलाचे अस्मितेचे राजकारण**

प्रसिद्ध लेखक, वकील व विचारवंत खुशवंत सिंह यांच्या मते "अकाली दल हा एक धार्मिक, राजकीय पक्ष असुन तो आपले धार्मिक सुधारणा आणि संरक्षणाचे कार्य करत आहे हा पक्ष १४ डिसेंबर १९२० मध्ये स्थापन झाला; त्यावेळी या पक्षाच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश प्रामुख्याने शीख गुरुद्वारांमध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करणे हा होता."[१] १९४७ मध्ये झालेल्या भारताच्या फाळणीत पूर्वीच्या पंजाबचा २/३ प्रदेश आणि निम्मी लोकसंख्या पाकिस्तानमध्ये गेली. १९६६ च्या राज्यपुर्नरचनेच्या निर्णयामुळे राज्याचा अर्धा भाग इतर राज्यात वाटला गेला. पण प्रदेशाच्या हस्तांतरणापेक्षाही राज्यांमधल्या लोकसंख्येच्या स्वरूपामुळे कित्येक वर्षे अकाली दलाला आपली ओळख निर्माण करणे कठीण झाले होते. फाळणीपूर्व पंजाबमध्ये अर्धी लोकसंख्या मुस्लिम होती, तर फाळणीनंतर पंजाबमध्ये ६० टक्के हिंदू व ३१ टक्के शीख होते. हिमाचल प्रदेश, हरियाणा आणि पंजाब या तीन राज्यांची निर्मिती आणि फेररचना झाल्यानंतर पंजाब हे शीख बहुसंख्यांक राज्य बनले. या राज्यात ६० टक्के शीख, ३७ टक्के हिंदू असे लोकसंख्येचे प्रमाण झाले. पंजाबच्या फाळणीनंतर उसळलेल्या दंगलीमुळे जरी मुस्लिमविरोधी वातावरण काही काळ निर्माण झाले होते तरीदेखील पंजाब सुभ्याच्या मागणीतून शिखांची अस्मिता त्याकाळात स्पष्ट झाली. अकालींची वेगळ्या राज्याची मुक मागणी पंजाबीयतची[२] भरभराट करण्याच्या आकांक्षेतून निर्माण झाली होती. पंजाबीयतची कल्पना 'खालसा का बोलबाला'शी संबंधित होती. अशा परिस्थितीत आर्य समाजाने हिंदू समाजात चालवलेल्या हालचालींची भर पडली. हिंदूंनी आपली मातृभाषा 'हिंदी' ही अधिकृत भाषा म्हणून नोंदवावी, हे आवाहन आणि वैदिक परंपरांचा निष्ठेने स्वीकार करून शीख संस्कारांपासून हिंदूंना दूर ठेवण्याचा आर्य समाजाचा प्रयत्न, यामुळे शीख समाजाचे दृढीकरण होत गेले. त्याबरोबरच जात आणि शीख अस्मितेवर आधारलेल्या राजकारणाची बीजे 'पंजाबीयत' द्वारा पेरली गेली. याप्रकारे 'भाषावाद' हा मान्यता व सत्ता यांच्या बदलाच्या तीव्र आकांक्षांना पोषक ठरला. या घटनेची फलनिष्पत्ती हिंदू व शीख या दोघांनाही त्यांच्या स्वतंत्र अस्मितांचा लाभ करून देणारी ठरली. याचा अर्थ असा नाही, की शिखांच्या अस्मितेचे राजकारण स्वातंत्र्यानंतर उदयास आले. 'शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटी' ची संस्थात्मक आणि राजकीय[३] आघाडी म्हणून अकाली दलाचा उदय आधीच झाला होता.

**शिरोमणी अकाली दल - भाजप युतीचे राजकारण**

१९९२ पासून २०१२ पर्यंत पंजाबमध्ये कॉंग्रेस आणि अकाली दल यांना आलटूनपालटून सत्ता मिळत राहिली. परंतू १९९० च्या दशकापासून शिरोमणी अकाली दलाने भाजप'शी हातमिळवणी केली. परिणामी याकाळात अकाली दल आणि भाजप यांच्यातील युतीमुळे अकाली दलाला केंद्रातील सत्तेत सुद्धा वाटा मिळाला.[४] १९९७ मध्ये अकाली दल (बादल) व भाजपा आघाडीस मोठ्या प्रमाणात यश मिळाले. पंजाबमध्ये दहशतवाद समाप्तीनंतरची ही पहिलीच निवडणूक होती. राज्यात पुन्हा एकदा आर्थिक विकास व सामाजिक परिवर्तनाचे काही मुद्दे पुढे आले. 'धार्मिक अस्मिता' ही येथील जनतेची प्रमुख ओळख राहिली आहे. परंतू आता राजकारण पुन्हा धर्मनिरपेक्षतेच्या मार्गावर आले.[५]

२०११ मध्ये बादल कुटुंबीयांमध्ये मतभेद होऊन प्रकाशसिंह बादल यांचे पुतणे मनप्रित बादल यांनी 'पीपल्स पार्टी ऑफ पंजाब' या नव्या पक्षाची स्थापना केली. मात्र २०१२ मधील विधानसभा निवडणुकीत या पक्षाला फारसे यश मिळाले नाही. या पक्षाने २०१४ मध्ये कॉंग्रेस पक्षाशी हातमिळवणी केली होती. परंतु तोपर्यंत पंजाबमध्ये देखील कॉंग्रेसची वाताहत झाली होती. २०१२ मध्ये अकाली दल व भाजप यांच्या शासनाविषयी राज्यात नाराजी होती. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ही नाराजी काहीशा नाट्यपूर्ण



PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

पद्धतीने 'आम आदमी पार्टी'ला मिळालेल्या यशाच्या रुपाने व्यक्त झाली.[५] येथे 'आप'ला ४ जागा मिळाल्या व २४ टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली. राज्याच्या राजकारणात हा नवीन पर्याय शोधण्याचा एक प्रयत्न होता.

अकाली दल धार्मिक श्रद्धा, सांप्रदायिक संघटना आणि प्रादेशिक धार्मिक प्रतिके यांच्या गुंत्यात पंजाबचे राजकारण साकारत आले आहे. बादल हे धर्मनिरपेक्षतेच्या मुद्यावर भर देत आले आहे. परंतु अकाली दलातील सांप्रदायिक शक्तींना पूर्णपणे डावलून ते आपले राजकारण पुढे नेऊ शकले नाही. कारण अकाली दलाची भूमिका मुळात शीख अस्मिता व हितसंबंधाची जोडलेली आहे शीख समाजात कट्टरवाद आणि धार्मिकतेचे प्राबल्य आहे. तरीही सांप्रदायिक ओळखित अडकून न पडणाऱ्या शिखांची संख्या देखील कमी नाही. त्यामुळे अकाली दलास सतत सांप्रदायनिष्ठ भूमिका व ऐहिक भूमिका यांच्यात कसरत करावी लागते. मनप्रित बादल यांनी विकास आणि उदारीकरण यावर भर देणारी भूमिका स्वीकारली होती. परंतु ते २०१२ मध्ये यशस्वी होऊ शकले नाही.[७] पंजाबच्या राजकारणाचे आणखी एक अंग म्हणजे, काँग्रेस व अकाली मधील हाडवैर हे आहे. कालाओघात त्याचे रूपांतर अकालीतील बादल घराने विरुद्ध काँग्रेसमधील पटियालाच्या भूतपूर्व राजघराण्याचे वारसदार कॅप्टन अमरिंदर सिंग घराण्यातील चढाओढीच्या संकुचित स्वरूपात झाले. या दोन गटांमधील सुडाच्या राजकारणामुळे राज्याच्या विकासाचा मुद्दा बाजूला पडला व पक्षीय राजकारणाला खाजगी वैमनस्याचे गहिरे रंग चढले.[८]

पंजाबच्या राजकीय वाटचालीत दोन गंभीर प्रश्न नेहमीच पुढे येतात. एक एखाद्या राज्याच्या न्याय्य मागणीच्या पूर्ततेचा प्रश्न व दुसरा धार्मिकतेचा. पंजाब हे एक प्रगत राज्य आहे. परंतु पटियाला आणि चंदिगढचा ताबा मिळणे या दोन्हीही पंजाबच्या न्याय्य मागण्या आहेत असे म्हणता येईल. त्याची सोडवणूक निवडणुकीच्या किंवा दहशतवादाच्या माध्यमातून झाली नाही. मात्र त्याबरोबरच पंजाबचे राजकारण हे कायम अकाली दलाच्या आणि शीख धार्मिक अस्मितेच्या चैकटीत झाले आहे, हे समजून घेतले पाहिजे. पंजाबमध्ये अकाली दल आणि भाजपच्या युतीमुळे अकाली दलाला कट्टरवादी भूमिका घेण्यात निश्चितच मर्यादा पडल्या आहेत.[९] परंतु जनाधार वाढविण्यासाठी अकाली दलाने वाटचाल सुरु केल्याचे दिसते.

**रालोआ'मधून बाहेर पडून शिरोमणी अकाली दलाची 'भाजप'ला फारकत**

अकाली दलाने रालोआ सरकारने संसदेत आणलेल्या नवीन कृषी विधेयकास विरोध करून सप्टेंबर २०२० मध्ये रालोआ'मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. चंदिगडमध्ये झालेल्या पक्षाच्या कोर कमिटीच्या बैठकीत सर्वानुमते हा घेण्यात आल्याचे शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांनी जाहीर केले. यापूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळातील शिरोमणी अकाली दलाच्या एकमेव प्रतिनिधी असलेल्या हरसिमरत कौर बादल यांनी कृषी विधेयकाच्या विरोधात मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता.[१०] शेतकरी विरोधी कायद्याचे आपण सरकारमध्ये राहून समर्थन करू शकत नसल्याचे त्यांनी राजीनामा पत्रात म्हटले होते.

**निष्कर्ष**

पंजाबमधील राजकारणाच्या जडणघडणीचा विचार केला, तर अकाली दलाची निर्मितीच धर्म, भाषा, जात या आधारावर झाली आहे. मात्र बदलत्या राजकीय परिस्थितीत अकाली दलाने आपला ढासळत चाललेला राज्यातील जनाधार टिकविण्यासाठी सप्टेंबर २०२० मध्ये केंद्र सरकारने संसदेत आणलेल्या कृषी विधेयकाच्या मुद्यावर भाजप प्रणित रालोआ'मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. राज्यात सत्तेबाहेर असलेल्या अकाली दलाने विधानसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेऊन हा नवा राजकीय डाव टाकुन आपले राजकारण प्रवाही करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. मात्र त्याचा पक्षाला किती फायदा होईल हे पुढे दिसुन येईल.

**संदर्भ सूची:**


१. सिंग खुशवंत, १९७६, 'द शीख टुडे' संगम बुक्स, न्यु दिल्ली, पृ.२
२. पळशीकर सुहास (संपा.), २००९, 'भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण', साधना प्रकाशन, पुणे, पृ.१८७
३. कित्ता
४. पळशीकर सुहास, २०१५, 'देश-प्रदेश : प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा', द युनिक ॲकॅडमी, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.१२५
५. दातार अभय व घोटाळे विवेक (अनु.), २०१२, 'स्वातंत्र्यापासूनचे भारताचे राजकारण' प्रगत अध्ययन केंद्र राज्यषास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ.१४८
६. पळशीकर सुहास, २०१५, उपरोक्त क्र.४, पृ.१२६
७. कित्ता
८. समाज प्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून २००९, पृ.२३१
९. पळशीकर सुहास, २०१५, उपरोक्त क्र.४, पृ.१२७
१०. https://www.thehindu.com/news/national/shiromani-akali-dal-bjps-oldest-ally-leaves-nda-over-farm-bills/article32704939.ece




Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## November -2020

SPECIAL ISSUE

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr.S.N.Jadhavar**
**Head, Deptt. of History, Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

## The Journal is indexed in:

**Scientific Journal Impact Factor (SJIF)**
**Cosmos Impact Factor (CIF)**
**International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar PUBLICATIONS

T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

## November - 2020

**ISSUE No – CCLXIII (263)**

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.S.N.Jadhavar**
**Editor :**
**Head, Deptt. of History,**
**Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

**Dr.R.M.Hajari**
**Executive Editor:**
**Principal**
**Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

Aadhar International Publications

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

**© All rights reserved with the authors & publisher**

PRINCIPAL,
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII) | November, 2020

# महिला सक्षमीकरणाची संकल्पना आणि सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक आशय

**प्रा. शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक- राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे.(महाराष्ट्र)
ई-मेल :- sharadpolsci@gmail.com भ्रमणध्वनी :- ९४०५१०८१३५

## प्रस्तावना

स्त्रियांच्या शोषनाचे व पराधिनतेचे ऐतिहासिक अवलोकन केले असता असे दिसते की, सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक कारणांमुळे स्त्रियांचे शोषन झालेले आहे. म्हणून महिला सक्षमीकरणाची संकल्पना समजून घेतांना या कारणांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. स्त्रीदास्य मुक्तीसाठी आयुष्यभर झटलेल्या समाजसुधारकांनी देखिल स्त्रियांचे शोषन हे सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक कारणांमुळेच होत असल्याचे सप्रमाण सिध्द केले आणि त्यामधुन त्यांची मुक्तता करण्यासाठी स्त्रियांना शिक्षण व आर्थिक अधिकार देण्यासाठी भरीव प्रयत्न केल्याचे दिसते. समाजसुधारकांच्या याच दृष्टिकोनातून महिला सक्षमीकरणाची संकल्पना आणि त्याच्याशी संबधित सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक आशय उलगडण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

## महिला सक्षमीकरणाचा अन्वयार्थ

महिला सक्षमीकरण ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणारी प्रक्रिया आहे. लिंगभेदावर आधारित विषमतापूर्ण समाजव्यवस्था नष्ट करुन स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे व स्त्रियांना जिवनाच्या सर्व क्षेत्रात प्रतिनिधीत्व व प्रतिष्ठा मिळवून देणे हे या प्रक्रियेचे स्वरुप आहे. महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनण्यासाठी पोषक अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने संथपणे का होईना पण निश्चितपणे वाटचाल करीत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पूर्वीपासून स्त्रियांची उपेक्षा झालेली आहे. त्यामुळे स्त्रियांचा विकास झालेला नाही. 'लिंगभेद आणि शोषणावर आधारित सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था बदलुन स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन देणारी व्यवस्था निर्माण करण्याशी महिला सबलीकरणाची प्रक्रिया संबंधित आहे.'[1] दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर महिला सक्षमीकरण हे स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य, राजकीय आणि आर्थिक धोरण निश्चितीमध्ये भागिदारी तसेच समान कामासाठी समान वेतन आणि कायद्याचे सरंक्षण व अधिकारांची प्राप्ती यांच्याशी संबधित आहे. अर्थात महिला सक्षमीकरणाच्या राष्ट्रीय धोरणाचा उद्देश स्त्री-पुरुष विषमता नष्ट करणे, स्त्रियांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना स्वावलंबी व स्वयंपुर्ण करणे आणि देशाचे नीतिनिर्धारण व विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवणे हा आहे.

स्त्रीवादी चळवळीच्या असा आक्षेप आहे की, प्राचिन व वर्तमान समाजामध्ये स्त्रियांना लिंगभेदामुळे अन्याय सहन करावा लागलेला आहे व तो आजही चालूच आहे. ऐतिहासिक दृष्ट्या स्त्रीवादी चळवळीच्या कालानुक्रमे पुढील मागण्या राहिलेल्या आहेत. १) स्त्रियांच्या अधिकारांना मानवी हक्कांच्या श्रेणीत ठेवण्यात यावे. २) संपुर्ण सामाजिक क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता असावी आणि ३) स्त्रियांना पारंपारिक परावलंबित्वापासून मुक्त करण्यात येऊन स्त्रीत्वाची नविन व्याख्या करण्यात यावी.[2]

## महिला सक्षमीकरणाचा सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक परामर्श

जीवशास्त्रीय दृष्ट्या स्त्री-पुरुषांमध्ये काही नैसर्गिक भेद आहेत. परंतू 'लिंग' या संज्ञेशी अनेक सांस्कृतिक पैलू व अर्थ जोडले गेले आहेत. मूलतः नैसर्गिक भेदांमुळेच समाजात स्त्रीच्या दुय्यम दर्जाचे समर्थन केले जाते. जीवशास्त्रीय कारणांचा आधार घेवुन शोषणाच्या अनेक प्रकारांना तत्वज्ञानाचा मुलामा चढविला जातो. नैसर्गिक आणि अपरिवर्तनीय घटनांमुळे शोषण अटळ आहे असे सांगीतले जाते. जातीव्यवस्था तसेच वर्णव्यवस्था ही शोषणाची उदाहरणे म्हणून सांगता येतील. दोन्ही व्यवस्थांमध्ये काही विशिष्ट वर्गीय, लोकांना जन्मतः श्रेष्ठ मानले गेले आहे. तसेच त्यांच्याजवळ विशेष बुध्दीमत्ता आणि कौशल्य आहे अशी धारणा समाजात जाणीवपुर्वक निर्माण करण्यात आली. अशाच जीवशास्त्रीय आधारावर शतकानुशतकांपासून स्त्रीवर्गाच्या होत असलेल्या शोषणाचे समर्थन केले जात आहे. त्यामुळे अशा जीवशास्त्रीय समर्थनाला आव्हान देणे गरजेचे आहे.[3] स्त्रिया हजारो वर्षापासून उपेक्षित व पराधीन जीवन जगत आहेत. रामायण, महाभारत यासारख्या प्राचीन धर्मग्रंथांमध्ये देखिल स्त्रियांच 'स्वत्व'



PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

कोठेही आढळत नाही. त्यांनी आपले 'स्वत्व' पुरुषांमध्येच शोधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. प्राचीन काळापासून पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रियांना केवळ बंधनात ठेवले. मनुस्मृतीमध्ये एकेठिकाणी स्त्रियांना पुजनिय मानुन म्हटले आहे की,

*'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।*
*यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्रफलाः क्रियाः*

म्हणजेच ज्या कुलामध्यें पिता, पति इत्यादिकांच्या द्वारा स्त्रियांची पूजा होत असते तेथील देवता प्रसन्न होतात व ज्या ठिकाणी त्यांची पूजा होत नाही, तेथील देवता रहात नसल्यामुळे यज्ञादि सर्व क्रिया निष्फळ होतात.[४] याच मनुस्मृतीमध्ये स्त्रियांना स्वातंत्र्य नाकारतांना पुढे असे म्हटलेले आहे की,

*'पिता रक्षती कौमारे भर्ता रक्षती यौवने।*
*रक्षन्ति स्थिविरे पुत्रा न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति*

याचा अर्थ विवाहाच्या पूर्वी पित्यानें स्त्रियांचे रक्षण करावें. त्यानंतर पतीनें त्यांचे संरक्षण करावें व पतीच्या मागे पुत्रांनी रक्षण करावें. सारांश कोणतीही स्त्री स्वातंत्र्यास योग्य नाही.[५] यावरुन असे स्पष्ट होते की, स्त्री ही अबला असून ती स्वातंत्र्य देण्यास पात्र नाही असे उघड-उघड प्रतिपादन मनुस्मृतीमध्ये करण्यात आलेले आहे. एकंदरीत हजारो वर्षांपासुन स्त्रियांच्या वाट्याला असे दयनिय जीवन आलेले आहे. स्त्रियांची या दास्यत्वातुन मुक्तता करण्यासाठी १९ व्या, २० व्या शतकात जे प्रयत्न होऊ लागले त्यामागे अनेक चळवळी, सामाजिक संस्था, समाजसुधारक व स्त्री-मुक्ती विषयी कणव असणाऱ्या सर्वांचे महत्वपूर्ण योगदान लाभलेले आहे. त्यांच्यामुळेच सतीप्रथा, बालविवाह, विधवापुर्नविवाह, स्त्री-शिक्षण, महिला संघटना यासंबंधी कायदे संमत होत गेले आणि स्त्री मुक्ती व महिला सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली.

१९ व्या शतकापर्यंत सामाजिक क्षेत्रात स्त्री ही बंदिस्त होती तिचे पूर्णत्व हे तिच्या पतीवर म्हणजेच पुरुषावर अवलंबुन होते. यामुळे पतीच्या निधनानंतर स्त्रियांना सती जावे लागत होते. स्त्रियांच्या जीवनावर क्रुर आघात करणारी ही अमानुष प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी व स्त्रियांना जीविताचे स्वातंत्र्य देण्यासाठी बंगालमधील थोर समाजसुधारक व भारतीय प्रबोधन चळवळीचे अग्रदूत राजा राममोहन रॉय यांनी आवाज उठवला. त्यांच्यात प्रयत्नामुळे इंग्रजांच्या राजवटीत 'सन १८१८ मध्ये बंगालचे प्रांतिक राज्यपाल विल्यम बेंटिक यांनी बंगाल प्रांतात सतीबंदी केली आणि भारताचे गव्हर्नर जनरल झाल्यावर ४ डिसेंबर १८२९ मध्ये त्यांनी सर्व भारतासाठी सतीबंदीचा कायदा केला.'[६] १९ व्या शतकात स्त्री-मुक्तीच्या दिशेने पडलेले हे पहिले पाऊल होते. स्त्रियांच्या दमनाची व दुय्यमत्वाची कारणीमांसा करतांना महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांचे अज्ञान व पुरुषांचा कावेबाजापणा यांमुळे स्त्रियां पराधीन बनल्याचे सांगितले, ते म्हणतात, "स्त्रियांची जात फार अबला असल्याने, या लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करुन कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर पुरुषाने आपलेच घोडे पुढे दामटले. त्यास मागणी हक्क समजू नये या इराद्याने विद्या शिकण्यास प्रतिबंद केला. त्यामुळे एकंदर सर्वच स्त्रियांवर असा जुलमी प्रसंग येऊन ठेपला."[७] अविद्येमुळे जसे बहुजनाचे अहित झाले आहे. त्याचप्रमाणे अविद्येमुळेच स्त्रियांचे शोषण होत आहे याची जाणीव प्रथमतः महात्मा फुले यांना झाली. 'स्त्री ही माणुस आहे आणि तिला माणुसकीचा हक्क मिळालेच पाहिजे ही जाणीव करुन देण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. हा विचार ज्योतिबांच्या मनात पक्का रुजल्यावर अवघ्या २१ व्या वर्षी (१८४८ साली) त्यांनी मुलींची पहिली शाळा काढुन स्त्री-शिक्षणाच्या कार्यास सुरुवात केली.'[८] महात्मा फुलेंचे हे क्रांतीकारी पाऊल म्हणजे महिला सक्षमीकरणाची पायाभरणी होती. स्त्रियांच्या पराधिनतेला, दुय्यमत्वाला आणि परावलंबित्वाला कारणीभूत असणारा घटक म्हणजे स्त्रियांचे आर्थिकदृष्ट्या पुरुषावर असणारे अवलंबन हे होय. आर्थिकदृष्ट्या स्वंयपुर्ण किंवा स्वावलंबी नसल्यामुळे स्त्रियांना प्रतिष्ठा नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना झाल्यामुळे दि. २५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूरातील निरनिराळया नऊ संस्थातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या समारंभात भाषण करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले, 'आजच्या जगात संपत्तीच स्वातंत्र्याचा आधारस्तंभ आहे. जोवर स्त्रियांना संपत्तीचा वारसा मिळत नाही. तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही. त्यादृष्टीने हिंदू कोड बिलात मी तरतुदही केली होती पण ते बिल मंजुर होऊ शकले नाही. यापुढे आता येणारे बिल कोणत्या स्वरुपात येते व त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याची, हक्कांची काय तरतूद आहे याकडे महिला वर्गाने फार बारकाईने पाहिले पाहिजे. इतकेच नव्हे तर आपल्या हक्कांसाठी झगडण्यास त्यांनी आपले मनोदौर्बल्य टाकून कंबर कसून पुढे आले पाहिजे तरच त्यांची सुधारणा व प्रगती होईल.'[९] आर्थिक स्वयंपूर्णता किंवा आर्थिक अधिकार नसल्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जा दिला जातो. त्यादृष्टीने स्त्रियांनी आर्थिक सक्षम होणे आवश्यक आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते म्हणून त्यांनी स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीमध्ये कायद्याने वारसा हक्क मिळाला पाहिजे असे मत मांडले. आंबेडकरांनी जेव्हा हे मत मांडले होते तेव्हा त्याचे महत्व शासकवर्गाच्या ध्यानात आले नाही. परंतु कालांतराने का होईना सरकारने महिला सक्षमीकरणासाठी कायद्याने स्त्रियांना वारसा हक्क दिला आहे. अशाप्रकारे भारतात



PRINCIPAL
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304
Sakri, Dist.Dhule

महिला सक्षमीकरणाची सुरुवात समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण व स्त्रियांना वारसा हक्क यापासूनच खऱ्या अर्थाने झाली होती. यामुळेच आजच्या स्त्रिया सर्वच क्षेत्रात पुढे येतांना दिसत आहे. त्याचे श्रेय राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या युगपुरुषांना व सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्यासारख्या क्रांतीज्योतींना द्यावे लागेल.

**निष्कर्ष**

जगातील सर्वच देशांमध्ये फार प्राचिन काळापासून स्त्रियांना गौण दर्जा दिला गेलेला असून त्याचे मुळ पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत असल्याचे दिसते. आरंभीपासूनच स्त्रियांना आर्थिक स्वावलंबनाची संधी व अधिकार नसल्याने त्यांचे संपूर्ण जीवन पराधिन झाले व त्या आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यांवर पिता, पती व पुत्र यांच्यावर आश्रित राहू लागल्या. स्त्रियांच्या या परावलंबित्वाला सांस्कृतिक अधिष्ठान लाभून, त्यांचे सामाजिकरण कुटूंबात होऊ लागले आणि स्त्री- पुरुष कार्यविभाजनास मिळालेल्या समाजमान्यतेमुळे त्यास सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त झाले. याप्रकारे परंपरागत पध्दतीने स्त्रियांची मती व गती कुंठित केली गेल्यामुळेच स्त्रियांचे पूर्वापार शोषन होत आलेले आहे. स्त्रियांची या मानवनिर्मित मानसिक दास्याच्या बेडयांमधून मुक्तता केल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही असे समाजसुधारकांचे ठाम मत होते. म्हणून राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर आदी समाजसुधारकांनी स्त्रीदास्य विमोचनासाठी भरकस प्रयत्न केल्याचे दिसते. पुढे समाजसुधारकांच्या आचार व विचारातून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रीवादी चळवळी उदयाला आल्या. समाजसुधारकांचे कार्यकर्तव्य आणि स्त्रीवादी चळवळीच्या मागण्याची दखल घेऊन आधुनिक काळात शासन स्तरावर महिला सक्षमीकरणाच्या दिशेने अनेक पाऊले उचलली जात असल्याचे दिसत असून त्याचे सकारात्मक परिणाम देखिल दिसुन येत आहेत.

**संदर्भ सूची**

१) शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, मार्च २०१०, पान क्र. ३४४
२) ओम प्रकाश गाबा, राजनीति चिंतन की रुपरेखा, मयुर पेपरबैक्स, नौएडा, २००३, पान क्र. ४००
३) राजीव भार्गव, अशोक आचार्य (संपा.), अनुवादः हेमंत खानझोडे, राजकीय सिध्दांत परिचय, डोरलिंग किंडर्सले (इंडिया) प्रा. लि. लायसेंस ऑफ पिअर्सन एज्युकेशन इन साऊथ एशिया, २०११ पान क्र. १४९
४) श्रीसार्थ मनुस्मृती, अध्याय-२:५५, जोशी ब्रदर्स, पुणे पान क्र. ५३ व ५४
५) कित्ता, अध्याय-९:२, पान क्र. २३९
६) पद्मा पाटील व शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापुर, मार्च २००७, पान क्र. १०४
७) कित्ता, पान क्र. ११८
८) शांता रानडे, सावित्रीबाई जोतिबा फुले, लोकवाङ्मय गृह, मुंबई, मार्च २००९, पान क्र. ७
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८-भाग ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिति, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२, पान क्र. ३४०

T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U. Patil Arts &
Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## November -2020

SPECIAL ISSUE NO - CCLX (260)

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.R.M.Hajari
Principal
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**Editor:**
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar PUBLICATIONS

T.S.S's. Smt. V.U. Patil Arts College Sakri ... Dr.B.S. Desale Science

T.S.S's.Smt. ... Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

## November - 2020

**ISSUE No – CCXLIV (260)**

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.S.N.Jadhavar**
**Editor :**
**Head, Deptt. of History,**
**ham Gadale Art's Collage, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

**Dr.R.M.Hajari**
**Executive Editor:**
**Principal**
**Sham Gadale Art's Collage, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

## Aadhar International Publications

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

**© All rights reserved with the authors & publisher**

TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 265 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

# महाराष्ट्रातील दलित चळवळ : डॉ.बी.आर.आंबेडकर पूर्व कालखंड

शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक — राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि. धुळे

## प्रस्तावना

दलित हा शब्द साधारणतः शोषित घटकांसाठी किंवा वर्गासाठी पर्यायवाचक असून त्याचा विशिष्ट जातींशी मुळीच संबंध नाही. मात्र, आधुनिक काळात 'दलित' हा शब्द जातीशी जोडला जात असल्याचे दिसते. पूर्वीच्या काळी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचा अंतर्भाव दलित या संकल्पनेत वर्तमान काळात केला जातो. म्हणून सामाजिक परिवर्तनाचे इतिहासाचे अवलोकन करत असतांना 'दलित' ही संकल्पना समजुन घेणे गरजेचे ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात 'दलित' या शब्दाचे वेगवेगळे अर्थ आणि त्याच्या व्याप्तीची उकल करून दलित संकल्पनेचे असे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळातील महाराष्ट्रातील दलित चळवळीच्या प्रारंभिक प्रयत्नांचा आढावा घेतला आहे.

## दलित : संकल्पनेचे आशय विश्लेषण

दलित समाज हा मागासलेला समाज—समूह आहे. हजारो वर्षापासून या समाज—समूहावर अन्याय—अत्याचार होत आलेले आहेत. छळ—कपट, दास्य, दैन्य या आयुधांच्याद्वारे या समाज—समूहावर सतत आसूड ओढले गेले आहेत.[१] हिंदू जाती व्यवस्थेमध्ये त्यांना अवर्ण म्हटले जाते, म्हणजेच त्यांची जागा चातुर्वर्ण व्यवस्थेच्या बाहेर आहे, त्यांना पेरियल पंचम, अतिशूद्र, अंत्यज किंवा नामशूद्र असेही देशाच्या विविध भागात म्हटले जाते. त्यांचा स्पर्श आणि काहीवेळा त्यांची सावली, एवढेच काय त्यांचा आवाज सुद्धा जातिवंत हिंदूंना दूषित करतो, असे मानले जाते. कायद्याने जरी आता त्यांना अस्पृश्य मानले जात नसले तरी अजूनही व्यवहारात कित्येक जणांना हा कलंक सहन करावा लागतो.[२]

वैदिक वाङमयात चांडाळ, निषाद हे शब्द आढळतात. पण त्यात त्यांच्या अस्पृश्यतेबद्दल स्पष्ट उल्लेख आढळत नाही. स्मृतिकाळ व धर्मशास्त्रयुगात धार्मिक शुद्धता व पवित्र—अपवित्रता या कल्पना प्रखर झाल्याचे दिसून येते. डॉ. घुर्ये म्हणतात त्याप्रमाणे धार्मिक पवित्र—अपवित्रतेची कल्पना इ.स.पू.८०० वर्षापूर्वी स्पष्टपणे अस्तित्वात आल्याच्या खुणा सापडतात. मनुस्मृतीच्या काळात अस्पृश्यतेच्या भावनेला कढ आला व त्यानंतर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींवर अत्याचार—कांड सुरू झाले. त्यांना कित्येक हजार वर्षे अत्याचार निमुटपणे सहन करावे लागले. म्हणूनच आर्य समाजाने या जातींना यथार्थपणे 'दलित' असे संबोधले. ज्या लोकांना कोणतेच अधिकार दिले गेले नव्हते व जे लोक दाबून ठेवले गेले होते ते दलित.[३]

दलित हा शब्द नवीन नाही. १९३० च्या सुमारास हा शब्द हिंदीत आणि मराठीत वापरला गेला. इंग्रजांनी ज्यांना 'पिडलेला/नाडलेला वर्ग' म्हटले, त्यांनाच आता 'अनुसूचित जाती' असे म्हटले जाते. १९३० मध्ये पुण्यातून या पिडलेल्या वर्गासाठी 'दलितांचे मित्र' (दलित मित्र) म्हणून एक वर्तमानपत्र निघत असे. हाच शब्द बी. आर. आंबेडकर त्यांच्या मराठी भाषणातही वापरत असत.[४] म्हणजेच, १९३१ च्या जनगणनेपूर्वीपासून 'दलित' हा शब्द प्रचारात होता. पण १९३१ च्या जनगणना अधिकाऱ्याने (जे. एच. हटन) या जातींचा उल्लेख 'बाह्य जाती' असा करून हिंदू समाजापासून या जाती वेगळ्या आहेत असे सूचित केले. याच आधारावर मॅक डोनाल्ड या ब्रिटिश पंतप्रधानाने दलित जातींना स्वतंत्र निर्वाचन क्षेत्र (मतदार संघ) देण्याचे जाहीरही केले. पण महात्मा



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

गांधींनी २० सप्टेंबर १९३२ रोजी आमरण उपोषण सुरू केल्यामुळे त्यांचे स्वतंत्र निर्वाचन क्षेत्र रद्द केले गेले व या जाती हिंदू समाजातील आहेत ही वस्तुस्थिती मान्य करण्यात आली. १९३५ च्या कायद्यात त्यांना अनुसूचित म्हणून संबोधण्यात आले व त्यांना विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या.[4] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला व मागे रेटलेला सामाजिक वर्ग आहे."[5] याप्रकारे 'दलित' या संज्ञेला अनेक पैलू असुन विविध दृष्टिकोनातून या संज्ञेचा अर्थ काढला जातो.

डॉ.आंबेडकर पूर्व काळातील महाराष्ट्रातील दलित चळवळ

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या अगोदर दलित चळवळ हे नाव न वापरता, मानवमुक्तीची ही चळवळ भारतात सर्वप्रथम महात्मा फुले यांनी सुरू केली. महात्मा फुले यांच्यानंतर या चळवळीचे महत्त्वाचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'च्या माध्यमातून केले. महाराष्ट्र राज्यातील दलित वर्गाला जागृत करण्याचे कार्य गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागुजी बनसोडे यांनी केले. १८८६ मध्ये ब्रिटिश लष्करातून निवृत्त झाल्यावर गोपाळबाबा वलंगकर यांनी दापोली येथे 'अनार्य दोष परिहार' नावाची संस्था स्थापन करून त्याद्वारे दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य केले... तर पुणे येथे शिवराम जानबा कांबळे यांनी दलित समाजाला जागविण्याचे कार्य केले. त्यांनी दलितांमधील पोतराज, देवदासी यासारख्या अनिष्ट चालीरीती नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक त्यांनी काही काळ चालून दलितांच्या आचार विचारात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले. तसेच त्यांनी १९२९ साली झालेल्या पर्वती मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते. विदर्भात किसन फागुजी बनसोडे यांनी दलित मुलांसाठी शाळा, वसतिगृहे सुरू केली. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे आणि सामाजिक प्रश्नांवर परिषदा भरवून दलित समाजाला जागृत करण्याचे व त्यांच्यामध्ये स्वाभिमान निर्माण करण्याचे काय केले. याशिवाय अनेक सुधारक व दलित कार्यकर्त्यांनी दलितांमध्ये जागृती करून स्वाभिमान निर्माण करण्यासाठी काम केले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा दलित चळवळीची धुरा आपल्या खांद्यावर घेतली, तेव्हापासून दलित चळवळीला खरे चैतन्य प्राप्त होऊन दिशा मिळाली.

निष्कर्ष

अनेक अभ्यासक, विचारवंत व समाजसुधारकांनी दलित या संज्ञेला वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र 'दलित' हा शब्द सामान्यपणे पिढ्यनपिढ्या ज्यांचे शोषण झाले आहे, अशा शोषित, उपेक्षित व वंचित घटकांसाठी वापरला जाणारा शब्द असून त्यामध्ये महिलांचा देखील समावेश होतो. परंपरागत भारतीय समाज व्यवस्थेत आणि जातीव्यवस्थेमध्ये ज्या जातींना हीन लेखले जाऊन त्यांचे शोषण केले गेले, त्यांच्यासाठी साधारणपणे 'दलित' हा शब्द वापरला जातो. परंतु अनेक अभ्यासकांचा असा दावा आहे की, दलित ही एक जाणीव असून तिचा संबंध जातीशी नाही तर वर्गाची आहे आणि तो वर्ग शोषित घटकांचा आहे.

महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित उद्धारासाठी प्रदीर्घ लढा देऊन कायदा व संविधानाच्या माध्यमातून दलितांच्या उत्कर्षासाठी बहुमोल योगदान दिले. मात्र त्यांच्या पूर्वीदेखील महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे अशा समाजसुधारकांनी दलित उद्धारासाठी प्रयत्न केले आहे. याबरोबरच गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे व किसन फागुजी बनसोडे या दलित समाजातील कार्यकर्त्यांनी देखील दलितांमध्ये जनजागृती करण्यासाठी मोलाचे योगदान दिलेले आहे. दलित चळवळीला पुढे डॉ.आंबेडकरांचे खंबीर नेतृत्व लाभल्यामुळे दलित मुक्तीचा लढा हा मानवमुक्तीचा लढा बनला. मात्र हे आंबेडकर पूर्व सुरू होण्यापूर्वी आधीच्या



TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

समाजसुधारकांनी व कार्यकर्त्यांनी दलित चळवळीची पायाभरणी केलेली असल्यामुळे त्यांचे योगदान नाकारता येत नाही.

संदर्भ सूची

१. पगारे म.सू., 'दलित साहित्याचा इतिहास', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००५, पृ.१३
२. शहा घनश्याम (अनु. प्राची चिकटे), 'भारतातील सामाजिक चळवळी', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०११, पृ.९४
३. नाडगोंडे गुरुनाथ, 'सामाजिक आंदोलने', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.४०,४१
४. जॉन सी.बी.वेबस्टर, 'दलित म्हणजे कोण?': एस.एम.मायकेल (संपा.) (अनु. विद्या भाके), 'आधुनिक भारतातील दलित', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०११, पृ.५६
५. उपरोक्त, नाडगोंडे गुरुनाथ, 'सामाजिक आंदोलने', पृ.४१
६. कित्ता
७. पाटील बी.बी., 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०, पृ. २९२,२९३

T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

## Human Rights : Reality & Challanges

**SPECIAL ISSUE**

**December-2020**




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr. Sandip B. Kale**
Coordinator
HOD. Dept. Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**Executive Editor:**
**Dr. Archana S. Dahane**
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

S.Sts. Smt. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
S.Sts Smt. U. Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned by CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 257
ISSN : 2278-9308
December,2020

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**December - 2020**

**SPECIAL ISSUE – (CCLVII) 257**

## Human Rights : Reality & Challanges

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr. Sandip B. Kale**
**Editor:**
**Coordinator**
**HOD. Dept of Political Science**
**Yeshwant Mahavidyalaya Seloo, Dist.Wardha(M.S)**

**Dr. Archana S. Dahane**
**Executive-Editors**
**Officiating Principal**
**Yeshwant Mahavidyalaya Seloo, Dist.Wardha(M.S)**

## Aadhar International Publication

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

© All rights reserved with the authors & publisher



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304
Scanned by CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 257 | December,2020

# भारतीय संविधानातील मानव अधिकार प्रवर्धित करणारी तत्वे

शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक — राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि. धुळे

**प्रस्तावना**

संपूर्ण जगामध्ये आज मानव अधिकार हा शब्द किंवा विचार अतिशय काळजीणे व्यक्त केला जातो. दुसऱ्या महायुध्दानंतर जगातील सर्व माणसांची प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे, व्यक्तींना माणूस म्हणून काहि किमान अधिकार असले पाहिजे, यासंबंधीचा वैधानिक विचार जगतिक मानवी हक्काच्या जाहिरनाम्यातून पुढे आला. कारण पहिल्या व दुसऱ्या महायुध्दकाळात मानवी व्यक्तीमत्वाची झालेली विटंबना जगजाहिर होती. दुसऱ्या महायुध्दानंतर भारतास स्वातंत्र्य मिळून, भारताचे संविधान निर्मितीचे काम सुरु झाले होते. हिटलर, मुसोलिनी तसेच मित्रराष्ट्रांकडून युध्दकाळात आणि इतरवेळी अखिल वैश्विक पातळीवर मानवांची झालेली क्रुर चेष्ठा, अप्रतिष्ठा भारताने पाहिलेली होती. म्हणूनच भारताच्या संविधान निर्मात्यांनी संविधान तयार करतांना मानव अधिकार रक्षणाला प्राथमिकता देऊन त्यासंबंधीच्या तरतूदींचा समावेश भारतीय संविधानात केला आहे. भारताच्या संविधानात मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी केलेल्या विविध तरतूदींचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधानिबंधात करण्यात आलेला आहे.

**राज्य निर्मिती संबंधीचे सिद्धांत आणि मानव अधिकार**

मानवाच्या उत्पत्तीपासून राज्यसंस्थेच्या निर्मितीबाबत जे वेगवेगळे सिध्दात मांडले गेले, त्यामुळे देखिल मानव अधिकारांचा खुप मोठ्या प्रमाणावर संकोच झाल्याचे दिसते. विशेषत: राज्याच्या निर्मितीचा दैवी सिध्दांत आणि जैविक सेंद्रिय सिध्दांतांनी मनुष्यांच्या स्वतंत्र व्यक्तीमत्वाचा बळी घेतला होता. "ब्रिटीश लेखक रॉबर्ट फिल्मर, यांनी राज्याच्या दैवी सिंध्दाताचे प्रतिपादन करुन असे सांगितले की, राजाकडे असलेली सत्ता ही त्याला प्रत्यक्ष देवाने दिलेली असून, तो पृथ्वीवर देवाचा प्रतिनिधी आहे. म्हणून प्रजेने राजाच्या आज्ञांचे पालन, देवाज्ञा समजून केले पाहिजे."[१] "राजाच्या सत्तेवर धर्मसंस्थेचे, संसदेचे किंवा जनसामान्यांचे नियंत्रण असू नये, यासाठी युरोपात १६ व्या १७ व्या शतकात राजाच्या दैवी अधिकाराच्या सिध्दांताचे प्रतिपादन करण्यात आले होते. या सिध्दांतावर राज्याच्या उत्पत्तीच्या श्सामाजिक करारश सिध्दांतामध्ये कठोर टीका केली गेली आहे. प्राचीन भारतीय राजकीय तत्वचिंतनात विशेषत: मनुस्मृती आणि महाभारताच्या शांतीपर्वात राजाच्या दैवी अधिकाराचे समर्थन करण्यात आलेले आहे. परंतू बौध्द धर्मग्रंथ 'दीघनिकाय'मध्ये जनतेस राजाला निवडण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे."[२] पुढे "१८ व्या शतकात जर्मन तत्वचिंतक जी.डब्यू.एफ.हेगेल याने राष्ट्र—राज्य व्यवस्थेला सामाजिक विकासाची सर्वोत्तम अवस्था मानुन "राज्य म्हणजे ईश्वराचे पृथ्वीवरील मार्गक्रमण होय" (March of God on Earth) असे प्रतिपादन करुन माणसांनी राज्यासाठी सर्वस्व अर्पण केले पाहिजे असे सांगितले. हेगेलने आपल्या राज्यासंबंधीच्या आदर्शवादी सिध्दांतामध्ये राज्य हे साध्य मानुन व्यक्तीला साधनमात्र समजले आहे. त्यामुळे हेगेलच्या सिध्दांताचे विकृतीकरण करुन नाझीवादी हिटलर व फॅसिवादी मुसोलिनी यांनी हुकुमशाही प्रवृत्ती व मानवताविरोधी प्रवृत्तींना प्रोत्साहन देऊन निरंकुश सरकारला अधिमान्यता मिळवण्याचा प्रयत्न केला"[३] आणि त्यामुळे मानवी हक्कांची गळचेपी झाली.



PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned by CamScanner

आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानव अधिकाराच्या संकल्पनेचा उदय व विकास

इंग्लंडमध्ये तेराव्या ते सतराव्या शतकादरम्यान अनियंत्रित राजेशाहीला लगाम घालण्यासाठी मानवी अधिकारांची कल्पना पुढे करण्यात आली व व्यक्तीला त्याच्या जन्मापासुनच काही मूलभूत अधिकार प्राप्त झालेले असतात आणि ते हिरावून घेण्याचा अधिकार राजाला नाही; असा स्पष्ट इशारा देणारा विचार अनेक विचारवंताच्या लेखनातून मांडला गेला होता. इंग्लंडमध्ये १२२५ मध्ये संमत झालेला 'मॅग्नाकार्टा', १६२८ चे 'पिटीशन ऑफ राइट्स' १६८९ चे 'बिल ऑफ राइट्स' हे ब्रिटिश नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणारे आणि राजसत्तेच्या अनिर्बंध अधिकारावर बंधने आणणारे करार होते. मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी कायद्याने केलेली ही पहिली तरतूद असल्यामुळे मानव अधिकारांच्या कल्पनेला कायद्याची अधिमान्यता मिळाली व मानवी हक्कांना आधिक स्पष्टपणा लाभला आणि राजेशाही नियंत्रित होऊन संसदीय लोकशाहीला प्रारंभ झाला.[४]

दुसऱ्या महायुद्धात मोठ्या प्रमाणावर झालेल्या मानव अधिकारांच्या उल्लंघनामुळे १९४५ मध्ये स्थापना झालेली संयुक्त राष्ट्र संघटना सूरूवातीपासूनच मानव अधिकारांविषयी संवेदनशील होती. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेत मानव अधिकारांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले व १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेने मानव अधिकाराचा जाहीरनामा प्रसिद्ध केल्यावर मानव अधिकारांच्या संकल्पनेला वैश्विक रूप प्राप्त झाले.[५]

जागतिक मानव अधिकाराच्या घोषणापत्रात प्रस्तावने'सह ३० कलमे असून या जाहिरनाम्यात नागरी आणि राजकीय अधिकारांबरोबरच सामाजिक व आर्थिक अधिकारांचे देखील प्रथमतःच प्रतिपादन करण्यात आलेले आहे. तसेच रोजगाराचा अधिकार, समान कामासाठी समान वेतनाचा अधिकार, विश्रांतीचा व सामाजिक भरण—पोषणचा अधिकार, शिक्षण व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार, जीवनाचा अधिकार, विचार अभिव्यक्ती, धार्मिक स्वातंत्र्य, शांततापूर्ण पद्धतीने सभा व संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आदींचा उल्लेख करण्यात आला.[६] या सर्व जागतिक अनुभवांपासुन धडा घेऊन भारताने मात्र आपल्या संविधानात मानवी मूल्यांना व मानवांच्या नैसर्गिक अधिकारांना अभिव्यक्त करणाऱ्या तत्वांना व तरतूदींना प्राधान्य दिल्याचे दिसुन येते.

**भारतीय संविधानातील मानव अधिकार प्रवर्धित करणारी तत्वे**

भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया चालू असतानाच १० डिसेंबर १९४८ रोजी जागतिक मानव अधिकाराचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला होता आणि त्याचा प्रभाव भारतीय संविधानावर पडला असल्याचे दिसते. त्यामुळेच भारतीय संविधानात मानव अधिकारांना अतिशय महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले असून संविधानाच्या अनेक तरतुदींमधून मानव अधिकाराची अभिव्यक्ती होत असल्याचे दिसते. "मानव अधिकारांविषयीची भारताची संवेदनशीलता भारतीय संविधानात प्रतिबिंबित होते. जागतिक मानव अधिकारांच्या जाहीरनाम्यातील बहुतांश तत्वांचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आलेला असून नागरिकांना त्यांच्या मानवी हक्कांच्या संरक्षणाची हमी दिलेली आहे."[७]

भारतीय संविधानाची प्रस्तावना, भाग तीन मध्ये नागरिकांना बहाल केलेले मूलभूत अधिकार व भाग चार मध्ये अंतर्भूत असलेली मार्गदर्शक तत्वे यात भारतीय नागरिकांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या व्यक्तित्वाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या तत्त्वांचा म्हणजेच मानवी हक्कांना अभिव्यक्त करणाऱ्या तरतुदींचा समावेश करण्यात आलेला आहे. संविधानाच्या आरंभी जोडलेल्या प्रास्तविकाची किंवा उद्देशिकेची सुरुवातच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांपासून झालेली आहे. तसेच भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून, सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वरूपाचा न्याय प्रदान करण्याचे अभिवचन देण्यात आलेले आहे. म्हणजेच भारतीय संविधानाने



PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304
Scanned by CamScanner

सर्व नागरिकांच्या कल्याणाचे ध्येय निश्चित करून राज्य संस्थेस एक साधन मानल्याचे दिसते. यावरुन भारतीय संविधानात मानवांच्या हक्कांना प्राधान्य दिले असल्याचे दिसते.

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकाराच्या यादीतील कलम १४ व कलम १५ नुसार सर्व नागरिकांना समान लेखले जाईल आणि त्यांच्यामध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव केला जाणार नसल्याची संविधानिक शाश्वती देण्यात आलेली आहे. तसेच कलम १७ नुसार अस्पृश्यता निर्मुलनासंबंधीच्या तरतुदीचा समावेश करण्यात आलेला असुन कोणत्याही स्वरुपाची अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात येऊन तो कायद्यानुसार गुन्हा ठरविण्यात आलेला आहे. "कलम १७ च्या संदर्भात एक विशेष बाब म्हणजे हे केवळ व्यक्तींच्याच विरोधात लागू होत नाही, तर राज्य किंवा सरकारच्या विरुद्ध देखील हे लागू होते."[८] कलम १९ नुसार सर्व नागरिकांना स्वातंत्र्याचा अधिकार बहाल करण्यात आला असून नागरिकांना आपली उपजीविका ठरवण्याचा ही अधिकार देण्यात आलेला आहे. तर कलम २१ नुसार सर्व नागरिकांच्या जीवनाच्या अधिकारास सर्वश्रेष्ठ मूलभूत अधिकार मानण्यात येऊन संकटकाळात देखील त्याला स्थगित करता येणार नाही, अशी तरतुद करण्यात आलेली आहे. अर्थात, "जीवनाचा अधिकार म्हणजे केवळ श्वास घेण्याच्या अधिकारापुरता मर्यादित नसून त्यात सुखी–समाधानी, सन्मानपूर्वक व प्रतिष्ठित जीवन जगण्याच्या हक्काचा मूल भाव दडलेला आहे. कलम ३९, ४१ व ४२ मध्ये अंतर्भूत असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नागरिकांच्या प्रतिष्ठित जीवनासंबंधीच्या अपेक्षांचे सामूहिक प्रतिबिंब मुलभूत अधिकारासंबंधीच्या कलम १९ आणि २१ मध्ये अंतर्भूत आहे."[९] मूलभूत अधिकाराच्या यादीतील कलम २३ व २४ मध्ये भारतीय नागरिकांना संविधानाने शोषणाविरुद्ध किंवा पिळवणूकी विरुद्ध मूलभूत अधिकार बहाल केलेला आहे. यानुसार माणसाची विक्री किंवा वेठबिगारी यांना कायद्यानुसार मनाई करण्यात येऊन तो शिक्षेस पात्र गुन्हा ठरविण्यात आला आहे. तसेच १४ वर्षाखालील कोणत्याही मुलाला कोणत्याही कारखान्यात, खाणीत किंवा धोक्याच्या कामांवर ठेवण्यास बंदी घातलेली आहे. "सर्वोच्च न्यायालयाने कलम १७, २३ व २४ मधील तरतुदींना राज्यांच्या विरुद्ध तसेच प्रत्येक वेळी व्यक्तीविरुद्ध लागू केले जाऊ शकते असे नमूद केले आहे."[१०] याबरोबरच मूलभूत अधिकाराच्या यादीतील कलम ३२ मध्ये सर्व नागरिकांसाठी प्रदान करण्यात आलेला घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार हा मानव अधिकाराच्या रक्षणाच्या दृष्टिने अतिशय महत्वाचा मूलभूत अधिकार आहे. भारतीय संविधानात मानवी हक्कांना प्रवर्धित करणाऱ्या अशा अनेक तरतुदी अंर्तभूत आहे.

## निष्कर्ष

भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया चालू असताना जागतिक मानव अधिकाराचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला आणि त्यातील अनेक तत्वांचा समावेश भारतीय राज्यघटनेत करण्यात आला. भारताचे संविधान हे अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून व त्यामधील चांगल्या बाबींचा स्वीकार करून तयार करण्यात आलेले आहे. म्हणून मानवी कल्याणासाठी व व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या तसेच मानव अधिकार प्रवार्धित करणाऱ्या अनेक तरतुदींचा अंतर्भाव भारतीय राज्यघटनेच्या अनेक भागांमध्ये करण्यात आला असल्याचे दिसते. प्रामुख्याने भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका, भाग–३ मधील 'मूलभूत अधिकार' आणि भाग–४ मधील 'राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' यामधील तरतुदी मानवाधिकार प्रवर्धित करणाऱ्या आहेत. याबरोबरच सर्व तरतुदींचा स्पष्टपणे आणि लिखित स्वरूपात समावेश असल्यामुळे भारताचे संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान असल्याचे देखील म्हटले जाते.



T.S.S's. Smt. V.U.P. Late Dr. B.S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts, & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned by CamScanner

संदर्भ सूची

१. ओम प्रकाश गाबा, 'राजनीति सिध्दांत की रुपरेखा', मयुर पेपरबैक्स, नौएडा, २००५, पृ. १६३
२. ओम प्रकाश गाबा, 'विवेचनात्मक राजनीति विज्ञान कोश', मयुर पेपरबैक्स, नौएडा, २००७, पृ.१०४
३. किता, पृ.१६४
४. शैलेंद्र देवळाणकर, 'समकालीन जागतिक राजकारण : प्रमुख प्रश्न', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००५ पृ.७५
५. किता, पृ.७६
६. कुलदिप फड़िया, 'संयुक्त राष्ट्र संघ एवं अन्य प्रमुख अन्तर्राष्ट्रीय संघठन', साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, २००६, पृ.९५
७. उपरोक्त, शैलेंद्र देवळाणकर, 'समकालीन जागतिक राजकारण:प्रमुख प्रश्न', पृ.९२
८. महेंद्र कुमार मिश्रा, 'भारत का संविधान एवं मानव अधिकार', सागर पब्लिशर्स, जयपूर, २००९, पृ.१७९
९. किता, पृ.१२८
१०. किता, पृ.१७९

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304



Scanned by CamScanner

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - I**
**Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development**

December 2020










**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Manoj S. Kamat**

Principal,
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju
Desai College, Canacona-Goa

**Co-Editor : Prof. F. M. Nadaf**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V. U. Patil Arts &
Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**December 2020**

**Special Issue-Volume-I**

**On**

## *Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Manoj S. Kamat**
Professor & Principal
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor**
**Dr. F. M. Nadaf**
Vice Principal & Professor of Geography
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| **Prof. Camena Guneratne** (Sri Lanka) | | **Dr. RiaAerts** (Australia) |
| **Dr. Mohamed Izhar Hasan** (Rohtak) | **Prof. S. I. Biradar** (Dharwad) | **Dr. Bindhy Wasini Pandey** (New Delhi) |
| **Dr. Biswajit Roy Chowdhury** (Kolkata) | **Dr. Shyam Khinchi** (Ganganagar) | **Dr. Keya Das Ghosh** (Kolkata) |
| **Dr. Suryawanshi M V** (Aurangabad) | **Dr. C. P. Hiremath** (Goa) | **Dr. Sucheta Naik** (Goa) |
| **Shri. Vividh Pawaskar** (Goa) | **Dr. Pramada Gauns Desai** (Goa) | **Dr. Monika Kannan** (Ajmer) |
| **Dr. Arvind Haldankar** (Goa) | **Dr. L. T. Nayak** (Dharwad) | **Dr. Rupa Chari** (Goa) |

**Published by-** Dr. Manoj S. Kamat, Professor & Principal DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

# भाजप'च्या राजकारणाची वाटचाल : वाजपेयी पासून मोदी पर्यंतचा प्रवास

प्रा. शरद बाबुराव सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि.धुळे – ४२४३०४, भ्र.ध्वनी – ९४०५९०८९३५
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**सारांश (Abstaract)**

जनता पक्षात दुहेरी सदस्यत्वाच्या मुद्द्यावर निर्माण झालेल्या मतभेदांमुळे अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वात पूर्वाश्रमीच्या जनसंघी नेत्यांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. आरंभी गांधीवादी समाजवादाचा स्वीकार करणाऱ्या भाजपने अल्पावधीतच कट्टर हिंदुत्ववादी राजकारणाचा पुरस्कार करून पक्षाला उभारी दिली. मात्र पुढे आघाडीच्या राजकारणाच्या दबावामुळे भाजप'ने काहीसे उदारमतवादी धोरण स्वीकारले. परंतु २०१४ व २०१९ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रात हुकमी बहुमताचे सरकार स्थापन केल्यावर भाजप'ने बाजूला ठेवलेले कार्यक्रम भक्कमपणे राबविण्यास सुरुवात केली आहे.

**प्रस्तावना**

भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यावर आरंभीच्या काळात अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाचा प्रभाव पक्षावर राहिल्यामुळे त्यांनी जशी भाजप'च्या राजकारणाला दिशा दिली त्याप्रमाणे पक्षाची वाटचाल होत राहिली. मात्र २०१४ पासून भाजप'चे नेतृत्व नरेंद्र मोदी यांच्याकडे आल्यावर त्यांचा प्रभाव भाजपच्या ध्येय धोरणांवर पडल्याचे दिसते. प्रस्तुत शोधनिबंधात भाजप'च्या या राजकीय वाटचालीचा आढावा घेतला आहे.

**भाजपचा राजकीय वाटचालीसंबंधी आरंभीचा सैद्धांतिक दृष्टिकोन**

१८ मार्च १९८० रोजी जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने साध्या बहुमताने दुहेरी सदस्यत्वाच्या विरोधात एक प्रस्ताव पारित केला आणि जनसंघीय गटास अपमानित करून जनता पक्ष सोडण्यास भाग पाडले. जनसंघीय गटाच्या सदस्यांनी ६ एप्रिल १९८० रोजी मुंबई येथे एक अधिवेशन भरवून 'भारतीय जनता पक्ष' नावाने एका नविन पक्षाची स्थापना केली.१ अटलबिहारी वाजपेयींची भाजपचे प्रथम अध्यक्ष म्हणून निवड झाली तर लालकृष्ण आडवाणी, सिकंदर बख्त व मुरली मनोहर जोशी यांची पक्षाच्या महासचिव पदी निवड झाली. "भाजप स्थापनेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष जरी वाजपेयी असले तरी, ते अधिवेशन यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री.बाळासाहेब देवरस यांनी प्रमुख भूमिका बजावली."२ ६ मे १९८० रोजी भाजप'ने घोषित केलेल्या आपल्या जाहीरनाम्यात पक्षाची ध्येयधोरण विषयक पंचनिष्ठा जाहीर केली. त्यामध्ये राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय समन्वय, लोकशाही, प्रभावी धर्मनिरपेक्षता, गांधीवादी समाजवाद आणि सैद्धांतिक राजकारण यांचा समावेश होता.३ याप्रकारे, भाजपने 'गांधीवादी समाजवाद' हे आपले ध्येय असल्याचे जाहीर केले होते.

भारतीय जनसंघाचा उल्लेख करताना वाजपेयी यांनी स्पष्ट शब्दात म्हटले होते की, "भारतीय जनता पक्षाचा भारतीय जनसंघाचे काहीही संबंध नाही जनसंघास यमुनेत बुडविले आहे आणि दिवा देखील विझला आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला जनसंघाचे नवीन रूप किंवा त्याचा उत्तराधिकारी म्हणणे पूर्णतः चूक ठरेल. तसेच ज्या मंडपात भारतीय जनता पक्षाचे स्थापना संमेलन झाले होते तेथे गांधीजी आणि जयप्रकाश यांचे फोटो लावलेले होते. परंतु जनसंघाचे निर्माते श्यामाप्रसाद मुखर्जी आणि दिनदयाळ उपाध्याय यांचे फोटो मात्र नव्हते.४ तरीदेखील भाजप या पक्षाचे बहुतेक सर्व प्रमुख नेते आणि बहुसंख्य कार्यकर्ते हे १९७७ पूर्वी भारतीय जनसंघात होते. त्यामुळे भाजप हा जनसंघाचा नवा अवतार मानला गेला.५ भाजप' मध्ये सिकंदर बख्त, राम जेठमलानी, शांतिभूषण व के.एस.हेगडे यांच्यासारखे जनसंघ व रा. स्व. संघाशी कोणताही संबंध नसलेले लोक देखील सामील झाले होते

**भाजप' चे हिंदुत्ववादी राजकारणाकडे संक्रमण**

भाजप'ची विचारप्रणाली 'गांधीवादी समाजवाद असेल असे वाजपेयींनी घोषित केल्यामुळे त्यांचा भाजपला एक मध्यममार्गी पक्ष बनविण्याचा इरादा त्यातून व्यक्त झाला. पण सर्वच नेते व कार्यकर्ते संघाच्या मुशीत घडलेले असल्यामुळे त्यांचा स्वभाविक कल हिंदुत्ववादी राजकारणाकडे होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव, कार्यकर्त्यांचे दडपण आणि १९८४ च्या निवडणुकीतील अपयश यांच्या पार्श्वभूमीवर भाजपने हिंदू राष्ट्रवादाचा विचार स्वीकारून हिंदू संघटनांचे राजकारण करण्यास सुरुवात केली.६ वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील उदारमतवादी राजकारणाचे अभियान अयशस्वी झाल्यावर पक्षाने हिंदुत्व आणि हिंदू कट्टरवादाचे पूर्ण कट्टरतेने पालन करण्याचा निर्णय घेतला. १९८४ मध्ये आडवाणी यांना पक्षाचे अध्यक्ष नियुक्त करण्यात आले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली भाजप रामजन्मभूमी आंदोलनाचा राजकीय आवाज बनला७ पुढील काळात भाजपने कायमच हिंदुत्व आणि राम मंदिर ह्या मुद्द्यांचा वापर करून सत्तेत येण्याचा प्रयत्न केला व त्यात भाजप यशस्वी देखील झाला.

**आघाडीच्या राजकारणाचा दबाव : भाजप'ची काही जहाल मुद्द्यांना स्थगिती**

१९९६ मध्ये वाजपेयींच्या नेतृत्वाखाली भाजपचे अल्पमतातील आघाडी सरकार १३ दिवसात पडल्यामुळे हिंदुत्ववादी राजकारणाच्या आधारे केंद्रात स्वबळावर सत्ता स्थापन करणे शक्य नसल्याची जाणीव भाजपला झाली होती. त्यामुळे भाजपने काही इतर



T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

पक्षांबरोबर संयुक्त आघाडी स्थापन करण्याचे ठरवुन त्यासाठी भाजपच्या कार्यक्रम पत्रिकेवरील हिंदुत्वाचा भाग बाजुला ठेवण्याचे ठरविले. भाजपने जे तीन मोठे कार्यक्रम बाजूला ठेवण्याचे ठरविले ते म्हणजे, रामजन्मभूमी, काश्मिर बाबतचे ३७० कलम वगळणे व समान नागरी कायदा हे होते. भाजपने अशाप्रकारचा बदल बिहारमध्ये समता पार्टी, पंजाबमध्ये अकाली दल, ओरिसात बिजू जनता दल, तामिळनाडूमध्ये एआयडीएमके या प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा मिळविण्यासाठी केला होता. त्यामुळे वेगवेगळे पक्ष भाजप नेतृत्वातील 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'त सहभागी झाले.

१९९८ च्या लोकसभा निवडणूकीत ५४३ जागांपैकी भाजपला १८२ जागा मिळाल्या व तो लोकसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला८ तर रालोआ'ला २५४ जागा मिळाल्या. चंद्राबाबू नायडूंच्या तेलगू देसम पक्षाने रालोआ'ला बाहेरून पाठिंबा दिल्यामुळे १३ मतांनी विश्वासदर्शक ठराव जिंकण्यात 'रालोआ'ला यश लाभले आणि १९ मार्च १९९८ रोजी अटलबिहारी वाजपेयींनी दुसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली.९ पुढे १९९९ व २००४ च्या लोकसभा निवडणूकीत देखिल भाजप'ला आघाडीचे राजकारण करून सत्ता हस्तगत करता आली. मात्र त्यासाठी भाजप'ला आपल्या प्रखर हिंदुत्ववादी राजकारणाला आवर घालावी लागली होती.

**मोदींच्या नेतृत्वातील भाजप : पक्षाच्या जाहिरनाम्यातील कार्यक्रमांची अंमलबजावणी**

२०१४ च्या लोकसभा भाजपने आक्रमक हिंदुत्ववादी चेहरा असललेले नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदाचे उमेदवार घोषित केले होते. या निवडणूकीत भाजप प्रणित रालोआ'ला ३३६ जागा मिळाल्या भाजपला २८२ जागा मिळुन तो लोकसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला होता. काँग्रेस प्रणित 'संयुक्त पुरोगामी आघाडी' (संपुआ) ला केवळ ५९ जागा मिळाल्या आणि काँग्रेस पक्ष फक्त ४४ जागा जिंकू शकला, तर इतर पक्षांना मिळून १४८ जागा प्राप्त झाल्या.१० लोकसभेतील भक्कम बहुमताच्या पाठिंब्यामुळे या सरकारने पाच वर्षाचा कार्यकाल यशस्वीपणे पूर्ण केला. त्यानंतर २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूकीत पुनः एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात रालोआ'ला लोकसभेत एकुण ३५४ जागा व ४५ टक्के मते मिळाली.

तिहेरी तलाक बेकायदेशिर ठरविणारा कायदा केल्यानंतर अवघ्या पाच दिवसातच, रालोआ (भाजप) सरकारने जम्मू-काश्मिरला विशेष राज्याचा दर्जा देणारे कलम ३७० रद्द करण्याचा ऐतिहासिक व धाडसी निर्णय घेतला. यामुळे जम्मू-काश्मिरची स्वतंत्र राज्यघटना, स्वतंत्र ध्वज, संपत्ती वाटपातील वेगळे नियम, मालमत्ता खरेदीवरील बंदी अशा तरतूदी रद्द ठरल्या आहेत. "कलम ३७० विरोधात जनसंघ आणि त्यानंतर भाजपने गेली सत्तर वर्षे राजकारण केले. या पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात सातत्याने हे कलम रद्द करण्याची ग्वाही दिली जात होती. त्या ग्वाहीचीच पूर्तता नरेंद्र मोदी यांच्या सरकारने अखेर केली." १३ या प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीत भाजपच्या मूळ अजेंड्यावरील कार्यक्रम अधिक कणखरपणे राबविले जात असल्याचे दिसत आहे.

**वादावर सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा 'बाबरी मशीद – रामजन्मभूमी'**

२०१९ मध्ये शनिवार, दि.९ नोव्हेंबर रोजी अयोध्येतील वादग्रस्त जागा राम मंदिर बांधण्यासाठी तसेच अयोध्येतच पाच एकर जमीन मशिदीसाठी देण्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. या ऐतिहासिक निकालामुळे शंभर वर्षाहून अधिक जुना वाद संपुष्टात आला. सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखाली न्या.शरद बोबडे, न्या.धनंजय चंद्रचूड न्या.अशोक भूषण आणि न्या. एस. अब्दुल नझीर यांच्या खंडपीठाने हा निकाल एकमताने दिला सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी ऑगस्ट मध्ये दररोज सुनावणी घेऊन हा वाद निकाली काढण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार निवृत्तिआधी त्यांनी प्रदीर्घ काळ रेंगाळलेल्या या घटल्यावर चाळीस दिवस सुनावणी घेतली आणि शनिवारी निकाल दिला. न्या.गोगोई यांनी १०४५ पानी निकालपत्रातील महत्त्वाचा भाग वाचून दाखवला. राम जन्मभूमी - बाबरी मशीद जागा वादाला राजकीय रंग देत भाजपने सत्ताही मिळवली होती. आता भाजप सरकारच्या काळातच या वादावर पडदा पडला आहे.[१४] हा निकाल देताना न्यायालयाने कायद्याच्या काटेकोर चौकटीच्या बाहेर जाऊन पक्षकारांमध्ये खऱ्या अर्थाने न्यायनिवाडा करण्यासाठी राज्यघटनेने अनुच्छेद १४२ अन्वये दिलेल्या विशेषाधिकाराचा वापर केला.[१५]

**निष्कर्ष**

जनसंघाचा नवा अवतार मानल्या जाणाऱ्या भाजप'च्या राजकीय वाटचालीवर अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण आडवाणी या नेत्यांचा प्रभाव पडलेला आहे. त्यांनी पक्षवाढीसाठी भाजपच्या ध्येय धोरणांना गरजेनुसार योग्य दिशा देण्याचे काम केले आरंभी स्वीकारलेला 'गांधीवादी समाजवाद' फारसा उपयोगी ठरत नसल्याचे लक्षात येताच, त्यांनी 'कट्टर हिंदुत्ववादी' राजकारणाचा मुद्दा केंद्रस्थानी आणून पक्षविस्तार केला. पण आघाडीच्या राजकारणाच्या विवशतेमुळे 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' स्थापन करण्यासाठी भाजपने १९९८ मध्ये आपल्या कट्टर हिंदुत्ववादी राजकारणाला आवर घातली. मात्र २०१४ व २०१९ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपने केंद्रात स्वबळावर सत्ता स्थापन करण्याजोगे बहुमत मिळवून रालोआ'वर देखील वर्चस्व प्रस्थापित केले व भाजप जाहीरनाम्यातील कार्यक्रमांना बिनदिक्कतपणे राबविण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सोबतच भाजप'ची एकपक्षीय वर्चस्वाच्या दिशेने देखील वाटचाल सुरू आहे.

**संदर्भ सूची**

1.अभय सिंह, 'भारतीय जनता पार्टी - कल, आज और कल', समय प्रकाशन, नई दिल्ली, २००८, पृ.१६

2.कित्ता

3.पुखराज जैन व बी.एल.फडिया, 'भारतीय शासन एंव राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, २००८, पृ.३९२



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

४.अभय सिंह, 'भारतीय जनता पार्टी - कल, आज और कल', समय प्रकाशन, नई दिल्ली, २००८, पृ.१६
५.सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर (संपा.), 'असा घडला भारत १९४७-२०१२', रोहन प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.४६५
६.कित्ता, पृ.४६६
७.प्रताप कुमार, 'भारतीय लोकतंत्र में राजनीतिक दल', आर्या पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २०१५, पृ.१५४
८.स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन जनरल इलेक्शन १९९८, टू द ट्वेल्वंथ लोकसभा व्हॉल्युम-१, इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया, न्यू दिल्ली
९.उपरोक्त, सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर(संपा.), 'असा घडला भारत', पृ.६६३
१०. इंडिया टुडे ५ जुन २०१९, पृ.११
११.फ्रंटलाइन, इलेक्शन स्पेशल - ५, ७ जून २०१९, पृ.८
१२. लोकसत्ता (ऑनलाइन), दि.१ ऑगस्ट २०११
१३. लोकसत्ता, दि.६ ऑगस्ट २०१९, पृ.१
१४. लोकसत्ता, मुंबई आवृत्ती, दि.१० नोव्हेंबर २०१९, पृ.१,२
१५.लोकमत, जळगाव आवृत्ती, दि.१० नोव्हेंबर २०१९, पृ.६

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - II**
**Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development**

December 2020










**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Manoj S. Kamat**

Principal,
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor : Prof. F. M. Nadaf**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt. V.U. Patil College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule Dr. B.S. Desale Science

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**December 2020**

## Special Issue-Volume-II
## On

## *Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Manoj S. Kamat**
Professor & Principal
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor**
**Dr. F. M. Nadaf**
Vice Principal & Professor of Geography
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| **Prof. Camena Guneratne** (Sri Lanka) | | **Dr. RiaAerts** (Australia) |
| **Dr. Mohamed Izhar Hasan** (Rohtak) | **Prof. S. I. Biradar** (Dharwad) | **Dr. Bindhy Wasini Pandey** (New Delhi) |
| **Dr. Biswajit Roy Chowdhury** (Kolkata) | **Dr. Shyam Khinchi** (Ganganagar) | **Dr. Keya Das Ghosh** (Kolkata) |
| **Dr. Suryawanshi M V** (Aurangabad) | **Dr. C. P. Hiremath** (Goa) | **Dr. Sucheta Naik** (Goa) |
| **Shri. Vividh Pawaskar** (Goa) | **Dr. Pramada Gauns Desai** (Goa) | **Dr. Monika Kannan** (Ajmer) |
| **Dr. Arvind Haldankar** (Goa) | **Dr. L. T. Nayak** (Dharwad) | **Dr. Rupa Chari** (Goa) |

**Published by-** Dr. Manoj S. Kamat, Professor & Principal.DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule ★

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

# बिहार विधानसभा निवडणूक - २०२० : प्रादेशिक पक्षांचे प्रभावशाली राजकारण

**शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे – ४२४३०४
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**सारांश (Abstract)**

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० मध्ये पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल हे सर्वांनाच अचंबित करणारे ठरले. मतदानानंतर आलेल्या विविध संस्थांच्या अंदाजानुसार राष्ट्रीय जनता दल(राजद) व कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या महागठबंधन'ला सर्वाधिक जागा मिळून त्यांचे सरकार स्थापन होईल असे भाकीत करण्यात आले होते मात्र निवडणूक निकालानंतर भाजप व जनता दल (यु) (जदयु) यांच्या नेतृत्वातील रालोआ'ला बहुमत मिळाले व जदयु'चे नेते नितीश कुमार यांची सातव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली तर भाजपकडे दोन उपमुख्यमंत्री व विधानसभा अध्यक्ष पद आले. या निवडणुकीत राजद'ला ७५ जागा तर भाजपला ७४ जागा मिळाल्या आणि जदयु'ला केवळ ४३ जागा मिळाल्या. भाजपने निवडणुकीपूर्वीच मुख्यमंत्री पदासाठीचा उमेदवार म्हणून जदयु या मित्रपक्षाचे नेते नितीश कुमार यांच्या नावाची घोषणा केली होती. निवडणूक निकालानंतर भाजपला जदयु पेक्षा अधिक जागा मिळून देखील भाजपने रालोआ'चे नेते म्हणून नितीशकुमार यांची निवड करून त्यांना मुख्यमंत्रीपदी विराजमान केले भाजपच्या या त्यागापाठीमागे निस्वार्थ भूमिका नसून राष्ट्रीय राजकारणातील आपले स्थान भक्कम ठेवण्यासाठी प्रादेशिक मित्रपक्षांना सांभाळून ठेवण्यासाठी त्यांनी आखलेली ती एक रणनीती आहे. कारण 'शिवसेना' व 'शिरोमणी अकाली दल' यासारखे रालोआ'मधील जुने मित्रपक्ष बाहेर पडल्यामुळे इतर प्रादेशिक मित्रपक्षांमध्ये विश्वास निर्माण करणे ही भाजपची गरज आहे. तर दुसरीकडे महागठबंधन'ची संपूर्ण धुरा लालूप्रसाद यांचे सुपुत्र व राजदचे तरुण नेतृत्व तेजस्वी यादव यांच्या खांद्यावर होती त्याचवेळी कॉंग्रेस या राष्ट्रीय पक्षाला राजद'च्या तुलनेत दुय्यम स्थान होते. याप्रकारे २०२० च्या विधानसभा निवडणुकीत खरा सत्तासंघर्ष हा प्रादेशिक पक्षांमध्ये होता. म्हणून प्रादेशिक पक्षांच्या वर्चस्ववादी राजकारणाची चर्चा या शोध निबंधात केली आहे.

**प्रस्तावना**

बिहार हे भारतातील एक मोठे राज्य असून राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिकोनातून या राज्यावर पकड असणे राष्ट्रीय पक्षांसाठी महत्त्वाचे असते. पूर्वी कॉंग्रेस पक्षाचे प्रभुत्व असलेल्या या बिहारमध्ये नंतरच्या काळात जनता दलाने आपला पाया मजबूत केला होता. मात्र हळूहळू जनता दलात नेतृत्वातील मतभेदांमुळे काही प्रादेशिक पक्षांचा जन्म बिहारमध्ये झाला. त्यामध्ये लालूप्रसाद यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय जनता दल, शरद यादव व नितीशकुमार यांच्या नेतृत्वातील जनता दल (युनाइटेड) आणि रामविलास पासवान यांचा लोकजनशक्ती पार्टी या पक्षांचा अंतर्भाव होतो हे पक्ष मूळ स्वरूपात प्रादेशिक पक्ष म्हणून जन्मले नसून राष्ट्रीय पक्षात पडलेल्या फुटीमधून त्यांचा जन्म झालेला आहे. उपरोक्त प्रमुख प्रादेशिक पक्षांबरोबरच २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत जितनराम मांझी यांचा हिंदुस्तानी अवाम मोर्चा (धर्मनिरपेक्ष) व मुकेश सहानी यांचा विकासशील इंसान पार्टी या प्रादेशिक पक्षांनी देखील आपला प्रभाव अधोरेखित केला. राष्ट्रीय पक्षांच्या कामगिरीकडे पाहत भाजपचे बळ वाढले असुन कॉंग्रेस पक्ष बिहारमध्ये शेवटच्या घटका मोजत असल्याचे दिसते तर डावे पक्ष त्यांचा प्रभाव राखून आहेत. तसेच एआयएमआयएम सारखे इतर राज्यातील जातीयवादी किंवा धार्मिक पक्ष बिहारमध्ये सिमांचल भागात प्रभाव वाढवत असल्याचे दिसते. तरीही बिहारमधील प्रमुख सत्तासंघर्ष हा तेथील राजद व जदयु या प्रादेशिक पक्षांमध्ये असल्याचे दिसते आणि या सत्तासंघर्षात पासवान यांचा लोजपा हा प्रादेशिक पक्ष देखील प्रभावी भूमिका बजावत असल्याचे दिसते. त्याचा प्रत्यय २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत आला आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात बिहार मधील प्रादेशिक पक्षांच्या प्रभावशाली राजकारणाची चर्चा केली आहे.

**प्रादेशिक पक्षांची प्रभावशिलता दर्शविणारा बिहार विधानसभा निवडणूकीचा निकाल**

बिहार विधानसभा निवडणूक २०२० तीन टप्प्यांमध्ये पार पडली. पहिल्या टप्प्यासाठी २८ ऑक्टोबर रोजी मतदान झाले तर दुसऱ्या टप्प्यासाठी 30 नोव्हेंबर रोजी आणि तिसर्या व शेवटच्या टप्प्यासाठी 7 नोव्हेंबर रोजी मतदान झाले. १० नोव्हेंबर रोजी मतमोजणीला सुरुवात होऊन रात्री उशिरापर्यंत सर्व जागांचे निकाल जाहीर झाले."१. कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे मतमोजणी व निकाल जाहीर करण्यास विलंब झाल्याचे निवडणूक आयोगाने संगितले. या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (रालोआ) १२५ जागा आणि ३७.२६ टक्के मते मिळाली तर महागठबंधन'ला ११० जागा व सर्व ३०.२३ टक्के मते मिळाली. बिहारमधील प्रमुख प्रादेशिक पक्ष असणाऱ्या राष्ट्रीय जनता दलास .जागांवर विजय मिळून तो विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला ७५ (राजद) मात्र मागील निवडणुकीच्या तुलनेत त्याच्या जागा घटल्या. उलट भाजपला ७४ जागा मिळून मागील निवडणुकीच्या तुलनेत भाजपच्या जागांमध्ये वाढ झाली. जनता दल (यु) व कॉंग्रेस या पक्षांना अनुक्रमे ४३ व १९ जागा मिळाल्या आणि गेल्या निवडणुकीच्या तुलनेत त्यांच्या जागांमध्ये मोठी घट झाली. बिहार राज्यात मुस्लिमांचा प्रभाव असलेल्या सीमांचल भागात 'एआयएमआयएम' या पक्षाने ५ जागांवर विजय मिळवला. डाव्या पक्षांनींही चांगली कामगिरी केली व भाकप (मार्क्सवादी-लेनिनवादी) (लिबरेशन) या पक्षाने १२ जागा जिंकल्या. तर



T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

भाकप व माकप यांना प्रत्येकी २ जागा मिळाल्या. यावेळी प्रथमच विधानसभा निवडणूक लढणाऱ्या विकासशील इंसान पार्टीने ४ जागा पटकावल्या.२ तर हिंदुस्तानी अवाम मोर्चा (एस) पक्षानेही ४ जागा जिंकल्या आणि एक अपक्ष उमेदवार निवडून आला.

**२०१५ व २०२० च्या बिहार विधानसभा निवडणूकीतील राजकीय पक्षांची कामगिरी**

| राजकीय पक्षाचे नाव | निवडणूक वर्ष २०१५ - | | | निवडणूक वर्ष २०२० - | | | जागा वाढ/(+) घट (-) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विजयी जागा | मतांची टक्केवारी | लढलेल्या जागा | विजयी जागा | मतांची टक्केवारी* | लढलेल्या जागा* | |
| भाजप | ५३ | २४ ४२. | १५७ | ७४ | १९ ४६. | ११० | २१+ |
| कॉंग्रेस | २७ | ६ ६६. | ४१ | १९ | ९ ४८. | ७० | ८- |
| बसपा | ० | २ ०७. | २२८ | १ | १ ४९. | ८० | १+ |
| भाकप | ० | १ ३६. | ९८ | २ | ० ८३. | ६ | २+ |
| माकप | ० | ० ६१. | ४३ | २ | ० ६५. | ४ | २+ |
| राजद | ८० | १८ ३५. | १०१ | ७५ | २३ ११. | १४४ | ५- |
| जनता दल (यु) | ७१ | १६ ८३. | १०१ | ४३ | १५ ३९. | ११५ | २८- |
| लोजपा | २ | ४ ८३. | ४२ | १ | ५ ६६. | १३४ | १- |
| बीएलएसपी | २ | २ ५६. | २३ | ०* | १*७७. | १०४* | २- |
| भाकप(एल)(एल-एम) | ३ | १ ५४. | ९८ | १२ | १*६६. | १९ | ९+ |
| एआयएमआयएम | ० | ० २१. | ६ | ५ | १ २४. | २० | ५+ |
| एचएएम (एस) | १ | २ २७. | २१ | ४ | १*४१. | ७ | ३+ |
| व्हीआयपी | - | - | - | ४ | १*५२. | ११ | ४+ |
| अपक्ष | ४ | ९ ३९. | ११५० | १ | - | - | ३- |
| एकुण जागा | २४३ | - | - | २४३ | - | - | - |

(* माहितीचा स्रोत विकिपीडिया)

स्रोत : 1.Statistical Report on General Election,2015 To The Legislative Assembly of Bihar.

3. Election Commission of India, New Delhi (https://eci.gov.in/files/file/3904-bihar-2015/)

2.Election Commission of India, https://results.eci.gov.in/ACTRENDS2020/partywiseresult-S04.htm 3.Wikipedia, https://en.wikipedia.org/wiki/2020_Bihar_Legislative_Assembly_election

### नितीश कुमार सातव्यांदा बिहारच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान

निवडणूक निकालानंतर दि१५ नोव्हेंबर २०२० रोजी नितीश कुमार यांच्या निवासस्थानी राज्यातील भाजप आणि जदयुच्या वरिष्ठ नेत्यांची महत्त्वाची बैठक झाली. यावेळी संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच मित्रपक्षांचे आमदारही या बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी नितीश कुमार यांची रालोआ'च्या विधिमंडळ नेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर रालोआ'चे नेते राजभवनात गेले व त्यांनी राज्यपाल फागू चव्हाण यांची भेट घेऊन रालोआ'च्या सत्ता स्थापनेचा दावा केला. त्यावर राज्यपालांनी नितीश कुमार यांना नवीन सरकार बनविण्यासाठी निमंत्रण दिले बिहार विधानसभा निवडणुकीत जदयु'ला ४३ आणि भाजपला ७४ जागा मिळाल्या. जदयु'ला कमी जागा मिळाल्याने नितीश कुमार यांनी रालोआ'च्या बैठकीत भाजपचा मुख्यमंत्री व्हावा अशी विनंती करून 'भाजपने सरकार स्थापन करावे, त्याला जेडीयूचे समर्थन असेल', असा प्रस्तावही त्यांनी ठेवला होता. मात्र राजनाथसिंह यांच्यासह भाजप नेत्यांनी तो अमान्य करून रालोआ'च्या नेतेपदी नितीश कुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. तसेच भाजप आमदारांच्या गटनेतेपदी तारकिशोर प्रसाद यांची व उपनेतेपदी रेणू देवी यांची निवड करण्यात आली. गेल्या दोन वर्षात भाजपने आपले दोन जुने मित्रपक्ष शिवसेना व शिरोमणी अकाली दल यांना गमावले आहे आणि आता जनता दल (यु) कमकुवत झाल्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीत भाजपशिवाय दुसरा कोणताही महत्त्वाचा पक्ष नाही. अशा परिस्थितीत नितीश कुमारांना पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान करून भाजपला "मनाचा मोठेपणा" दाखवण्याची ही संधी प्राप्त झाली व यामुळे भाजपला चांगल्या आघाडीचा भागीदार असल्याचे दाखवण्यास मदत होईल.५ अर्थात रालोआ'च्या घटकपक्षांमध्ये भाजपची मलीन होत चाललेली प्रतिमा सुधारण्यासाठी भाजप याचा फायदा करून घेऊ इच्छित असल्याचे दिसते. बिहारमध्ये नव्याने स्थापन झालेल्या रालोआ सरकारमध्ये आता भाजपचा वरचष्मा असला तरी नितीश कुमार यांना गृह आणि कार्मिक विभाग का सारखी महत्त्वाची खाती स्वतःकडे ठेवण्यात यश आले आहे. मात्र विधानसभेचे अध्यक्षपद ते स्वतःच्या पक्षाकडे ठेवू शकले नाहीत आणि राज्यात प्रथमच दोन उपमुख्यमंत्रीपदे निर्माण करण्यापासून ते भाजपला रोखू शकले नाही.६ २५ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप आमदार विजयकुमार सिन्हा यांची बिहार विधानसभेच्या अध्यक्षपदी बहुमताने निवड झाली. सिन्हा या सत्तारूढ रालोआ'च्या उमेदवारास १२६ मते मिळाली तर महागठबंधनचे उमेदवार राजद'चे अवधबिहारी चौधरी यांना ११४ मते मिळाली. त्यानंतर मुख्यमंत्री आणि तारकिशोर प्रसाद व रेणू देवी या दोन उपमुख्यमंत्र्यांसह विरोधी



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

पक्षनेते तेजस्वी यादव यांनी सिन्हा यांना अध्यक्षाच्या आसनावर सन्मानाने बसविले७ बिहारमध्ये ५१ वर्षानंतर म्हणजेच १९६९ नंतर पहिल्यांदा विधानसभा अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. यापूर्वी सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारास बिनविरोध अध्यक्ष निवडण्याची परंपरा चालत आली होती. मात्र यावेळी विरोधी पक्षात बसलेल्या महागठबंधनने आपली ताकद दाखवून देण्यासाठी उमेदवार उभा केला होता.८ यावेळी बिहारचे माजी मुख्यमंत्री जितनराम मांझी यांनी प्रोटेम स्पीकर म्हणून काम पाहिले

**बिहार विधानसभा निवडणुकीचे विश्लेषण**

बिहार विधानसभा निवडणुकीतून तीन प्रमुख बाबी समोर आल्या. एक, ४२ वर्षाचे असताना मुख्यमंत्री पदावर विराजमान झालेले लालूप्रसाद यादव यांनी पंधरा वर्षे राज्य केले. त्या कारकीर्दीतील चारा घोटाळ्याच्या खटल्यात त्यांना शिक्षा झाली. त्यांच्या अनुपस्थितीत राष्ट्रीय जनता दलाचे काय होणार याला उत्तर मिळाले आणि 'मॅन इन ॲक्शन' च्या रूपात तेजस्वी यादव यांचे नेतृत्व उदयाला आले. दुसरे म्हणजे, लालूप्रसाद यांचे विरोधक नितीश कुमार यांनीही बिहारवर पंधरा वर्षे राज्य केले आहे आणि त्यांची ही अखेरची निवडणूक आहे असे सांगून त्यांनी सहानुभूतीने का असेना जागा जिंकण्यात तिसरे स्थान मिळविले. तिसरा निष्कर्ष म्हणजे देशावर राज्य करणाऱ्या भाजप'ने या निवडणुकीद्वारे बिहारच्या राजकारणावर पकड निर्माण करण्यासाठी प्रथम क्रमांक पटकावला आहे. वरवर पाहता भाजपला पक्ष म्हणून मिळालेले यश उल्लेखनीय आहे आणि राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने भाजपला राज्यसभेत आपले संख्याबळ वाढविण्यासाठी त्याचा उपयोग होणार आहे. परंतु किंचितसे सखोल निरीक्षण केले असता भाजपच्या मतांच्या टक्केवारीत घट झाल्याचे आणि महागठबंधनच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी पक्ष असलेल्या शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा बिहार विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सीमोल्लंघनाचा प्रयत्न अपयशी ठरला. एवढेच नव्हे तर या दोन्ही पक्षांना 'नोटा' (उमेदवारांना मत न करण्याचा पर्याय) पेक्षाही कमी मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसला ०.२२ टक्के तर शिवसेनेला त्याहून कमी म्हणजे ०.०४ टक्के मिळाली आहेत. बिहार निवडणुकीच्या संदर्भात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस'चे अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी म्हटले की, "बिहारमधील निवडणूक तेजस्वी यादव विरुद्ध भाजप अशी होती. भाजपची केंद्रात सत्ता असल्यामुळे पूर्ण ताकतीने ते या निवडणुकीत उतरले. मात्र वयाने तरुण असलेल्या तेजस्वी यादव यांना बहुमत मिळाले नसले तरी देशातील राजकारणात हळूहळू बदल होत आहे तामिळनाडूच्या निवडणुकीवर बिहारमुळे काही परिणाम होईल असे वाटत नाही." असे मतही त्यांनी व्यक्त केले.

**निष्कर्ष**

२०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर भाजपच्या वाढत्या प्रभावामुळे प्रादेशिक पक्षांचा जोर कमी होत असल्याचे निरीक्षण अनेकांनी नोंदवले आहे. मात्र भाजपच्या यशाचे अवलोकन करत असताना भाजपच्या या यशात रालोआ'तील प्रादेशिक मित्रपक्षांचा वाटा असल्याचे दिसते. पण भाजपने हळूहळू आपल्या मित्रपक्षांना देखील कमजोर करण्याचे प्रयत्न सुरू केल्यामुळे भाजपचा सर्वात जुना मित्र पक्ष शिवसेना हा २०१९ मध्ये रालोआ'तून बाहेर पडला. तर २०२० मध्ये शिरोमणी अकाली दल हा दुसरा महत्त्वाचा व भाजपचा जुना मित्रपक्ष रालोआमधून बाहेर पडला. या पार्श्वभूमीनंतर ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपला निवडणुकीपूर्वीच आपला मित्रपक्ष असलेल्या जनता दल (यु) चे नेते नितीश कुमार यांना मुख्यमंत्रिपदाचे दावेदार घोषित करावे लागले आणि निवडणुक निकालानंतर जदयुला भाजपपेक्षा ३१ जागा कमी मिळाल्या असतांना देखील भाजपला नितीश कुमार यांनाच मुख्यमंत्रिपदासाठी रालोआचा नेता म्हणून मान्यता द्यावी लागली. तर विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या राजद'चे तरुण नेते तेजस्वी यादव यांच्याकडे विरोधीपक्ष नेत्याची भूमिका आली. याप्रकारे बिहारच्या राजकारणात प्रादेशिक पक्ष हे वर्चस्वशाली असल्याचे दिसते.

**संदर्भ सूची**

१. https://eci.gov.in/assembly-election/ae-2020-bihar/
२. विकिपीडिया (https://en.wikipedia.org/wiki/2020_Bihar_Legislative_Assembly_election#Summary)
३. सामना, नाशिक आवृत्ती, दि.१६ नोव्हेंबर २०२०, पृ.१
४. सकाळ, जळगाव आवृत्ती, दि.१६ नोव्हेंबर २०२०, पृ.१
५. इंडियन एक्सप्रेस, दि.१७ नोव्हेंबर २०२० https://indianexpress.com/article/explained/bihar-election-results-bjp-nda-narendra-modi-7047483/
६. सकाळ, जळगाव आवृत्ती, दि.१८ नोव्हेंबर २०२०, पृ.७
७. लोकसत्ता, औरंगाबाद आवृत्ती, दि.२६ नोव्हेंबर २०२०, पृ.५
८. https://www.bhaskar.com/local/bihar/news/bihar-legislative-assembly-speaker-election-assembly-session-news-update-127947000.html
९. लोकमत, जळगाव आवृत्ती, दि.११ नोव्हेंबर २०२०, पृ.४
१०. सकाळ, जळगाव आवृत्ती, दि.११ नोव्हेंबर २०२०, पृ.२
११. कित्ता
१२. कित्ता



T.S.S's Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science Coll
Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - II**
**Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development**



December 2020




**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Manoj S. Kamat**

Principal,
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor : Prof. F. M. Nadaf**





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**December 2020**

**Special Issue -Volume-II**

**On**

## *Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Manoj S. Kamat**
Professor & Principal
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor**
**Dr. F. M. Nadaf**
Vice Principal & Professor of Geography
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| Prof. Camena Guneratne (Sri Lanka) | | Dr. RiaAerts (Australia) |
| Dr. Mohamed Izhar Hasan (Rohtak) | Prof. S. I. Biradar (Dharwad) | Dr. Bindhy Wasini Pandey (New Delhi) |
| Dr. Biswajit Roy Chowdhury (Kolkata) | Dr. Shyam Khinchi (Ganganagar) | Dr. Keya Das Ghosh (Kolkata) |
| Dr. Suryawanshi M V (Aurangabad) | Dr. C. P. Hiremath (Goa) | Dr. Sucheta Naik (Goa) |
| Shri. Vividh Pawaskar (Goa) | Dr. Pramada Gauns Desai (Goa) | Dr. Monika Kannan (Ajmer) |
| Dr. Arvind Haldankar (Goa) | Dr. L. T. Nayak (Dharwad) | Dr. Rupa Chari (Goa) |

**Published by-** Dr. Manoj S. Kamat, Professor & Principal DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College, 1
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, December– 2020
Special Issue, Volume-II "Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development"

# प्रादेशिक पक्षांचे राजकारण प्रभावित करणाऱ्या घटकांचा परामर्श

**शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे – ४२४३०४
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**सारांश (Abstract)**

वर्तमान भारतीय राजकारणात राष्ट्रीय राजकारणाला प्रादेशिक पक्ष प्रभावित करत आहेत. याचे कारण प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव आणि राष्ट्रीय पक्षांचा घटता जनाधार असल्याचे दिसते. भारतीय राजकारणातील हा नवप्रवाह मागील चार दशकांपासून पहावयास मिळत आहे. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात प्रादेशिक पक्षांच्या राजकारणाला प्रभावित करणाऱ्या काही निवडक व महत्वपूर्ण घटकांची चर्चा केली आहे.

**प्रस्तावना**

भारतीय राजकारणात प्रमुख्याने नव्वदच्या दशकापासून प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढलेला असल्याचे दिसून येते तसेच राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करण्याची प्रादेशिक पक्षांची क्षमता अधिक वृद्धिंगत झाली आहे त्याचबरोबर राष्ट्रीय पक्षांचा जनाधार काहीसा कमकुवत होत असल्याचे देखील दिसत आहे. प्रादेशिक पक्षांचे राजकारण प्रामुख्याने प्रादेशिक अस्मितादर्शक व स्थानिक मुद्यांच्या आधारे संचालित होत असते. प्रस्तुत शोधनिबंधात प्रादेशिक पक्षांच्या राजकारणाला प्रभावित करणाऱ्या काही प्रमुख कारकांचा अभ्यास केला आहे.

**प्रादेशिक पक्षांचे राजकारण प्रभावित करणारे घटक**

प्रादेशिक पक्षांच्या राजकारणाला प्रभावित करणारे अनेक घटक असू शकतात. मात्र काही प्रमुख घटक प्रादेशिक पक्षांच्या उदय व विकासाला कारणीभूत ठरून त्यांना जनाधार संपादन करण्यासाठी पोषक वातावरण प्रदान करतात अशा प्रभावी काराकांमध्ये प्रामुख्याने पुढील घटकांचा समावेश होतो.

**भाषिक व प्रादेशिक अस्मिता**

मॉरीस जोन्स लिहितात की, "प्रदेशवाद आणि भाषेचा प्रश्न भारतीय राजकारणात एवढा ज्वलंत प्रश्न राहिलेला आहे की, त्याचा सध्याच्या राजकीय इतिहासावर खोलवर परिणाम झाला आहे. कधी कधी राष्ट्रीय एकात्मतेसमोरील खरी समस्या प्रदेशवाद हीच असल्याचे वाटते."[1] विशेष म्हणजे १९५६ ची राज्यपुर्नरचना भाषेच्या आधारावर झाली आणि प्रादेशिक पक्षांनी भाषा व प्रदेशाचा आधार घेऊन, आपली पाळेमुळे अधिक मजबूत केली व आपले प्रभावी राजकारण सुरू केले. म्हणून भाषिक व प्रादेशिक अस्मिता हे प्रादेशिक पक्षांचा उदय व विकासासाठी पोषक ठरणारा व त्यांचा प्रभाव वृद्धिंगत करणारा सर्वात महत्वाचा घटक आहे भारतातील बहुतांशी प्रादेशिक पक्षांच्या निर्मितीचा आणि राजकारणाचा आधार हाच घटक असल्याचे दिसते. उदा. महाराष्ट्रातील शिवसेना, तामिळनाडूमधील द्रमुक, अण्णा द्रमुक आदी.

**भौगोलिक आणि सांस्कृतिक प्रभाव**

भारतात प्रादेशिक पक्षांचा उदय हा भौगोलिक व सांस्कृतिक घटकांच्या उल्लेखनीय भूमिकेतून होतो अनेक प्रादेशिक राजकीय पक्षांनी हीच भावना जोपासत आपला प्रभाव निर्माण केला आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार आदि राज्ये ही आकाराने मोठी असल्यामुळे तेथील प्रादेशिक राजकारण वेगवेगळया स्वरूपाचे आहे. शिवाय तेथे प्रादेशिक अस्मितेपेक्षा आपण म्हणजे भारत आहोत, अशी एक नैसर्गिक भावना प्रचलित आहे. ऐतिहासिकदृष्ट्या प्रादेशिक राजकीय अस्मितेची येथे पार्श्वभूमी नाही. ब्रिटिश काळात वायव्य प्रांताचा काही भाग, अवध आणि इतर संस्थाने तसेच पूर्वेकडील प्रदेश या सर्वांचा मिळून १९३७ मध्ये संयुक्त प्रांत निर्माण करण्यात आला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्याला उत्तर प्रदेश असे नाव देण्यात आले या अवाढव्य प्रदेशाला स्वतःचे खास वेगळे आत्मभान नसल्यामुळे, त्याचा विस्तार आणि त्या विस्तृत भूप्रदेशाचे विभिन्न इतिहास यात शोधता येतात. मात्र हिंदी भाषा आणि हिंदू धार्मिक अस्मिता यांचा पगडा या राज्यात सर्वत्र पसरलेला आहे.[2] येथे प्रादेशिक अस्मितेपेक्षा हिंदू धर्म ही भावना अधिक व्यापक असल्यामुळे येथे प्रादेशिक पक्ष आपला प्रभाव पाडू शकले नाही. परंतु दक्षिणेकडील राज्यात मात्र सांस्कृतिक प्रभावामुळे प्रादेशिक पक्ष प्रभावी आहेत. तामिळनाडूचे लोक आपल्या संस्कृतीचा गर्व बाळगतात आणि याआधारावर ते रामासारख्या देवावर टीका करतात या कारणामुळेच १९७५ मध्ये येथे राम-लक्ष्मणाची पुस्तके जाळली होती.[3] दक्षिणेतील राजकीय पक्ष हिंदी भाषा व उत्तर भारतीय संस्कृतीचा विरोध करतात.

**आर्थिक घटकांचा प्रभाव**

प्रादेशिकतेच्या निर्मितीमध्ये आर्थिक घटक महत्त्वाचा आहे. एखादा प्रदेश सधन आहे किंवा निर्धन आहे, या दोन्ही बाबी राजकारणात तेवढ्याच महत्त्वाच्या ठरतात. सधन भाग हा विकासात नेहमी अग्रेसर असतो, तर निर्धन प्रदेश दुष्काळी व मागास राहतो. अशा स्थानिक मुद्यांना राष्ट्रीय पक्ष फारसे महत्त्व देत नाही, पण प्रादेशिक पक्ष मात्र असे मुद्दे आपला अजेंडा बनवतात. उदा. मुंबईतील मराठी तरुणांच्या रोजगाराचा मुद्दा, शेतकरी आत्महत्या, आर्थिक मागासलेपण इत्यादी प्रश्नांना शिवसेनेने प्राधान्य दिले आहे. देशात अशी अनेक



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

राज्य आहेत, की जेथे आर्थिक असमतोल पाहायला मिळतो. अशा परिस्थितीत निर्धन प्रदेशांमध्ये असंतोष निर्माण होतो व त्यामुळे तेथे अलगाववादाची भावना निर्माण होते. परिणामी विकासाच्या नावावर राज्याच्या स्वायत्ततेची मागणी केली जाते. उदा. आंध्र प्रदेशातील तेलंगणा, उत्तर प्रदेशातील पूर्वांचल, बुंदेलखंड येथे अशा प्रकारचे राजकारण घडले आहे.

**जातीचा प्रभाव**

भारतीय राजकारणात 'जातीयता' किंवा 'जातिवाद' हा शब्द बरेचदा वापरला जातो.त्याचा निश्चित अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न जरी कोणीही करत नसले तरी 'राजकीय हेतूसाठी जातीचा किंवा जाती भावनेचा उपयोग' या अर्थाने तो शब्द रूढ झाला आहे. 'जाती - जातीतील संघर्ष' यापेक्षा 'जातीय भावनांचा उपयोग हा असे त्यात अभिप्रेत असतो. म्हणजेच 'जात' ही राजकीय हेतू पूर्तीचे साधन म्हणून विचारात घेतली जाते. याचबरोबर दुसराही एक दृष्टिकोन अस्तित्वात दिसतो.या दृष्टिकोनानुसार स्वतःच्या जातीचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी स्वतः ती जातच राजकारणाचा साधन म्हणून उपयोग करते. या परस्परविरोधी दृष्टिकोनातून एक गोष्ट स्पष्ट होते की जात व राजकारण यांचा परस्परसंबंध भारतात प्रस्थापित झाला आहे.[5] म्हणून "सत्तेच्या महालात प्रवेश मिळवण्यासाठी राजकीय पक्षांना जातीच्या देवळी समोरून डोके वाकून जावे लागते. निरक्षर व्यक्ती देखील जातीचा आधार घेऊन विधानसभेत आणि लोकसभेत देखील निवडून येतात व प्रसंगी जाती मुळेच मंत्रीपदे ही पटकावतात. राजस्थानात तर 'जाट कि बेटी जाट को, जाट का व्होट जाट को' अशी म्हण प्रचलित आहे. भारतातील निरनिराळे राजकीय पक्ष मतदारांच्या जातीय भावना व निष्ठा जोपासतात आणि त्याचा फायदा करून घेतात. अगदी साम्यवादी पक्ष देखील याला अपवाद नाही. निवडणूक प्रचार मोहिमेत राजकीय पक्ष जातींचा नफा-तोटा यांच्या दृष्टीने विचार करतात. जातीच्या मुद्द्यावरच मंत्री मंडळी निर्माण केली जातात आणि जातीच्या मुद्द्यावरच ती गडगडली देखील जातात. मात्र उघडपणे कोणताही राजकीय पक्ष जातीवादाचा पुरस्कार न करता त्याचा अधिकारच करतो, मात्र वेळ येताच स्वार्थासाठी तिचा उपयोग करून घेतो."[6]

हेरॉल्ड गोल्ड यांच्यामते, 'जात राजकारणाचा आधार होण्यापेक्षा जात राजकारणाला प्रभावित करणारे एक तत्व आहे.' तर जयप्रकाश नारायण म्हणतात, 'जात भारतातील एक महत्त्वपूर्ण पक्ष आहे.' या दोन विधानावरून लक्षात येते की, जात राजकारणात अतिशय महत्त्वाची आहे. राष्ट्रीय राजकारणाबरोबरच प्रादेशिक राजकारणात जात महत्वाची भूमिका पार पाडते. एवढेच नाही तर प्रादेशिक स्तरावर जात हीच सर्वाधिक निर्णायक घटक ठरते. मायकेल ब्रेचर यांच्यामते, अखिल भारतीय राजकारणापेक्षा राज्यस्तरावरील राजकारणात जातीवादाचा प्रभाव अधिक आहे. कोणतेही राज्य यापासून सुटलेले नाही. बिहार, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान आदी. महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास जातीय गणिताच्या विश्लेषणाशिवाय करूच शकत नाही. बिहारच्या राजकारणात राजपूत, ब्राह्मण, कायस्थ, कुर्मी आणि आदिवासी प्रमुख प्रतिस्पर्धी जाती आहेत. स्वतंत्र झारखंडची मागणी एकाच जातीची मागणी होती केरळमध्ये साम्यवाद्याचे यश इजावहा जातीच्या समर्थनावर अवलंबून आहे. आंध्रप्रदेश मध्ये कामा आणि रेड्डी या जाती महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, ब्राह्मण, महार यांच्यात स्पर्धा असते. जे.ए.दस्तुर लिहितात, "ज्या दिवशी महाराष्ट्राची निर्मिती झाली, त्या दिवशीच या राज्याच्या राजकीय अभिजन वर्गात आणि राजकीय नेतृत्वात अधिक महत्त्वपूर्ण आणि मूलभूत परिवर्तन झाले सत्ता, प्रभाव आणि शक्ती ब्राह्मणाच्या हातून निघून मराठ्यांच्या हातात पोहोचली"[7] याचे उदाहरण म्हणजे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या प्रादेशिक पक्षांना मराठा जातीचा जनाधार मिळाला. गुजरातमध्ये पाटीदार व क्षेत्रीय, केरळमध्ये ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम इत्यादी. तामिळनाडू मध्ये ब्राह्मण जातीचे वर्चस्व होते, याविरुद्ध रामास्वामी नायकर यांनी 'द्रविड कळघम' नावाची संघटना स्थापन केली. ह्या संघटनेचे रूपांतर पुढे 'द्रविड मुन्नेत्र कळघम' पक्षात झाले. पुढे १९४९ मध्ये सी.एन.अन्नादुराई यांच्या नेतृत्वात 'द्रमुक' पक्षाने 'ब्राम्हण विरोध' व ब्राह्मणेतर समर्थनाचे धोरण अंगीकारले. जातीच्या प्रभावाची अशी अनेक उदाहरणे भारतातील राज्यांमध्ये आहेत. याप्रकारे, जातीय राजकारणामुळेच प्रादेशिक पक्षांना आपला प्रभाव निर्माण करता आला असल्याचे दिसते.

**महत्वाकांक्षाचे राजकीयीकरण**

भारतातील राजकीय पक्षांनी आपल्या महत्वकांक्षाच्या पूर्ततेसाठी प्रादेशिकतेला प्रोत्साहन दिले. या पक्षांनी प्रादेशिक विकास व स्थानिक समस्यांना प्राधान्य देऊन, त्या मुद्यांच्या आधारे राजकारण सुरू केले. याप्रकारे द्रमुक, अन्ना द्रमुक, अकाली दल, तेलगु देसम, आसाम गण परिषद, भारतीय राष्ट्रीय लोकदल, नॅशनल कॉन्फरन्स, आदी.[8] तसेच भारतात अने प्रादेशिक पक्षांची निर्मिती ही राष्ट्रीय पक्षात झालेल्या अंतर्गत मतभेदांमुळे किंवा फाटाफुटीमुळे झालेली आहे. म्हणून नेतृत्वाच्या वैयक्तिक महात्वाकांक्षांमुळे देखील प्रादेशिक पक्ष उदयाला आले आणि त्यांनी राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले आहे.

**निष्कर्ष**

प्रादेशिक पक्षांच्या जडणघडणीवर प्रादेशिक हितसंबंधाशी निगडित अनेक घटकांचा प्रभाव पडून त्यांचे राजकारण आकाराला येत असते. प्रादेशिक पक्षांवर प्रामुख्याने भाषिक व प्रादेशिक अस्मिता, भौगोलिक स्थिती, सांस्कृतिक वारसा, संबंधित प्रदेशाची किंवा राज्याची आर्थिक स्थिती, तेथील जातीयता आणि नेतृत्वाच्या महत्त्वाकांक्षाचे राजकीयीकरण आदी घटकांचा निर्णायक प्रभाव पडत असतो. प्रादेशिक पक्ष हे प्रामुख्याने स्थानिक व प्रादेशिक मुद्द्यांना ऐरणीवर आणून राजकारण करतात. म्हणून राष्ट्रीय पक्षांच्या तुलनेत स्थानिक मतदारांना प्रादेशिक पक्ष जवळचे वाटतात त्यामुळे त्यांचा जनाधार अधिक भक्कम होत आहे परिणामी प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करत असल्याचे चित्र दिसत आहे.



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

**संदर्भ सूची**

१३. जैन पुखराज व फडिया बी.एल., 'भारतीय शासन एवं राजनीति', २००८, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, पृ.४८२
१४. पळशीकर सुहास, 'देश – प्रदेश : प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा', द युनिक अॅकॅडमी, पुणे, २०१५, पृ.१८७,१८८
१५. नीलम देवी, 'भारतीय राजनीति में पड़ने वाले क्षेत्रवाद के प्रभाव का विश्लेषणात्मक अध्ययन', जर्नल ऑफ अॅडवान्स अँड स्कॉलरली रिसर्चेस इन अलाइड एज्युकेशन, व्हॉल्यूमः १५, इश्यू : १२, डिसेंबर २०१८, इग्निटेड माइंडस जर्नल, ई-आयएसएसएन २२३०-७५४० (http://ignited.in/I/a/211058)
१६. उपरोक्त, जैन पुखराज व फडिया बी.एल., 'भारतीय शासन एवं राजनीति', पृ.४४३,४४४
१७. इनामदार ना.र. व पुरानिक सु.ना., 'राजकीय समाजशास्त्र', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ.१४८
१८. गर्दे दि.का. व बाचल वि.मा., 'आधुनिक राजकीय विश्लेषण (भाग दुसरा) 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९, पृ.५६,५७
१९. व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास, 'भारतीय लोकशाही : अर्थ व व्यवहार', डायमंड पब्लिकेशन्स, २०१०, पुणे, पृ.२६३
२०. उपरोक्त, नीलम देवी, 'भारतीय राजनीति में पड़ने वाले क्षेत्रवाद के प्रभाव का विश्लेषणात्मक अध्ययन'

T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - III**
**Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development**



December 2020








**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Manoj S. Kamat**

Principal,
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor : Prof. F. M. Nadaf**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**December 2020**

## Special Issue-Volume-III

## On

## *Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Manoj S. Kamat**
Professor & Principal
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor**
**Dr. F. M. Nadaf**
Vice Principal & Professor of Geography
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| **Prof. Camena Guneratne** (Sri Lanka) | | **Dr. RiaAerts** (Australia) |
| **Dr. Mohamed Izhar Hasan** (Rohtak) | **Prof. S. I. Biradar** (Dharwad) | **Dr. Bindhy Wasini Pandey** (New Delhi) |
| **Dr. Biswajit Roy Chowdhury** (Kolkata) | **Dr. Shyam Khinchi** (Ganganagar) | **Dr. Keya Das Ghosh** (Kolkata) |
| **Dr. Suryawanshi M V** (Aurangabad) | **Dr. C. P. Hiremath** (Goa) | **Dr. Sucheta Naik** (Goa) |
| **Shri. Vividh Pawaskar** (Goa) | **Dr. Pramada Gauns Desai** (Goa) | **Dr. Monika Kannan** (Ajmer) |
| **Dr. Arvind Haldankar** (Goa) | **Dr. L. T. Nayak** (Dharwad) | **Dr. Rupa Chari** (Goa) |

**Published by-** Dr. Manoj S. Kamat, Professor & Principal,DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

# बिहारमधील प्रमुख प्रादेशिक पक्ष : जनता दलातील फुटीचे वारस

**शरद बाबुराव सोनवणे**

सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे – ४२४३०४

**सारांश (Abstract)**

प्रादेशिक पक्षांचा उदय हा प्रमुख्याने वेगवेगळया प्रकारच्या प्रादेशिक अस्मिता घेऊन होत असतोमात्र बिहारमध्ये प्रभावशाली . 'राष्ट्रीय जनता दल' असणारे, '(युनायटेड)जनता दल'व या राष्ट्रीय पक्षात फूट 'जनता दल' हे प्रमुख प्रादेशिक पक्ष 'पार्टी लोकजनशक्ती' जनता दलाचा वारसा सांगणारे बिहारमधील प्रभावश .पडून निर्माण झालेले प्रादेशिक पक्ष आहेत:ाली प्रादेशिक पक्ष भाजप व काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांपेक्षा वर्चस्वशाली आहेतलहान राजकीय पक्ष किंवा -क्षांचाही प्रभाव बऱ्यापैकी असुन इतर लहानबिहारमध्ये डाव्या प . .गट देखील तेथे आपली शक्ती आजमावत आहेत

**प्रस्तावना**

राष्ट्रीय जनता दल (राजद), जनता दल (युनाइटेड) व लोकजनशक्ती पार्टी (लोजपा) हे बिहारमधील प्रमुख प्रभावी प्रादेशिक पक्ष असुन ते प्रामुख्याने 'जनता दल' या राष्ट्रीय पक्षातील अंतर्गत मतभेदांमुळे फुटून निर्माण झालेले आहेत म्हणून प्रादेशिक अस्मिता घेऊन मूळ स्वरुपात प्रादेशिक पक्ष म्हणून उदयाला आलेल्या इतर राज्यातील पक्षांपेक्षा बिहारमधील प्रादेशिक पक्षांच्या राजकीय भूमिका या वेगळ्या स्वरूपाच्या असल्याचे दिसते. प्रामुख्याने सामाजिक न्याय व धर्मनिरपेक्षतेच्या मुद्द्याला घेऊन बिहारमधील प्रादेशिक पक्ष राजकारण करतांना दिसतात. कारण येथील प्रमुख पक्षांचे नेते हे जेपी आंदोलन व मंडलवादी राजकारणाच्या मुशीत तयार झालेले असुन, पक्षीय पार्श्वभूमीच्या दृष्टिकोनातून ते जनता दलातील फुटीचे वारस आहेत. अलीकडच्या काळात विकासाचा मुद्दा बिहारच्या राजकारणात ऐरणीवर आल्याचे दिसते. या सर्व अंगाने बिहारमधील प्रमुख प्रादेशिक पक्षांच्या पार्श्वभूमीचे आणि वर्तमानाचे अवलोकन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

**राष्ट्रीय पक्षांमधील अंतर्गत मतभेद व नवीन प्रादेशिक(राज्यस्तरीय) पक्षांची निर्मिती**

१९९१ ते १९९६ या कालावधीत राष्ट्रीय पक्षांमधील अंतर्गत गटतट इतके वाढले होते की, त्यापैकी कित्येक फुटुन बाहेर पडले. काँग्रेस (आय) मधील एक गट पक्षाध्यक्षांच्या धोरणांवर नाराज असल्यामुळे अर्जुन सिंह यांच्या नेतृत्वाखाली फुटुन बाहेर पडला आणि इंदिरा काँग्रेस (तिवारी) नावाने अस्तित्वात आला. या नव्या पक्षाचे अध्यक्ष म्हणून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. नारायण दत्त तिवारी यांची निवड झाली. तामिळनाडूमध्ये द्रमुक'च्या विभाजनातून मूपनार यांच्या नेतृत्वाखाली'तामिळ मनिला काँग्रेस' हा नवा पक्ष स्थापन झाला. मध्य प्रदेशात माधवराव शिंदे यांना विशिष्ट मतदार संघातून तिकीट न मिळाल्याने त्यांनी नाराज होऊन 'मध्यप्रदेश विकास पार्टी' निर्माण केली. गुजरातमध्ये भाजप'मधील अंतर्गत स्पर्धेमुळे निवडणूकीनंतर शंकरसिंह वाघेला यांनीमहागुजरात पार्टी' स्थापन केली. दुसरा एक राष्ट्रीय पक्ष असणाऱ्या जनता दलात १९९४-९५ या कालावधीत दोनदा फुट पडली. राष्ट्रीय पक्षांमधील या फुटींमुळे इतर राज्यांमधील प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढला.[1] जनता दलात व्ही.पी.सिंग यांच्यासोबतच्या अंतर्गत मतभेदाला कंटाळून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिलेल्या मुलायमसिंह यादव यांनी ४-५ नोव्हेंबर १९९२ रोजी 'समाजवादी पार्टी'ची स्थापना केली व 'यादवांचे व मुसलमानांचे नेते म्हणून ते पुढे आले आणि भारतातील सर्वात मोठे राज्य असणाऱ्या उत्तर प्रदेशच्या राजकारणात त्यांनी आपला दबदबा निर्माण केला.

**बिहारमध्ये जनता दलातील अंतर्गत मतभेदांमुळे निर्माण झालेले प्रादेशिक पक्ष**

१९९० साली झालेल्या बिहार विधानसभा निवडणूकीत जनता दलास सर्वाधिक जागा मिळाल्या आणि १० मार्च १९९० रोजी लालूप्रसाद यादव यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली पुढे लालकृष्ण आडवाणी यांची रथयात्रा बिहारमध्ये अडविल्यमुळे लालूंचा मुसलमानांमध्ये जनाधार निर्माण झाला मंडलीकरणामुळे यादव व इतर मागास जातींमध्ये लालू यादव यांचा प्रभाव निर्माण झालेलाच होता. परंतू सत्तेमध्ये यादवांच्या वर्चस्वाच्या विरोधात दोन प्रमूख मागास जाती कुर्मी आणि काहरी यांच्यामध्ये खळबळ निर्माण झाली. १२ फेब्रुवारी १९९४ रोजी पाटण्यामध्ये विशाल 'कुर्मी-महाचेतना रॅली'चे विरोध प्रदर्शन आयोजित करण्यात होते. "जून १९९४ मध्ये जनता दलात फुट पडली व जॉर्ज फर्नांडिस आणि नितीश कुमार यांच्या नेतृत्वात जनता दलातील एक गट बाहेर पडून त्यांनी'समता पार्टी' स्थापन केली."[2] एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत नितिश कुमार यांनी लालू हे जातीयवादी व नवब्राम्हणवादी असल्याचा आरोप केला. त्यांच्या मते, लालू हे केवळ आपल्या जातीस म्हणजे केवळ यादवानांच सत्तास्थानी ठेवू इच्छितात आणि इतर मागास जातींचा वापर करून घेत आहे.[3] याप्रकारे, पुढील काळात बिहार विधानसभा निवडणूकींमध्ये लालुप्रसाद याव यांच्यापुढे ओबीसींचे एक प्रबळ नेते नितिश कुमार यांचे आव्हान उभे राहिले. लालुप्रसाद यादव यांचा केंद्रिय पातळीवरील राजकारणात प्रभाव वाढल्यामुळे त्यांची जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. परंतू पुढे चारा घोटाळ्यात त्यांचे नाव आल्यामुळे त्यांचाप्रभाव ओसरला. "चारा घोटळयाचे न्यायालयीन प्रकरण आणि साम्यवादी पक्षांचा तसेच स्वपक्षांतर्गत दबावामुळे लालूंना बिहारचे मुख्यमंत्रीपद सोडावे लागलेमात्र त्यांनी पत्नी राबडीदेवी यांनी मुख्यमंत्री करून बिहारच्या सत्तेची चावी आपल्या हातातच ठेवली परंतू १९९८ च्या लोकसभा निवडणूकीपूर्वी त्यांच्यावर जनता दल अध्यक्षपद सोडण्यासाठी खुप दबाव वाढला. जनता दल अध्यक्ष पदासाठी शरद यादव आणि लालू यादव यांच्यामध्ये तीव्र रस्सीखेच सुरू झाली. परिणामी निवडणूकीपूर्वीच जनता दलाचे विभाजन झाले आणि लालूप्रसाद यादव यांनी 'राष्ट्रीय जनता दल' (राजद) हा नवा पक्ष



T.S.S's. Smt. V.U.P. College Sakri, Late Dr. B.S. Desale Science, Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

स्थापन केला."[३] १९९४ साली नितिश कुमारांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या 'समता पार्टीचा १९९५ च्या बिहार विधानसभा निवडणूकीत लालू समोर टिकाव लागला नाही. भाजपची देखील अशीच अवस्था असल्यामुळे १९९६ च्या लोकसभा निवडणूकीत 'समता पार्टी व भाजप' यांनी बिहारमध्ये आघाडी करून लढण्याचा निर्णय घेतला, तरीही ते लालूप्रसाद यादव यांना नमवू शकले नव्हते. परंतू १९९८ मध्ये लालू यादव यांनी राजद'ची स्थापन केल्यावर १९९९ च्या लोकसभा निवडणूकीपूर्वी "समता पार्टी आणि जनता दल यांचा विलय होऊन 'जनता दल (युनाइटेड)' ची निर्मिती झाली व दल (यु) केंद्रिय स्तरावर भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटकपक्ष बनला. तसेच बिहारमध्ये भाजप– जद (यू) ने समता पार्टीच्या काळापासून चालत आलेली आपली जुनी आघाडी कायम ठेवली."[४]

**बिहारच्या विभाजनानंतरचे राजकीय बदल**

एका प्रदीर्घ ऐतिहासिक संघर्षानंतर १ नोव्हेंबर २००० रोजी दक्षिण बिहारच्या २२ जिल्ह्यांचे मिळून झारखंड नावाच्या एका नवीन राज्याची निर्मिती झाली. विभाजनापूर्वी बिहार विधानसभेची सदस्यसंख्या ३२४ एवढी होती. मात्र त्यातील दक्षिण बिहारमधील ८१ विधानसभा मतदारसंघ वेगळे करून झारखंड विधानसभेची निर्मिती झाली. वर्तमान काळात बिहार विधानसभेची सदस्यसंख्या २४३ एवढी आहे. झारखंड राज्याची स्थापना होण्यापूर्वी बिहारमधून लोकसभेवर ५४ तर राज्यसभेवर १२ सदस्य निवडले जायचे. मात्र विभाजनानंतर बिहारमधून लोकसभेवर ४० तर राज्यसभेवर १६ सदस्य निवडले जातात. झारखंडचे ६ सदस्य राज्यसभेवर निवडले जातात. विभाजनपूर्व बिहार विधानपरिषदेची सदस्य संख्या ९६ होती, आता त्यामध्ये घट होऊन ती ७५ झाली आहे. तर झारखंड विधिमंडळ हे एकगृही आहे.[५]

बिहारच्या विभाजनानंतर बिहारमध्ये दोन महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडल्या. पहिली, समता पार्टी आणि दल (यु) यांचे विलीनीकरण झाले. मात्र नव्या पक्षाचे नाव दल (यु) हेच राहिले. या घटनेमुळे बिहारच्या राजकारणात मोठा बदल झाला. आता भाजप - दल (यु) आघाडीमध्ये भाजपची स्थिती लहान मित्रपक्षाची झाली. दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे, सन २००० ची विधानसभा निवडणूक झाल्यानंतर काही महिन्यातच रामविलास पासवान दल (यु) मधून बाहेर पडले आणि त्यांनी 'लोकजनशक्ती पार्टी' (लोजपा) नावाचा नवीन पक्ष स्थापन केला. बिहार राज्यातील 'दुसाध' या प्रभावशाली दलित जातीमध्ये पासवान यांचा मोठा प्रभाव असल्याचे मानले जाते.[६] त्यांनी दलित राजकारणावर आपले लक्ष्य केंद्रित करून आपल्या पक्षाचे बळ वाढवण्याचा प्रयत्न केला. २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी रामविलास पासवान यांचे निधन झाले. त्यामुळे लोकजनशक्ती पार्टीची संपूर्ण धुरा त्यांचे पुत्र चिराग पासवान यांच्याकडे आली आहे. राष्ट्रीय जनता दलाची कमान लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव हे सांभाळत आहेत कारण लालूप्रसाद यादव व त्यांच्या पत्नी राबडी देवी यांच्यावर अनेक घोटाळ्यांचे आरोप असल्यामुळे पक्षाचे नुकसान टाळण्यासाठी तेजस्वी यादवयांच्या रूपाने तरुण व स्वच्छ प्रतिमेचा चेहरा समोर आणण्याचा प्रयत्न राजद'ने केला आहे. तर नितीश कुमार हे आजही जनता दल (यु) वर स्वतःचे नियंत्रण व वर्चस्व अबाधित ठेवून आहेत. याप्रकारे बिहारमधील सत्तासंघर्ष हा प्रमुख्याने जनता दलाच्या वंशावळीतील राजद, जनता दल (यु) व लोजपा या प्रादेशिक पक्षांमध्ये असल्याचे दिसते. राष्ट्रीय पक्षांमध्ये भाजपचा जोर बिहारमध्ये वाढत असल्याचे दिसते मात्र काँग्रेसची स्थिती नगण्य बनली आहे. यासोबतच बिहारच्या राजकारणात डावे पक्ष देखील आपला प्रभाव राखून आहेत.

**निष्कर्ष**

बिहारमधील प्रमुख प्रभावशाली प्रादेशिक पक्ष असणारे राष्ट्रीय जनता दल जनता दल युनाइटेड व लोकजनशक्ती पार्टी हे पक्ष राष्ट्रीय जनता दलाचे राजकीय व वैचारिक वारसा आहेतकेंद्रात जनता दल प्रणित विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय मोर्चा . .यांच्या हक्कांना राजकारणाच्या केंद्रस्थानी आणलेसरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घेऊन इतर मागासवर्गी संपूर्ण भारताच्या राजकारणावर त्याचा दूरगामी परिणाम झालालालूप्रसाद यादव शरद यादव रामविलास पासवान नितेश कुमार हे जनता . बिहारमधील या नेत्यांनी जनता दलातून नंतरच्या काळात जनता दलात पक्षांतर्गत मतभेद झाल्यामुळे .दलातील बिहार मधील पुढारी होते बाहेर पडून नवीन पक्षाच◌ी स्थापना केली व ते पक्ष आज बिहार मधील प्रभावशाली प्रादेशिक पक्ष आहेतमात्र त्यांची राजकीय व . मुद्द्यांना घेऊन वैचारिक पार्श्वभूमी ही जनता दलाशी जोडलेली असल्यामुळे त्यांनी बिहार मध्ये सामाजिक न्याय व धर्मनिरपेक्षता या परिणामी इतर मागासवर्गीया .राजकारण केले◌ंचे राजकारण दलित राजकारण बिहार मध्ये प्रभावी आहेभाजप आणि काँग्रेस या राष्ट्रीय . डी करून आपले मात्र हे राष्ट्रीय पक्ष बिहार मध्ये प्रस्थापित प्रादेशिक पक्षांसोबत आघा .पक्षांना म्हणावा तेवढा जनाधार बिहारमध्ये नाही .राजकारण रेटण्याचा प्रयत्न करताना दिसतात

**संदर्भ सूची**

१. सईद एस.एम., 'भारतीय राजनीतिक व्यवस्था', सुलभ प्रकाशन, लखनऊ, २००१, पृ.२३३
२. चौबे कमल नयन, 'जातीयों का राजनीतिकरण - बिहार में पिछडी जातियों के उभार की दास्तान', वाणी प्रकाशन, नयी दिल्ली, २००८, पृ.१२८
३. द पायोनिअर, ५ फेब्रुवारी १९९५, पृ.१
४. उपरोक्त, चौबे कमल नयन, 'जातीयों का राजनीतिकरण - बिहार में पिछडी जातियों के उभार की दास्तान', पृ.१३७
५. भारत – २००५, प्रकाशन विभाग, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, २००५, पृ.८२५-२६, ८५४-५६
६. उपरोक्त, चौबे कमल नयन, 'जातीयों का राजनीतिकरण - बिहार में पिछडी जातियों के उभार की दास्तान', पृ.१७०



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January 2021

Special Issue 257

## Multidisciplinary Issue



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**This Journal is indexed in :**
- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmoc Impact Factor (CIF)**
- **Global Impact Factor (GIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 257
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. 2021

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

Co-Editors -
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

Advisory Board -
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, **Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 257*
ISSN : 2348-7143
January, 2021

# Linguistic State Reorganization and Linguistic Politics of Regional Parties

**Sharad Baburao Sonawane**
Assistant Professor - Department of Political Science,
TSS Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri Dist. Dhule

**Abstract :**

*India is a democratic country and India has adopted a malty party system. Therefore, along with the national parties, many regional parties also exist in India. Generally from the ninety decade onwards, the national parties in India started gaining momentum and the regional parties started gaining strength. Regional parties politicize various regional and local issues. The issues of language and culture seem to be taken up more vigorously by the regional parties. This linguistic politics of regional parties seems to be rooted in state reorganization. Regional parties raise linguistic issues as well as many other local issues. But since the linguistic issue is gaining ground for the regional parties at all levels in the respective states, many regional parties seem to be prioritizing linguistic issues. On this basis, regional parties seem to be able to establish their influence in those particular states.*

**Keywords** : Linguistic state reorganization, regional parties, language, culture, politics.

**Introduction :**

From the pre-independence period onwards, the demand for state formation on the basis of language had been on the rise in India. But soon after independence, the demand for state reorganization on the basis of language took off. The Congress-led central government did not pay much attention to this at first. But after the death of Potti Sreeramulu, the then Prime Minister Pandit Jawaharlal Nehru announced the formation of an independent Telugu-speaking state of Andhra Pradesh so that the situation would not get out of hand. It also appointed a commission for the formation of linguistic states and reorganized the provinces of independent India on the basis of language. Yet the demands of all speakers were not satisfied by this commission. In the subsequent period, many regional parties emerged in India to preserve linguistic and cultural identities and made language an issue of their politics. E.g. Shiv Sena, a regional party in Maharashtra, was initially involved in Marathi language politics. In this way many regional parties appear to be doing linguistic politics. Therefore, the present paper seeks to review the various bases and characteristics of regional party politics.

**Features of Regional Parties**

The number of regional or state level parties in Indian politics is steadily increasing. Some of the key features of these regional parties are as follows.

1. The influence or dominance of state or regional parties in Indian politics began to grow after the 1967 forth General Elections.
2. Regional parties in India are generally state level parties.
3. The main demand of these state level parties is for state autonomy.
4. The main rival of these state level parties was the Congress party.
5. State-level parties' appeals and bases are narrow. e.g. Culture, ethnicity and religiosity etc.
6. The rise of regionalism stems from anti-center sentiment.
7. Regionalism is, in fact, the easiest way to gain power; As a result, parties in national politics use many immediate (easy) ways.[1]

In addition to the above characteristics of the regional parties, it is necessary to note here another changing symptom; the feature is that these regional parties, which used to oppose the Congress, now seem to have started opposing the BJP. Therefore, the picture is that 'non-BJP' is now taking the place of earlier non-Congress.

**Classification of regional parties :**

Since India has adopted a multi-party system, there are many regional parties in India besides the national parties. India is a vast country with diversity in terms of language, culture, religion, caste and economic development. Adding identity to this diversity in India or addressing the issue of backwardness in terms of economic development, various regional parties have emerged in many states of India. Regional parties can generally be classified into three types.



T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

1. Political parties belonging to a particular caste or religion. e.g. DMK in Tamil Nadu, Akali Dal in Punjab, National Conference in Jammu and Kashmir and Shiv Sena in Maharashtra.
2. The second type includes regional parties that have sprung up from the Congress party. Such as, Indian Revolutionary Party, Bangla Congress etc.
3. The third type includes parties with specific ideologies like Forward Bloc, Kisan Mazur Paksha.[2]

**The basis of the politics of regional parties :**

An important feature of the party system in India is that many of the major and minor parties in India are based on narrow issues such as religion, language, culture, regional identities. Of course, the influence of such parties is limited to a particular region. Different regional parties appear to exist in different states based on the issues of ethnicity, culture and regionalism in the Northeast; [3] at the same time, there are many instances in India where the party has expanded and become influential due to internal divisions within the national parties or competition for political ambitions and the formation of new political parties with a strong base of support in the state under their leadership. These "regional parties compete with the so-called national parties like Congress and BJP not only during elections but also as opposition parties as they have strength in their states;"[4] also, the inevitability of a coalition government has increased the dominance of regional parties in contemporary Indian politics.

**Linguistic State Reorganization :**

Morris Jones writes, "The question of territorialism and language remains such a burning issue in Indian politics that it has had a profound effect on current political history. Sometimes the real problem facing national unity seems to be regionalism."[5] In particular, the 1956 state reorganization was based on language and regional parties, based on language and region, strengthened their position and started their effective politics.

India is a multilingual country. According to the 1902 census, 179 languages and 544 vernaculars were spoken in India.[6] During the national movement, the Indian National Congress had three times supported the reorganization of the province on the basis of language between 1928 to 1944. 1) The convention held in Calcutta in October 1937 called for the creation of Andhra Pradesh and Karnataka on the basis of language. 2) In the meeting of the Congress Working Committee held at Wardha in July 1938, he supported the demand of the people of Andhra, Karnataka and Kerala for linguistic regionalization. He also promised to take steps in terms of linguistic regionalism when the Congress came to power. 3) At the time of the general elections of 1954-46, the Congress had included in its manifesto the issue of creation of administrative divisions on the basis of linguistic and cultural uniformity."[7] The Nehru Report of 1928 also called for the formation of provinces on the basis of language. But surprisingly, the Congress, which during the national movement had advocated the demand for provincialism on the basis of language for almost three decades; The same Congress got confused on the issue of linguistic regionalism after independence. Pandit Jawaharlal Nehru opposed the formation of provinces in the Constituent Assembly on the basis of language. On November 27, 1947, in the Constituent Assembly, while opposing the formation of provinces on linguistic grounds, he had said, "The first priority should be given to the primary and India's primary need is security and stability."[8] In this way, the Congress ran away from its previous commitment regarding state reorganization.

It was impossible for the government to ignore the demand for linguistic regionalism that had been ingrained in the minds of the people in many parts of the country since pre-independence times. Therefore, the incident committee appointed Shri. A Linguistic State Reconstruction Committee was appointed under the leadership of Dar and this committee submitted its report to the government in December 1948. The Dar Committee observed that the idea of linguistic states was firmly entrenched in the minds of the people and acknowledged the overwhelming support for this demand. However, as the nation is currently in a state of emergency, the issue of linguistic regionalism is secondary and other important issues need to be addressed, the commission said. He also said that it was not in the interest of the nation at present to give priority to all the elements promoting nationalism and to give up those elements which would hinder the progress of nationalism. As the idea of linguistic states cannot stand on these criteria, it cannot be accepted. Dar had expressed."[9]

The report of the Dar Committee was strongly opposed across the country. In late 1948, the Congress appointed a high-level JVP Committee to reduce the intensity of this opposition and to reconsider the question of the linguistic state. The committee



TSS's Smt. V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

submitted its report on April 5, 1949. Reiterating the findings of the Dar Committee, the JVP Committee emphasized on the issues arising out of linguistic regionalism and its many long-term consequences. The committee also expressed the view that the present time is not suitable for linguistic restructuring. But if people want linguistic regionalism, they have to consider this demand; But at the same time, we have to consider the consequences and dangers of this scheme, the JVP committee said."[10] Proponents of language-wise regionalization have started a hunger strike against this. In 1952, the Telugu-speaking people demanded a separate state. Potti Sriramulu died on 15 December 1952 after a 56-day fast-unto-death for the creation of Andhra Pradesh. As a result, the situation in the entire Telugu-speaking region got out of hand. As a result, on December 19, 1952, the Central Government immediately announced the creation of Andhra Pradesh by dividing Madras Province. On Oct. 1, 1953 the Telugu-speaking state of Andhra Pradesh was formed.[12] At the same time, the demand for linguistic state reorganization rose all over India and language & region became key issues in politics.

On December 22, 1953, the then Prime Minister Pandit Jawaharlal Nehru called on Justice The State reorganization Commission was formed under the chairmanship of Fazal Ali. On September 30, 1955, the State reorganization Commission submitted its report recommending that 14 constituent states and six Union Territories be created on a linguistic basis. It was accepted by the Nehru government. Thus, in the end, it was decided to organize the provinces according to the recommendations of the Fazal Ali Commission. From this, in the last 60-65 years, constituent states were formed in the Indian Union on linguistic basis. Therefore, "the constituent states of the Indian Union that exist today have a linguistic base rather than a geographical, political base. Therefore, such states are definitely conducive to linguistic identity."[13] This gave impetus to the politics of language.

**Conclusion :**

औरंगाबाद शहराचे नाव बदलण्याऐवजी तातडीने विमानतळाचे नाव बदलता येऊ शकते हे ध्यानात घेऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी औरंगाबाद विमानतळाचे नामांतर 'छत्रपती संभाजीराजे विमानतळ' असे करण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला आहे.[11] तसेच त्यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री हरदिप पुरी यांना या विमानतळाचे नामकरण करण्याबाबतचे स्मरणपत्र पाठवले असून त्यात म्हटले आहे की, "औरंगाबादच्या विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्याबाबत राज्याच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला असून त्याबाबतचा ठराव विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही दोन्ही सभागृहांमध्ये एक मताने मंजूर केलेला आहे तसेच नामकरणाबाबत मुख्यसचिव यांच्या स्तरावरूनही केंद्रीय मंत्रालयाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे त्यानुसार औरंगाबाद विमानतळाचे नामकरण 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' करण्याबाबतची अधिसूचना लवकरात लवकर निर्गमित करावी." खरेतर औरंगाबाद शहराचे संभाजीनगर असे नामांतर करण्याची मागणी भाजप व मनसेने लावून धरल्याने आगामी औरंगाबाद मनपा निवडणुकीत या मुद्द्याचा भाजपला फायदा मिळू नये यासाठी मुख्यमंत्र्यांनी विमानतळाच्या नामांतराची मागणी लावून धरली आहे. तसेच विमानतळाचे नामांतर न झाल्यास भाजप'वर खापर फोडण्याची शिवसेनेची खेळी आहे.[12] भाजप'वर टीका करताना शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले की, "बिहारमधील औरंगाबादचे नामांतर करण्याची मागणी गेल्या काही महिन्यापासून होत असताना तेथील मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मात्र त्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबाबत भाजपने भूमिका स्पष्ट करावी."[13] याप्रकारे शिवसेना व भाजप औरंगाबाद नामांतर मुद्द्यावरून राजकारण करीत आहेत.

**औरंगाबादच्या नामांतरासाठी मनसे'ची आक्रमकता**

औरंगाबाद नामांतराचा मुद्दा अधिक तापल्यावर मनसे'ने औरंगाबाद व इतर ठिकाणी देखील नामांतराचा मुद्दा लावून धरला आहे शिवसेनेची कोंडी करून महापालिका निवडणुकीत राजकीय फायदा घेण्याचा मनसे'चा प्रयत्न असल्याचे दिसते. यासाठी मनसेच्या कार्यकर्त्यांनी दि. 7 जानेवारी 2021 रोजी धुळे येथे राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातून औरंगाबादला जाणाऱ्या बसचा फलक बदलून आंदोलन केले. धुळे ते औरंगाबाद ऐवजी धुळे ते संभाजीनगर असे फलक बसवर लावण्यात आले.[14] तर दि. ९ जानेवारी २०२१ रोजी नाशिकमध्ये मनसे कार्यकर्त्यांनी औरंगाबादकडे जाणाऱ्या रस्त्यावरील दिशादर्शक फलकाला 'संभाजीनगर' असे बॅनर लावले होते. तसेच या मुद्द्यावर पुण्याच्या ग्रामीण भागातून देखील मनसे आक्रमक झाली. पुणे-नाशिक महामार्गावर असलेल्या राजगुरूनगर इथे मनसेचे पुणे जिल्हाध्यक्ष समीर थिगळे यांनी कार्यकर्त्यांसोबत बसस्थानकातून औरंगाबादला निघालेल्या एसटी बसला छत्रपती संभाजी महाराजनगर असा फलक लावून आंदोलन केले.[15] यापूर्वी मनसे आमदार राजू पाटील यांनी नामांतर प्रश्नावरून शिवसेनेवर टीका केली होती. तसेच मनसे



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

आता औरंगाबादच्या नामांतरासाठी पुढाकार घेणार असून त्यासाठी राज्य सरकारला भाग पाडणार असल्याचेही मनसेच्या राजू पाटील यांनी म्हटले होते.[16]

**औरंगाबाद नामांतर मुद्द्यावर महाविकास आघाडीतील मतभेद**

शिवसेना नेत्यांकडून औरंगाबादचा उल्लेख नेहमीच संभाजीनगर असाच केला जातो विशेष म्हणजे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनीही आपल्या ट्विटर अकाऊंटवरून एक बातमी शेअर करताना औरंगाबादचा उल्लेख संभाजीनगर असा केला होता. तर उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनीही आपल्या पत्रावर औरंगाबादचा उल्लेख संभाजीनगर असा केला होता. त्यामुळे सरकारकडून औरंगाबादचे नामांतर करून संभाजीनगर हे नवीन नाव देण्याच्या हालचाली होत असल्याची चर्चा होती. यासंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व महासुलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट करत औरंगाबादच्या नामांतरास काँग्रेसचा विरोध असल्याचे सांगितले महाविकास आघाडी शासनात काँग्रेस घटकपक्ष असून या आघाडी शासनाचा किमान समान कार्यक्रम ठरलेला असल्यामुळे जेव्हा नामांतराचा प्रस्ताव येईल तेव्हा त्यास आमचा विरोध राहील. पण अद्याप तसा कुठलाही प्रस्ताव समोर नसल्याचे थोरात म्हणाले. तसेच आम्हाला सत्ता सुद्धा दुय्यम असून आम्ही राज्यघटनेची शपथ घेऊन सत्तेत आलेलो असल्यामुळे त्या शक्तीची प्रतारणा होईल अशी कुठलीही गोष्ट आम्हाला मान्य होणार नाही. सामाजिक मतभेदाला आमच्याकडे स्थान नसल्याचे म्हणत औरंगाबादच्या नामांतराला काँग्रेसचा ठाम विरोध असल्याचे थोरात यांनी सांगितले.[17]

औरंगाबादच्या नामांतर मुद्द्यावरून महाविकास आघाडीत मतभेद असतांना देखील दि.6 जानेवारी 2021 रोजी मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयाची माहिती देताना मुख्यमंत्री कार्यालयाच्या अधिकृत 'सीएमओ महाराष्ट्र' या ट्विटर हँडल वरून औरंगाबादचा उल्लेख 'संभाजीनगर' असा झाल्याने राजकीय गोंधळ सुरू झाला होता.[18] तसेच त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या ट्विटर हँडल वरून संभाजीनगर असा उल्लेख वारंवार करण्यात येत असल्यामुळे काँग्रेस - राष्ट्रवादीच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. तर ती प्रिंट मिस्टेक असल्याचा खुलासा माहिती व जनसंपर्क खात्याचे राज्यमंत्री असलम शेख यांनी केला. मात्र स्वतः मुख्यमंत्री ठाकरे यांनीच दुसऱ्या दिवशी पुन्हा संभाजीनगर असा उल्लेख करून ट्विट करण्याची सूचना केल्यावर त्यांनी ही ठरवून केलेली कृती असल्याचे आता स्पष्ट झाले.[19] औरंगाबादच्या नामांतरावरून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत सीएमओ ट्विटर हँडलवर संभाजीनगर असा उल्लेख केल्याबद्दल त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले की, मी नवीन काय केले? आतापर्यंत मी जे बोलत आलोय, बाळासाहेब जे बोलत आले तेच बोलतोय, तेच करतोय आणि पुढेही तेच करणार असे त्यांनी ठणकावून सांगितले. तसेच 'औरंगजेब काही धर्मनिरपेक्ष नव्हता', त्यामुळे महाविकास आघाडीच्या धर्मनिरपेक्ष अजेंड्यात औरंगजेब बसत नाही, असे उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसच्या विरोधावर भाष्य करतांना स्पष्ट केले.[20] यानंतर मुख्यमंत्री कार्यालयच्या ट्विटर हँडलवर उस्मानाबादचा उल्लेख देखील 'धाराशिव' असा करण्यात आला.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या या भूमिकेवर प्रतिक्रिया देतांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी पुन्हा स्पष्ट केले की, औरंगाबाद नामांतराबाबत काँग्रेस पक्षाची भूमिका कायम असून ती आम्ही मांडलेली असून आम्ही आमची भूमिका मुख्यमंत्र्यांना निश्चितपणे पटवून देऊ. कारण यामध्ये औरंगजेब हा विषय नाही. तसेच छत्रपती संभाजी महाराज हे आमचेही आराध्य दैवत आणि श्रद्धास्थान आहे. पण नामांतराच्या राजकारणामुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊ नये म्हणून काँग्रेसचा विरोध आहे. पुढे ते असेही म्हणाले होते की, आमची भूमिका मुख्यमंत्र्यांना व्यवस्थित पटवून देण्यासाठी आम्ही एकत्र बसून चर्चा करु पण आमची भूमिका कायम असून नामांतराला काँग्रेसने नेहमीच विरोध केला आहे. तसेच आमचे शासन किमान समान कार्यक्रमाच्या आधारे काम करत असून काही बाबतीत मतभेद झाल्यास आम्ही चर्चेतून मार्ग काढू. दरम्यान नामांतराच्या विषयावरून सुरु असलेल्या वादावर मुंबईत दि.15 जानेवारी 2021रोजी पत्रकारांशी बोलतांना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार म्हणाले की आमच्यात कोणताही वाद नसुन कोणी संभाजीनगर म्हटले, कोणी धाराशिव म्हटले, नाहीतर अजून काही म्हटले तरी त्याने काही फरक पडत नाही. हा वाद एवढा काही गंभीर नसल्याने त्यावर मी कधीही भाष्य केलेले नाही.[21] एकंदरीत काँग्रेसने जरी नामांतराला विरोध केला असला तरी या मुद्द्यावरून महाविकास आघाडीत मतभेद नसल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

शिवसेना पक्षप्रमुख ते पक्षाचे सर्व नेते व कार्यकर्ते औरंगाबादचा उल्लेख नेहमी संभाजीनगर असाच करतात. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामना या दैनिकात देखिल औरंगाबादसाठी संभाजीनगर हेच नाव छापले जाते. असे असले तरी दरवेळी औरंगाबाद महानगरपालिका निवडणुकीपूर्वी शिवसेनेकडून हा नामांतराचा विषय अधिक तापवला जातो. यावेळी मात्र मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप व मनसे या पक्षांनी सत्ताधारी शिवसेनेला कोंडीत पकडण्यासाठी औरंगाबादच्या नामांतराचा मुद्दा उचलला. पण शिवसेनेने खुबीने या मुद्द्यात राजकीय हवा भरली असून आगामी मनपा निवडणुकीत त्याचा फायदा शिवसेनेलाच होईल असे वातावरण निर्माण केले आहे. तसेच शिवसेनेला औरंगाबादचे नामांतर कितीही हवे असले तरी काँग्रेसच्या विरोधामुळे व राज्यात तीन पक्षांचे 'महाविकास आघाडी शासन' असल्यामुळे शिवसेनेला औरंगाबादचे नामांतर करता येईल अशी शक्यता वाटत नाही तरीपण औरंगाबाद महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला या मुद्द्याचा नक्कीच लाभ होईल.



T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

## संदर्भसूची


1. https://www.bbc.com/marathi/india-55517840
2. कित्ता
3. https://www.bbc.com/marathi/india-46152067
4. कित्ता
5. लोकमत, दि. 9 जानेवारी 2019 पृ. 1
6. https://www.bbc.com/marathi/india-55517840
7. लोकसत्ता, दि. 24 डिसेंबर 2020, पृ. 8
8. लोकसत्ता, दि. 24 डिसेंबर 2020, पृ. 8
9. कित्ता
10. सकाळ, दि. 7 जानेवारी 2021, पृ.4
11. लोकसत्ता, दि. 24 डिसेंबर 2020, पृ. 8
12. लोकसत्ता, दि. 7 जानेवारी 2021, पृ.2
13. सामना, दि. 9 जानेवारी 2021, पृ.3
14. लोकसत्ता, दि. 8 जानेवारी 2021, पृ.9
15. https://lokmat.news18.com/maharashtra/sambhajinagar-road-not-aurangabad-mns-puts-up-banner-in-nashik-mbss-512187.html
16. https://www.lokmat.com/mumbai/opposition-naming-congress-does-not-affect-mahavikas-aghadi-sanjay-raut-media-a601/
17. https://www.lokmat.com/mumbai/opposition-naming-congress-does-not-affect-mahavikas-aghadi-sanjay-raut-media-a601/
18. लोकसत्ता दिनांक 8 जानेवारी 2019 पृष्ठ 2
19. लोकमत, दि. 9 जानेवारी 2019, पृ. 3
20. लोकमत, दि. 9 जानेवारी 2019 पृ. 1
21. https://www.loksatta.com/maharashtra-news/ncp-sharad-pawar-on-aurangabad-to-rename-as-sambhajinagar-sgy-87-2380551/


TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

Special Issue - II

**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**

January 2021










**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**January 2021**

## Special Issue-Volume-II

## On

***"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"***

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur, Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Prof. Kartik R. Patil**
**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor**
**P. M. Rajurwade**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Editorial Board**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Praful T. Bansod | Dr. Haresh T.Gajbhiye | Prof. Ashutosh M.Popte | Prof. Pitambar T. Pise |
| Dr. Nitin T. Katrojwar | Dr. Rajeshwar D. Rahangdale | Dr. Laxman T. Kamdi | Dr. Udhay D. Mendulkar |
| Dr. Santosh P. Bansod | Dr. Dilip S.Telang | Prof. Kishor S.Chaure | Dr. Manisha Warma |
| Dr. Rupesh M.Meshram | Dr. Sharad B. Belorkar | Dr. Subhas K. Shinde | Dr. Chetankumar Vyas |

**Published by-** Prof. Kartik R Patil, Off. Principal, Rashtrasant Tukdoji College, Chimur, Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**

Sakri, Dist.Dhule
TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-II *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

# आगामी मुंबई महानगरपालिका निवडणूकीसाठी शिवसेनेची बदलती रणनीतीक भूमिका

**शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**सारांश (Abstract)**

राज्यातील शिवसेना-भाजप युती संपुष्टात आल्यावर भाजपने शिवसेनेच्या ताब्यातील मुंबई महानगरपालिका आपल्याकडे घेण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली आहे त्याच्या प्रत्युत्तरादाखल शिवसेनेनेही आपला मराठी'चा मुद्दा बाजूला ठेवून अमराठी भाषिक मतदारांना विशेषत: गुजराती भाषिकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी 'मुंबई मा जलेबी फापडा, उद्धव ठाकरे आपडा!' अशी घोषणा दिली आहे. तसेच शिवसेना गुजराती आघाडीचे नेते हेमराज शहा यांच्याकडे गुजराती समाज मेळाव्याचे आयोजन करून गुजराती भाषिकांना शिवसेनेसोबत जोडण्याची जबाबदारी सोपवली आहे. यापूर्वी शिवसेनेने 'अजान पठण' स्पर्धेचे आयोजन करून मुस्लिमांनाही साद घालण्याचा प्रयत्न केला आहे. शिवसेनेच्या या भूमिकेवर भाजप नेत्यांनी जोरदार टीका केली. शिवसेनेच्या आतापर्यंतच्या 'मराठी माणूस' हा मुद्द्यामुळे शिवसेनेपासून दूर राहिलेला गुजराती भाषिक मतदार शिवसेनेच्या हाकेला सकारात्मक प्रतिसाद देईल की नाही हे आताच सांगणे कठीण आहे. तरीपण शिवसेनेच्या या रणनीतीमुळे शिवसेनेच्या राजकारणाची दिशा बदलत असल्याचे दिसते. त्याचा अभ्यास या शोधनिबंधात केला आहे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील सर्वाधिक उत्पन्न असलेली समृद्ध अशी मुंबई महानगरपालिका असून ती गेल्या दोन दशकांपासून शिवसेनेच्या ताब्यात आहे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असेपर्यंत भाजपने शिवसेनेने जेवढ्या जागा दिल्या तेवढ्याच लढवल्या मात्र युती संपुष्टात आल्यावर आता भाजपनेही शिवसेनेच्या ताब्यातील मुंबई महापालिका खेचून घेण्यासाठी कंबर कसली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने प्रामुख्याने 'मराठी' व 'हिंदुत्व' या मुद्द्यांच्या आधारे राजकारण केले. परंतु उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आता राजकीय सोयीनुसार राजकारण करण्यावर भर देत असल्याचे दिसते. या रणनीतीचा भाग म्हणून शिवसेनेने अमराठी भाषिकांना आपल्याकडे आकृष्ट करण्याचे धोरण अवलंबले आहे. याच भूमिकेतून मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने भाजप'ची पारंपारिक 'व्होट बँक' असलेल्या गुजराती भाषिकांना आपल्याकडे वळविण्यासाठी अवलंबलेल्या रणनीतीचा परामर्श घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे. भाजप'ची 'व्होट बँक' असलेल्या गुजराती मतदारांना आकर्षित करण्याची शिवसेनेची रणनीती मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी भाजप व शिवसेनेत आत्तापासूनच चढाओढ लागल्याचे दिसते. विधान परिषद पदवीधर निवडणुकीतील पराभवानंतर भाजपने आपले लक्ष मुंबई महानगरपालिकेची सत्ता काबीज करण्यासाठी केंद्रित केले आहे. भाजप-शिवसेना युती तुटल्यानंतर भाजपने मुंबई महानगरपालिकेत एकहाती सत्ता स्थापन करण्याचा निर्धार करून सर्वच्या सर्व २२७ जागा लढविण्याचे ठरविले आहे. यासाठी आमदार अतुल भातखळकर यांची प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करताना विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते की, ज्याप्रमाणे बादशहाचा प्राण जसा पिंजऱ्यातील पोपटाची होता, तसा शिवसेनेचा प्राण मुंबई महापालिकेतील सत्तेत आहे. म्हणून गेली दोन दशके शिवसेनेच्या ताब्यातील मुंबई महापालिकेची सत्ता काबीज करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागण्यास सांगितले. "आतापर्यंत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांच्या आश्वाने मिळेल तेवढ्या जागा पदरात पाडून घेण्यावर समाधान मानणाऱ्या भाजपने 2017 मध्ये शिवसेनेच्या विरोधात जोरदार लढत दिली होती. त्यावेळी प्रथमच भाजपने शिवसेनेच्या बरोबरीने म्हणजेच 80 पेक्षा अधिक जागा जिंकल्या होत्या. तरीही राज्यातील सत्ता टिकविण्यासाठी शिवसेनेचे सोबत आवश्यक असल्यामुळे भाजपने शिवसेनेला महापालिकेत सत्तास्थापनेसाठी फारसा विरोध केला नाही." मात्र यावेळी भाजपने स्वबळावर मुंबई महापालिकेचे सत्ता काबीज करण्यासाठी कंबर कसली असून 'आत्मनिर्भर चहा' हा उपक्रम सुरु केला आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी या उपक्रमाचे दि 6 जानेवारी 2021 रोजी उद्घाटन केले. सुरवातीला किमान शंभर स्टॉल सुरू होतील असे मुंबई भाजपा'चे अध्यक्ष मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

**शिवसेनेचा गुजराती समाज मेळावा : हेमराज शहा यांच्याकडे जबाबदारी**

शिवसेनेने मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपला मात देण्यासाठी मोहिम आखली असुन गुजराती मतदारांना आकर्षित करण्यासाठी आपला मराठीचा मुद्दा बाजूला ठेवून 'मुंबई मा जिलेबी फाफडा; उद्धव ठाकरे आपडा!' चा नारा दिला आहे. यासाठी दि.10 जानेवारी 2021 रोजी गुजराती भाषिकांच्या मेळाव्याचे अयोजन करण्याचे ठरवुन यासाठीच्या निमंत्रण पत्रिकेवर मराठी व गुजराती अशा दोन्ही भाषेत मजकूर छापण्यात आला. याप्रकारे मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गुजराती समाजाला पक्षाशी जोडण्यासाठी मोहीम राहण्याचा निर्धार शिवसेनेने केला आहे. त्यासाठी मुंबई शहरातील आणि उपनगरातील विविध भागात गुजराती समाजाचे मेळावे घेतले जाणार आहेत नोटबंदी व जीएसटी'चा सर्वात जास्त आर्थिक फटका छोट्या गुजराती-मारवाडी व्यापाऱ्यांना बसला असल्याचा मुद्दा त्यासाठी मांडण्यात येणार आहे.

मुंबईतील अंधेरीत रविवार, दि. 10 जानेवारी 2021 रोजी पार पडलेल्या शिवसेनेच्या गुजराती आघाडीच्या पहिल्या मेळाव्याला 100 गुजराती नागरिकांनी हजेरी लावली होती. मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी गुजराती मतदारांना आकर्षित करण्यासाठी शिवसेनेने आयोजित केलेल्या या मेळाव्यात गुजराती समाजाच्या 9 उद्योजकांनी हाती शिवबंधन बांधले. शिवसेना गुजराती फोरमचे प्रमुख हेमराज शहा यांनी यावेळी गुजराती नागरिकांना अशी आठवण करून दिली की, 1992च्या दंगलीत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

गुजराती समाजाचे रक्षण केले होते. तसेच 2002च्या गोधरा येथील घटनेनंतर तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पाठीशी बाळासाहेब ठाकरे ठामपणे उभे राहिले होते. तसेच 'मी मुंबईकर' म्हणून मुंबईतील सर्व धर्मियांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपलेपण दिले. याप्रकारचा शिवसेना व गुजराती समाजाचा संबंध नव्या पिढीला समजावून सांगावा लागणार असल्याचे नमूद करून गुजराती समाजाला शिवसेनेशी जोडावे लागेल असेही शहा यांनी म्हटले.

**शिवसेनेचे गुजराती समाज अनुनयाची रणनीती: भाजप'ची जोरदार टीका**

महानगरपालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणात अनेक जागांवर प्रभाव निर्माण करण्याची क्षमता असलेल्या मुंबई शहरात गुजराती लोकांची व्होट बँक महत्त्वपूर्ण असल्यामुळे तेथे शिवसेनेला आपला राजकीय पाया मजबूत करायचा आहे तथापि, आगामी निवडणुकांपूर्वी गुजराती मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे शिवसेनेचे म्हणणे आहे. गुजराती लोक हे मुंबईतील भाजपचे पारंपारिक मतदार राहिलेले असुन या समुदायाचे शिवसेनेशी फारसे चांगले नाते राहिलेले नाही 2019 च्या लोकसभा व विधानसभा निवडणुका भाजप व सेनेने एकत्र लढल्या होत्या. पण विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेनेने भाजपशी संबंध तोडून राष्ट्रवादीकाँग्रेसबरोबर सरकार स्थापन केले. अशा परिस्थितीत आता शिवसेनेला भाजपची व्होट बँक आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. कारण आकडेवारीनुसार, मुंबईत 35 लाख लोक गुजराती समाजातील असुन त्यापैकी 15 लाख मतदारांची भूमिका 40 जागांवर निर्णायक आहे अशा परिस्थितीत भाजप-शिवसेना युती तुटल्यानंतर मराठी व गुजराती समाजात ध्रुविकरणाची शक्यता असल्यामुळे शिवसेनेला गुजराती समाजाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यामुळेच मराठी माणसांबरोबरच गुजराती समाजालाही आपल्या बाजूने वळविणे शिवसेनेला गरजेचे आहे

यासाठी मुंबईतील गुजराती समुदायातील शिवसेना नेते हेमराज शहा यांनी आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत गुजराती मते शिवसेनेच्या पाठीशी उभी करण्यासाठी 'जलेबी फाफडा उद्धव ठाकरे आपडा!' चा नारा दिला. मोदी- शहा व भाजपच्या प्रेमात असलेली गुजराती मते स्वतःकडे वळविणे हे शिवसेनेसमोर मोठे आव्हान आहे. कारण केवळ मराठी मतांच्या भरवशावर मुंबई महापालिकेवर झेंडा फडकवणे कठीण असल्याची जाणीव शिवसेनेला असल्यामुळे 'जलेबी फाफडा, उद्धव ठाकरे आपडा' ची गरज सेनेला भासत आहे. राज्यात सरकार मध्ये शिवसेनेबरोबर असलेल्या काँग्रेसने एकीकडे मुंबई महापालिका निवडणुकीसाठी स्वबळाचा नारा दिला आहे. दुसरीकडे भाजप मनसे'ला जवळ करण्याची रणनीती आखत असल्यामुळे शिवसेनेने गुजराती मतदारांना आकर्षित करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी शिवसेनेच्या गुजराती समाजाच्या बैठकीवर आणि'उद्धव ठाकरे आपडा' या घोषणेवर टीका केली. त्याला प्रत्युत्तर देताना शिवसेनेचे राष्ट्रीय संघटक हेमराज शहा म्हणाले की, गुजराती माणसाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आपडा म्हटल्यावर भाजपच्या नेत्यांचा तीळपापड का झाला असा प्रश्न उपस्थित केला. तसेच 1992-93 च्या मुंबई दंगलीमध्ये गुजराती माणसांना संरक्षण देऊन खरी मदत करण्याचे काम शिवसेना आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीच केले होते याबरोबरच 'मी मुंबईकर म्हणून मुंबईतील सर्व धर्मियांना उद्धव ठाकरे यांनी आपलेपण दिले असेही हेमराज शहा म्हणाले. मुंबईत भाजपला फक्त लोढा हवे असून उर्वरित गरीब गुजरातीमारवाडी समाज नको असल्यामुळे गुजराती समाज भाजपवर नाराज असून त्यांना उद्धव ठाकरे व शिवसेना आपले वाटत वाटतात येणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीत गुजराती समाज भाजपच्या पायाखालची वाळू सरकवल्या शिवाय राहणार नाही असेही हेमराज शहा यांनी नमूद केले

शिवसेनेच्या गुजराती समाजाच्या मेळावा आयोजनावर टीका करतांना भाजपचे नेते रावसाहेब दानवे म्हणाले की परप्रांतीयांबाबतची शिवसेनेची भूमिका वेळोवेळी स्पष्ट झालेली असुन शिवसेना नेहमी आपल्या सोयीनुसार भूमिका बदलत आलेली आहे. त्यामुळे शिवसेना भविष्यात मुस्लीम मेळाव्याचे देखील आयोजन करू शकते. कारण सत्तेसाठी युतीधर्म तोडून भिन्न विचारधारा असणाऱ्या पक्षांसोबत शिवसेनेने आघाडी करून सरकार स्थापन केले आहे.

**शिवसेनेचा मुस्लिमांना आकर्षित करण्याचा प्रयत्न: भाजप'ची कडवी टीका**

मुंबई महानगरपालिकेवरील आपली पकड कायम ठेवण्यासाठी शिवसेनेने आता अनेक नवे पर्याय शोधण्यास सुरुवात केली असु त्या रणनीतीचा भाग म्हणून शिवसेनेने गुजराती लोकांबरोबरच मुस्लिमांमध्येही जनाधार वाढविण्याच्या दिशेने प्रयत्न सुरु केल्याचे दिसते यासाठी शिवसेनेच्या वडाळा शाखेने नववर्ष निमित्ताने ऊर्दू भाषेत कॅलेंडर (शिवशाही कॅलेंडर) काढले. या कॅलेंडर काही मोजके मराठी शब्द वगळता इतर मजकूर ऊर्दू व इंग्रजी भाषेत असुन त्यात शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या नावापुढं'जनाब' असं लिहिण्यात आलेले असुन तारखा, चंद्रोदय, सूर्योदय मुस्लिम कॅलेंडरनुसार दिले आहे. या कॅलेंडरमधील मजकुरावरून भाजपने शिवसेनेवर जोरदार टीका केली. भाजपचे आमदार व प्रवक्ते अतुल भातखळकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून हे कॅलेंडर शेअर करत यातील काही उल्लेखांवरून शिवसेनेवर कडवट टीका करतांना म्हणाले की 'औरंगाबादचे संभाजीनगर असे नामकरण करणे दूर पण मतांच्या लालसेपायी शिवसेनेने 'हिंदुहृदयसम्राट' बाळासाहेब ठाकरे यांचे नामकरण 'जनाब बाळासाहेब ठाकरे' असे करून दाखवले. पुढे ते असेही म्हणाले की, शिवसेनाप्रमुखांना 'जनाब बाळासाहेब' म्हणून शिवसेनेने वैचारिक सुंता करून घ्यावी, तो त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. याप्रकारे भाजपने हिंदुत्वाच्या मुद्यावरून शिवसेनेवर टीका केली.

यापूर्वी 'महिन्याभर आधी शिवसेनेच्या दक्षिण मुंबई विभागाचे प्रमुख पांडुरंग सकपाल यांनी भागवत गीता पठणाच्या धर्तीवर मुस्लीम समाजातील मुलांसाठी अजान स्पर्धा आयोजित केली होती. तसेच स्पर्धेच्या खर्चाची जबाबदारी देखील शिवसेनेने स्वीकारली होती. त्यावर भाजपने केलेल्या टीकेला उत्तर देतांना सकपाल म्हणाले की, हा विरोध चुकीचा असुन अजान महाआरतीप्रमाणे महत्वाची असुन शांती व प्रेमाचे प्रतिक आहे.

दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती आणि गीता जयंती यानिमित्त भाजपाच्या आध्यात्मिक समन्वय आघाडीच्या वतीने ठाण्यातील सहयोग मंदिरात गीता पठण व वंदे मातरम गायन स्पर्धा भरविण्यात आली होती. यावेळी भाजप नेते व आमदार आशिष शेलार शिवसेनेवर टीका करतांना म्हणाले की, हिंदूत्ववादाचा विसर पडून सत्तेतील शिवसेना अजान स्पर्धा आयोजित करते. तर भाजप'ने राष्ट्रप्रेमासाठी वंदेमातरम व भगवद्गीता पठण स्पर्धा घेतल्या. यातून राष्ट्रभक्तीच्या दृष्टिने कोणता पक्ष पुढे आहे ते जनतेला समजते.

**शिवसेनेच्या राजकारणाची बदलती दिशा**



TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

उद्धव ठाकरे यांनी 2003 मध्ये शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख झाल्यावर शिवसेनेच्या 'मराठी माणूस' या मुळ मुद्द्याच्या पुढे जाऊन 'मी मुंबईकर' अशी घोषणा दिली होती. त्यानंतर शिवसेनेने उत्तर भारतीयांचे मेळावे आयोजित करून 'छठ पूजा' देखील केली होती. त्याप्रमाणेच आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने 'मुंबई मा जलेबी फापडा' असा नारा देऊन गुजराती लोकांचा मेळावा आयोजित करणे हे 'मी मुंबईकर' या भूमिकेशी सुसंगतच आहे. शिवसेनेचा हा नवा राजकीय प्रयोग पक्षाच्या बदलत्या धोरणात्मक निर्णयाची परिणीती असून उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुजराती व हिंदी भाषिकांना जवळ करणे क्रमप्राप्तच आहे.

**निष्कर्ष**

शिवसेनेने मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुजराती मतदारांना आकर्षित करण्यासाठी दिलेली 'मुंबई मा जलेबी फापडा; उद्धव ठाकरे आपडा!' ही घोषणा जितकी आकर्षक आहे तितकेच शिवसेनेचे गुजराती प्रेम फसवे आहे. तसेच भाजपने गुजराती भाषिकांना 'आवो मारे गुज्जुभाई म्हणत साद घालने हे देखील सवंग पद्धतीचे राजकारण आहे. असेच डावपेच भाजपने औरंगाबादच्या नामांतराच्या प्रश्नावरून आखले आहे. मात्र शिवसेना, भाजप, मनसे आणि सर्वच राजकीय पक्षांच्या निवडणूक रणनीतीचा भाग म्हणूनच याकडे पहावे लागेल. पण मनसेच्या उदयापूर्वी शिवसेनेने गुजराती दुकानदारांच्या अमराठी पाट्या फोडलेल्या आहेत व गुजराती लोकांच्या मांसाहार न करण्याच्या वृत्तीवर टीकाही केलेली आहे. याबरोबरच गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये गुजराती भाषिकांना सदनिका देण्याच्या धोरणाविरुद्ध शिवसेनेने आंदोलन देखील केलेले आहे. या सर्व घटनांची पार्श्वभूमी असताना गुजराती भाषिक मतदारांना स्वतःकडे आकर्षित करणे हे शिवसेनेपुढील मोठे आव्हान असल्याचे दिसते. तरीपण शिवसेनेने गुजराती भाषिकांना साद घालण्याची जी रणनीती आखली आहे, त्यास त्यांचा किती प्रतिसाद मिळतो हे पुढील काळात दिसुन येईल.

**संदर्भसूची**

1. सकाळ, दि. 7 जानेवारी 2021, पृ.4
2. लोकसत्ता, दि. 7 जानेवारी 2021, पृ.4
3. लोकसत्ता, दि. 11 जानेवारी 2021, पृ.3
4. दिव्य मराठी, दि. 11 जानेवारी 2021, पृ.1
5. https://www.aajtak.in/india/maharashtra/story/bmc-election-shivsena-gujarati-card-mumbai-ma-jalebi-ne-fafda-uddhav-thackeray-apda-bjp-core-vote-bank-1187479-2021-01-05
6. यदु जोशी, 'मायकल जॅक्सन व्हाया जलेबी फापडा', लोकमत, दि. 8 जानेवारी 2021, पृ.2
7. लोकसत्ता, दि. 7 जानेवारी 2021, पृ.2
8. https://www.mumbailive.com/hi/politics/bjp-leader-raosaheb-danve-criticised-shiv-sena-over-gujrati-voter-rally-59880
9. https://maharashtratimes.com/maharashtra/mumbai-news/shivsena-publish-urdu-calendar-bjp-questions-about hindutva/articleshow/80044807.cms
10. https://www.mumbailive.com/hi/politics/bjp-leader-raosaheb-danve-criticised-shiv-sena-over-gujrati-voter-rally-59880
11. https://maharashtradesha.com/bjp-mla-aashish-shelar-criticize-shivsena-2/
12. सकाळ, दि. 7 जानेवारी 2021, पृ.4

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - III**
**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**



January 2021








**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

January 2021

Special Issue-Volume-III

On

***"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"***

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur, Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Prof. Kartik R. Patil**
**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor**
**P. M. Rajurwade**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Editorial Board**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Praful T. Bansod | Dr. Haresh T.Gajbhiye | Prof. Ashutosh M.Popte | Prof. Pitambar T. Pise |
| Dr. Nitin T. Katrojwar | Dr. Rajeshwar D. Rahangdale | Dr. Laxman T. Kamdi | Dr. Udhay D. Mendulkar |
| Dr. Santosh P. Bansod | Dr. Dilip S.Telang | Prof. Kishor S.Chaure | Dr. Manisha Warma |
| Dr. Rupesh M.Meshram | Dr. Sharad B. Belorkar | Dr. Subhas K. Shinde | Dr. Chetankumar Vyas |

**Published by-** Prof. Kartik R Patil, Off. Principal, Rashtrasant Tukdoji College, Chimur, Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**Price :Rs.1000**

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

# जम्मू-काश्मीरमधील जिल्हा विकास परिषद निवडणूक : गुपकार आघाडीचे यश

**शरद बाबुराव सोनवणे**

सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे

**सारांश (Abstract)**

केंद्रात दुसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या भाजप'ने ऑगस्ट 2019 मध्ये 370 वे कलम रद्द केले व तसेच जम्मू-काश्मीरच राज्याचे जम्मू-काश्मीर व लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन केले. त्यानंतर 2020 च्या उत्तरार्धात जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या जिल्हा विकास परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तेथील स्थानिक पक्षांनी एकत्र येऊन फारुक अब्दुल्ला आणि मेहबूबा मुफ्ती यांच्या नेतृत्वात गुपकार आघाडीची स्थापना केली. गुपकार आघाडीला काश्मीर खोऱ्यात भरभरून बहुमत मिळाले. तसेच जम्मू विभागातही गुपकार आघाडीने आपला प्रभाव अधोरेखित असला, तरीही याठिकाणी भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या. मात्र गुपकार आघाडीला मिळालेले यश हे महत्वपूर्ण आहे. त्याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**प्रस्तावना**

भारतीय संविधानाद्वारे कलम 370 अन्वये जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा व स्वायत्तता बहाल करण्यात आली होती. केंद्रात 2019 मध्ये दुसऱ्यांदा बहुमताने सत्तेवर आलेल्या भाजप वर्चस्वीत रालोआ सरकारने रद्दबादल केले. तसेच जम्मू-काश्मीर राज्याचे विभाजन करून दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केली. यानंतर काश्मीर खोऱ्यातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने तेथील राजकीय पुढाऱ्यांना नजरकैद केले होते पुढे त्यांची सुटका करण्यात येऊन, केंद्रशासित जम्मू-काश्मीरमध्ये नोव्हेंबर-डिसेंबर 2020 मध्ये जिल्हा विकास परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यासाठी जम्मू-काश्मीरमधील स्थानिक पक्षांनी एकत्र येऊन गुपकार आघाडी स्थापन करून एकत्रितपणे या निवडणुका लढविल्या आणि काश्मीर खोऱ्यात गुपकार आघाडीने आपले वर्चस्व अधोरेखित केले. तर जम्मू विभागात भाजपने काँग्रेसला बाजूला सारून मुसंडी मारली. तरीदेखील गुपकार आघाडीने मिळविलेले यश हे अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण ठरले. त्यासंबंधीची चर्चा व विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे

**जम्मू-काश्मीरमधील स्थानिक पक्षांचा गुपकार आघाडी जाहीरनामा: भाजप'ची प्रतिक्रिया**

जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुका अब्दुल्ला यांच्या श्रीनगर मधील गुपकार मार्गावरील निवासस्थानी पाच स्थानिक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन केंद्र सरकारच्या काश्मीर विषयक धोरणाविरोधात एका आघाडीची स्थापना करून एक राजकीय कार्यक्रमपत्रिका जाहीर केली. त्यास "गुपकार जाहीरनामा" म्हटले जाते. या गुपकार आघाडीत नॅशनल कॉन्फरन्स, पीपल्स डेमोक्रेटिक पार्टी, माकप, जम्मू काश्मीर पीपल्स कॉन्फरन्स आणि आवामी नॅशनल कॉन्फरन्स या पाच पक्षांचा समावेश1 आहे. 22 ऑगस्ट 2020 रोजी या सर्व राजकीय पक्षांनी असा संकल्प केला आहे की, ते जम्मू-काश्मीरमध्ये 5 ऑगस्ट 2019 च्या पूर्वीसारखा विशेष दर्जा मिळविण्यासाठी संघर्ष करतील. पीडीपी अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती सईद ह्या उपाध्यक्ष तर नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे फारूक अब्दुल्ला हे 'गुपकार आघाडी'चे अध्यक्ष2 आहेत. जम्मू-काश्मीरमधील या स्थानिक पक्षांच्या 'गुपकार घोषणापत्र आघाडी'स काँग्रेसच्या समर्थनावर भाजपने कठोर शब्दात टीका केली. भाजपने या आघाडीला 'गुप्त आघाडी' असे संबोधून काश्मीरमध्ये कलम 370 पुन्हा बहाल करणे हा यांचा एकमेव उद्देश असल्याचे सांगत, पाकिस्तानला हेच अपेक्षित असल्याचे म्हटले. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूक अब्दुल्ला यांनी कलम 370 पुन्हा लागू करण्यासाठी गरज पडल्यास चीनची मदत घेऊ असे म्हटले होते. तसेच पीडीपी'च्या अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती यांनी तिरंगा न उचलण्यासंबंधी वक्तव्य केले होते त्यासंदर्भात काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट करावी असेही भाजपने म्हटले होते. याबरोबरच जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे संविधानातील कलम 370 हे केंद्र सरकारने लोकशाही मार्गाने काढले असून, तो चीन किंवा पाकिस्तानचा कायदा नसून भारताचा कायदा असल्याचे भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी म्हटले पुढे ते असेही म्हणाले की, गुपकार आघाडीचा एक भाग चीनला भेटू इच्छितो, दुसरा तिरंगा हातात घेऊन इच्छित नाही; अशावेळी पी.चिदंबरम म्हणतात की, कलम 370 हटवणे अन्यायकारक असून, आम्ही ते पुन्हा लागू करू इच्छितो. पाकिस्तानलाही हेच अपेक्षित असल्याने पाकने कलम 370 काढून घेण्यावर आक्षेप घेतला होता. अशा या गुप्त आघाडीत राहुल गांधी व सोनिया गांधी3 हे देखील सहभागी आहेत की काय असा प्रश्न देखील भाजप प्रवक्त्याने उपस्थित केला होता.

**जम्मू-काश्मीरमधील जिल्हा विकास परिषद निवडणूक निकालाचे विश्लेषण**

जम्मू-काश्मीरमध्ये जिल्हा विकास परिषदेच्या 280 जागांसाठी आठ टप्प्यात 28 नोव्हेंबर ते 19 डिसेंबर 2020 दरम्यान निवडणूक पार पडली. जम्मू-काश्मीरला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच होत असलेल्या निवडणुकीकडे सर्व देशाचे लक्ष लागले होते काश्मिरचा विशेष दर्जा काढून घेण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचा विरोध करत फारुख अब्दुल्ला यांचा नॅशनल कॉन्फरन्स, मेहबूबा मुफ्ती सईद यांचा पीपल्स डेमोक्रॅटिक पक्ष आणि इतर पाच पक्षांनी एकत्र येऊन गुपकार आघाडी स्थापन करून, या आघाडीच्या बॅनरखालीच निवडणूक लढवली. यापूर्वी 370 वे कलम रद्द करण्यात आल्याचा निर्णय जाहीर होताच त्याविरोधात काश्मीर खोऱ्यात संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्यावर काश्मीर खोर्या◌ातील नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी यासारख्या प्रमुख पक्षांच्या नेत्यांना स्थानबद्ध करण्यात आल्यामुळे तेथील राजकीय प्रक्रिया ठप्प झाली होती. तसेच नॅशनल कॉन्फरन्सचे नेते व माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा पुनर्स्थापित झाल्याशिवाय कोणतीही निवडणूक लढविणार नसल्याचे यापूर्वी जाहीर केले होते. त्यामुळे या



PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

निवडणुका होऊन त्यात तेथील प्रादेशिक पक्ष, राष्ट्रीय पक्ष व अन्य लहान-मोठ्या पक्षांनी सहभागी होणे, मतदारांनीही लोकशाहीतील मतदानाचा हक्क बजावणे आणि निवडणूक शांततेत पार पडणे या सर्व गोष्टी दहशतवाद व हिंसाचाराने ग्रस्त असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये विशेष उल्लेखनीय ठरल्या.4 जम्मू-काश्मीर मधील 20 जिल्ह्यांमधील प्रत्येकी 14 मतदारसंघातील एकूण 280 जागांसाठी झालेल्या निवडणुकीत 75 जागांवर विजय मिळवून भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला. तर फारूक अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील सात पक्षांच्या 'पीपल्स अलायन्स फॉर गुपकार डिक्लेरेशन'ला 112 जागांवर विजय मिळाला. त्यात नॅशनल कॉन्फरन्स 67, पीडीपी 27, जम्मू काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक फ्रंट 2, माकप 5, जम्मु काश्मीर पीपल्स मुव्हमेंट 3, जम्मू काश्मीर पीपल्स कॉन्फरन्स 8 जागांवर विजयी झाले. स्वबळावर निवडणूक लढलेल्या कॉंग्रेसला 26जागांवर विजय मिळाला. तसेच अल्ताफ बुखारी यांच्या जम्मू-काश्मीर पार्टीने 12 जागा जिंकल्या आणि अन्य पक्षांमध्ये जम्मू काश्मीर नॅशनल पॅंथर पार्टीला 2 तर बसपाला 1 जागा मिळाली. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे 49 जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले.5 देशातील इतर राज्यांप्रमाणे भाजपने जम्मू-काश्मीरमधील या निवडणुकीत विकासाच्या नावावर मते मागितली होती. पण हा मुद्दा तेथे फारसा प्रभावी ठरला नाही. भाजपला 20 पैकी 5 जिल्ह्यात बहुमत मिळाले असले तरी ते सर्व जम्मूमधील हिंदू बहुसंख्य असलेले जिल्हे आहेत. 95 टक्के हून अधिक मुस्लिम लोकसंख्या असलेल्या काश्मीर खोऱ्यात भाजपला केवळ 3 जागा मिळाल्या. 20 पैकी 7 जिल्ह्यात 'गुपकार आघाडी'ला बहुमत मिळाले. तेथील 5 जिल्ह्यात कॉंग्रेसने एक - दोन जागा जिंकल्या असूनही गुपकार आघाडीला कॉंग्रेसचा पाठिंबा घ्यावा लागेल अशी परिस्थिती आहे. कारण बहुमतासाठी ज्या जिल्ह्यांमध्ये गुपकार आघाडीला जागा कमी पडत आहेत, तेथेच कॉंग्रेसला विजय मिळालेला आहे. मात्र निवडणुकीपूर्वी भारतीय राष्ट्रध्वज हातात घेण्यास व भारतीय संविधानानुसार शपथ घेण्यास गुपकार आघाडीने नकार6 दिलेला असल्यामुळे त्यांना साथ देण्याबाबत कॉंग्रेसमध्ये संभ्रम आहे. जम्मू'मधील 6 जिल्हा परिषदांमध्ये भाजपला विजय मिळालेला असून 4 जिल्हा परिषदांमध्ये गुपकार आघाडी विजयी झाली आहे. तसेच काश्मीरमध्येही गुपकार आघाडीला 9 जिल्हा परिषदांमध्ये विजय मिळाला आहे. भाजपचा प्रभाव असलेल्या जम्मूमध्ये देखील गुपकार आघाडीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जम्मूमधील 140 जागांपैकी 71 जागा भाजपला मिळाल्या तर नॅशनल कॉन्फरन्स'ला 25 आणि पीडीपी'ला 1 जागा मिळाली- तर येथील 17 जागांवर विजय मिळवण्यात कॉंग्रेस पक्ष यशस्वी ठरला. दुसऱ्या बाजूने काश्मीर खोऱ्यातील 140 जागांच्या निवडणुकीत भाजपची निराशा होऊन येथील 53 जागांवर निवडणूक लढवलेल्या भाजपला केवळ 3 जागा जिंकता आल्या. याउलट नॅशनल कॉन्फरन्सला 42 आणि पीडीपी ला 26 जागा मिळाल्या.

याप्रकारे काश्मीर खोऱ्यात गुपकार आघाडीने कुपवाडा, बडगाव, पुलवामा, अनंतनाग, कुलगाव व गंदरबल जिल्ह्यात स्पष्ट बहुमत मिळवले असून बारामुल्ला, शोपियाँ व बंदीपोरा जिल्ह्यात त्यांना बहुमतासाठी केवळ एक जागा कमी मिळाली. गुपकार आघाडीतील नॅशनल कॉन्फरन्सला 67, पीडीपी'ला 27, पीपल्स कॉन्फरन्सला 8, माकप'ला 5 व जम्मू-काश्मीर पीपल्स मुव्हमेंटला 3 जागा मिळाल्या. श्रीनगर जिल्ह्यात अपनी पक्षाने 3 जागा जिंकल्या तर येथे गुपकार आघाडीला 3, भाजपला 1 आणि अपक्षांना 7 जागा मिळाल्या. जम्मू विभागात भाजप'ला कथुआ, सांबा, जम्मु, उधमपुर व डोडामध्ये बहुमत मिळाले असून रियासी येथे 7 जागा मिळाल्या.8 कलम 370 हटवल्यानंतर जम्मू-काश्मीरमधील जनजीवन विस्कळीत विस्कळीत झालेले होते, रोजगार बुडाले, उद्योगधंदे मोडकळीस आले होते, यामुळे लोकांच्या मनात नाराजी होती. एकीकडे जम्मू-काश्मीरचा स्वतंत्र राज्याचा दर्जा काढून केंद्रशासित प्रदेश करण्यात आल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील लोक नाराज होते. तर दुसऱ्या बाजुस जम्मू आणि लेह मध्ये मात्र यातून काही चांगले घडेल अशी अपेक्षा होती. पण दरम्यान कोविड महामारी सुरु झाल्यामुळे या विस्कळीतपणात आणखी भर पडल्यामुळे पर्यटन बंद होऊन स्थानिक तरुणांचे दहशतवादाकडे वळण्याचे प्रमाण वाढले. या सर्व विपरीत परिस्थितीवर कुणीतरी आपल्याला पर्याय देईल या आशेतून या निवडणुकीकडे पाहिले गेले. डॉ.फारुख अब्दुल्ला, ओमर अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती यांच्यासह हजारो कार्यकर्ते तुरुंगात असताना त्यांच्यावर दहशतवादापासून भ्रष्टाचारापर्यंत सर्व आरोप होऊनही त्यांना काही प्रमाणात पाठिंबा मिळाला. पीडीपी'चे युथ प्रेसिडेंट वाहिद परा एनआयए'च्या ताब्यात असतानाही निवडून आले. याचाही अर्थ समजून घेण्याची गरज आहे. ओमर अब्दुल्ला यांनी हा विजय म्हणजे जनतेचा गुपकार जाहीरनाम्याला पाठिंबा असल्याचे म्हटले9 असले तरीही असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

केंद्र सरकारने या निवडणुकीस कलम 370 रद्द करण्याच्या निकालावरील जनमत असे स्वरूप दिले होते. त्यामुळे भाजपने या निवडणूकीत पक्षाला मोठा विजय मिळाला असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यासाठी काश्मीरी जनतेचे अभिनंदन करत हा नरेंद्र मोदी यांच्या समतोल विकासनीतीचा आणखी एक विजय असल्याचे मत व्यक्त केले. तर रविशंकर प्रसाद यांनी 'काश्मिरच्या खोऱ्यात कमळ फुलले' असे म्हटले. या निकालावर प्रतिक्रिया देतांना ओमर अब्दुल्ला यांनी असा दावा केला की, आम्ही काश्मीर खोऱ्यासह संपूर्ण विभाग विभागातही चांगले यश मिळविले असून भाजप काश्मीर खोऱ्यात पूर्णतः अपयशी ठरला आहे. म्हणून आता आमचे हे यश पाहून भाजप विधानसभा निवडणूक जाहीर करणार नाही. कारण भाजपचा जर लोकशाहीवर विश्वास असता तर आतापर्यंत निवडणूक जाहीर केली असती. ओमर अब्दुल्ला पुढे असेही म्हणाले की, 'काश्मीर खोऱ्यात भाजपला 3 जागा मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन मात्र आम्हाला जम्मू भागात 35 जागा मिळाल्या त्याचे काय? संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये गुपकार आघाडीचे अस्तित्व आहे, हे भाजपने मान्य करावे. आम्ही केवळ काश्मीर खोऱ्यातील पक्ष नाही.'

**जम्मू-काश्मीरमध्ये जमीन खरेदी करण्यास केंद्राची परवानगी**



TSS's Smt. V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

केंद्र सरकारने ऑगस्ट 2019 मध्ये जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम 370 रद्दबादल करून 'जम्मू-काश्मीर' व 'लडाख' अशा दोन केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती केली. पुढे 27 नोव्हेंबर 2020 रोजी केंद्र सरकारने केंद्रशासित जम्मू-काश्मीर पुनर्रचना (केंद्रीय कायद्याचा स्वीकार) तिसरा आदेश 2020 अशी अधिसूचना जारी करून केंद्रशासित प्रदेशातील जमीन खरेदीसंबंधी कायद्यात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. यानुसार जम्मू-काश्मीरमधील शहरी जमीन आणि अचल संपत्ती आता कोणत्याही राज्यातील रहिवाशी खरेदी करू शकतात. यापूर्वी केवळ जम्मू-काश्मीरमधील रहिवाशांनाच राज्यात जमीन खरेदी करण्यास परवानगी होती. परंतु उपरोक्त अधिसूचनेनुसार केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशातील जमिनीशी संबंधित जम्मू-काश्मीर विकास कायद्याच्या कलम 17 मधून 'राज्याचे कायमस्वरूपी रहिवासी' हा शब्द काढून टाकल्यामुळे आता देशातील कोणताही व्यक्ती जम्मू काश्मीर आणि लडाख मध्ये जमीन खरेदी करून तेथे स्थायिक होऊ शकतात. मात्र तेथील शेतजमीन खरेदी करण्यावरील बंदी कायम आहे. याप्रकारे केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमधील 26 कायदे रद्द केले किंवा त्यात बदल केले आहेत.11 याप्रकारे, जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे संविधानातील कलम 370 हटवल्यानंतर काश्मीरमध्ये बाहेरून येणाऱ्यांना सरकार जमीन, कर सवलती देत असतांना स्थानिकांना मात्र किमान सुविधा मिळत नसल्याची भावना काश्मिरी जनतेत असल्याचे या निवडणुकीत दिसून आले. तसेच आपल्याकडून सर्वच काढून घेतले जात असल्याची भावना देखील तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेली आहे. असे एकुन चित्र असतांना जिल्हा विकास परिषदेच्या निवडणुकांचा निकाल हा केंद्र सरकारच्या 370 कलम रद्द करण्याच्या निर्णयावरचे शिक्कामोर्तब असल्याचे म्हणता येणार नाही. फारतर ही जम्मू-काश्मीरच्या लोकांची शांततेशी, विकासाशी व मुख्य प्रवाहाशी सन्मानाने जोडले जाण्याची अपेक्षा आहे, असे म्हणता येईल.12 एकंदरीत या निवडणुकांचे निकाल हे केंद्राच्या काश्मिरविषयक धोरणांना मिळालेली पावती असल्याची समजूत करून घेणे म्हणजे, काश्मिरच्या एकूण राजकीय प्रश्नांचे गांभीर्य कमी लेखण्यासारखे होईल. देशाच्या उर्वरित भागातील मतपेढी डोळ्यासमोर ठेवून काश्मीर खोऱ्याकडे पाहण्याची केंद्रातील सत्ताधाऱ्यांची सवय जुनीच असून, ती या निवडणुकीतही दिसून आली. प्रचाराच्या काळात काश्मीरमधील स्थानिक पक्षांच्या गुपकार गटाचा 'गुपकार गॅंग' असा उल्लेख करून त्यांच्या एकूण राजकीय स्थानावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न भाजपने केला. परंतु काश्मीर खोऱ्यात पुन्हा राजकीय प्रक्रिया सुरळीत होऊन तेथे स्थैर्य निर्माण व्हावे, असे वाटत असेल तर केंद्र सरकारला आणि सत्ताधारी भाजपला अधिक व्यापक भूमिकेतून काश्मीर प्रश्नाकडे पहावे लागेल.13 तरच निवडणुका यशस्वीपणे पार पडल्यामुळे जी काही अनुकूलता दिसली आहे, तिचा फायदा घेता येईल.

**निष्कर्ष**

जम्मू-काश्मीरमधील जिल्हा विकास परिषदेच्या निवडणुकीत सर्वाधिक जागा गुपकार आघाडीला मिळाल्या. निवडणुकीपूर्वी गुपकर आघाडीतील नेत्यांवर लादलेल्या वेगवेगळया निर्बंधाचा विचार करता हे यश उठून दिसणारे आहे. काश्मीर खोऱ्यात गुपकार आघाडीने स्वतःचे वर्चस्व सिद्ध केले. असे असले तरी भाजपने जम्मूत 70 हून अधिक जागा जिंकल्या असल्याने त्यांचे हे यश कमी लेखता येणार नाही. कारण जम्मूमधील काँग्रेसचे पूर्वीचे स्थान आता भाजपने घेतले असल्याचे दिसते. तसेच गुपकार आघाडीतही नॅशनल कॉन्फरन्स'ला लक्षणीय यश मिळाले असून त्या तुलनेत पीडीपी निष्फळ ठरला असल्याचे दिसते. देशाच्या इतर भागातील मुस्लिम जनता भाजपला काही प्रमाणात स्वीकारू लागली असली, तरी काश्मीरमधील मुस्लिम जनता यासाठी अजूनही तयार नसल्याचे या निवडणूक निकालातून दिसून आले. इतर मुसलमानांपेक्षा काश्मीर खोऱ्यातील मुस्लिमांची विचारसरणी वेगळी असून अनेक वर्षापासून त्यांच्यात असलेली फुटीरवादाची भावना काढून टाकण्यासाठी, त्यांच्यावर कडक निर्बंध लादणे आणि निवडणुकीवर लक्ष देणे, यापेक्षा आणखी बरेच काही करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी काश्मीरमधील स्थानिक पक्षांच्या माध्यमातून तेथील जनतेला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच चिघळलेला प्रश्न सोडवण्यासाठी नेहमी बळाचा वापर करणे हा पर्याय ठरू शकत नाही, हे देखील सरकारने लक्षात घेणे गरजेचे असल्याचे या निवडणुकीच्या निकालातून अधोरेखित झाले आहे.

1. संदर्भसूची
2. लोकसत्ता, दि. 24 डिसेंबर 2020, पृ.7
3. दिव्य मराठी, दि. 18 नोव्हेंबर 2020, पृ.9
4. कित्ता
5. सकाळ, दि. 24 डिसेंबर 2020, पृ.6
6. दिव्य मराठी, दि. 24 डिसेंबर 2020, पृ.7
7. चित्रलेखा, दि. 18 जानेवारी 2021, पृ.12
8. आऊटलुक, दि. 11 जानेवारी 2021, पृ.10
9. लोकसत्ता, दि. 24 डिसेंबर 2020, पृ.5
10. संजय नहार, 'जम्मू-काश्मीरच्या जनतेला नेमके काय हवे आहे?', लोकमत, दि. 24 डिसेंबर 2020, पृ.4
11. सकाळ, दि. 24 डिसेंबर 2020, पृ.7
12. बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी, जानेवारी 2021, पृ.48,49
13. उपरोक्त, संजय नहार, 'जम्मू-काश्मीरच्या जनतेला नेमके काय हवे आहे?'



T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

Special Issue - IV
Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation



January 2021




**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**January 2021**

## Special Issue-Volume-IV

## On

***"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"***

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Prof. Kartik R. Patil**
**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor**
**P. M. Rajurwade**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Editorial Board**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Praful T. Bansod | Dr. Haresh T.Gajbhiye | Prof. Ashutosh M.Popte | Prof. Pitambar T. Pise |
| Dr. Nitin T. Katrojwar | Dr. Rajeshwar D. Rahangdale | Dr. Laxman T. Kamdi | Dr. Udhay D. Mendulkar |
| Dr. Santosh P. Bansod | Dr. Dilip S.Telang | Prof. Kishor S.Chaure | Dr. Manisha Warma |
| Dr. Rupesh M.Meshram | Dr. Sharad B. Belorkar | Dr. Subhas K. Shinde | Dr. Chetankumar Vyas |

**Published by-** Prof. Kartik R Patil, Off. Principal, Rashtrasant Tukdoji College, Chimur, Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors** **Price :Rs.1000**

TSS's Smt. V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-IV *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

# मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीचे ऐतिहासिक अवलोकन

**शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे
**ई-मेल** – sharadpolsci@gmail.com

**सारांश (Abstract)**

मराठवाड्यातील औरंगाबाद शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून गोरगरीब शोषित, वंचित, पीडित, दलित जनतेस उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यानंतर औरंगाबाद येथे विद्यापीठ स्थापनेचा निर्णय झाला असताना, या विद्यापीठास योग्य असे नाव देण्यासाठी ज्या काही नावांचा विचार झाला होता, त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देखील नाव होते. मात्र या विद्यापीठास 'मराठवाडा' हे प्रादेशिक अस्मितादर्शक नाव देण्याचा निर्णय झाला. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मराठवाड्यातील शैक्षणिक कार्य लक्षात घेऊन त्यांचे नाव या विद्यापीठास द्यावे अशी मागणी नंतरच्या काळात पुढे आली त्यास महाराष्ट्र शासनाने सकारात्मक प्रतिसाद देत विधिमंडळात विद्यापीठ नामांतराचा ठराव पारित केला त्यानंतर मात्र मराठवाड्यात नामांतरवादी विरुद्ध नामांतर विरोधक असे दोन गट पडले आणि संघर्ष सुरू झाला. त्या संघर्षाला हिंसक वळण देखील लागले. नामांतरवादी दलित जनता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावात 'दलित अस्मिता' पाहत होती तर नामांतर विरोधक मराठवाडा या प्रादेशिक अस्मितेस पुसू देण्यास तयार नव्हते. अखेरीस मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आणि दोन्ही बाजूंचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत शोधनिबंधात या मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीचे ऐतिहासिक अवलोकन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर 1949 मध्ये औरंगाबादला आले असतांना त्यांना मराठवाड्यात उच्च शिक्षणाची दुरावस्था असल्याचे दिसले होते. म्हणून त्यांनी मराठवाड्यातील शैक्षणिक मागासलेपण दूर करण्याच्या हेतूने 1950 मध्ये औरंगाबादला मिलिंद कॉलेजची स्थापना केली. म्हणून मराठवाड्यात उच्च शिक्षणाचा पाया घालण्याचे श्रेय डॉ.आंबेडकर यांच्याकडे जाते. तसेच मराठवाड्यात विद्यापीठ स्थापनेची गरज असल्याचे देखील त्यांचे मत होते. पुढे 1958 मध्ये औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले. तत्पूर्वी 1957 मध्ये विद्यापीठाला कोणते नाव द्यावे हे ठरविण्यासाठी नेमलेल्या न्या.पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमधील सदस्य असलेले प्राचार्य म.भि.चिटणीस यांनी औरंगाबाद येथील विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याची सूचना मांडली होती पण त्यावर एकमत न झाल्याने विद्यापीठाला 'मराठवाडा विद्यापीठ' असे प्रादेशिक अस्मितादर्शक नाव देण्यात आले.

मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेनंतर एकोणीस-वीस वर्षांनी महाराष्ट्रातील विशेषत: मराठवाड्यातील पुरोगामी, डाव्या व आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्यांनी आणि दलित जनतेने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करून त्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याकडे केली. त्यावर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर नामांतरवाद्यांनी यासाठी आंदोलन सुरू केले. याप्रकारे 1977 पासून सुरू झालेल्या नामांतर चळवळीला अखेर यश येऊन 14 जानेवारी 1994 रोजी मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार झाला. याप्रकारे नामांतराच्या मुद्यावरून ज्या अस्मितांचा संघर्ष निर्माण झाला होता, त्याचे ऐतिहासिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आलेला आहे.

**मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

मराठवाडा पूर्वी निजाम राजवटीच्या आधिपत्याखाली असल्यामुळे सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिक दृष्ट्या अतिशय मागासलेला होता. म्हणून हा विभाग शैक्षणिकदृष्ट्या प्रगत व्हावा यासाठी डॉ.आंबेडकरांनी औरंगाबाद येथे 1950 मध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करतेवेळी महाविद्यालयाच्या उद्देशपत्रिकेत 'मराठवाड्यातील कनिष्ठ - मध्यमवर्गातील मुलांना, अनुसूचित जाती-जमातींच्या व विमुक्त भटक्या जाती-जमातीच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी देणे हे ध्येय समाविष्ट केले होते.1 त्यावेळी मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी गोविंदभाई श्रॉफ व माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वात एक शिष्टमंडळ बाबासाहेबांच्या भेटीला आले होते. त्यांनी बाबासाहेबांची बोलताना विचारले होते की, आपण सुरु करत असलेले महाविद्यालय याठिकाणी चालेल का? त्यावेळी बाबासाहेब म्हणाले होते की, येथे केवळ एक महाविद्यालय सुरू करून चालणार नाही तर याठिकाणी एक विद्यापीठही उभारले जावे अशी माझी तीव्र इच्छा आहे.2 यावरून डॉ. आंबेडकरांचा मराठवाड्यातील मागास व शिक्षणापासून वंचित असलेल्या लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याची दूरदृष्टी दिसून येत. त्यामुळेच मिलिंद महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर अवघ्या 8 वर्षातच औरंगाबाद येथे दि. 23 ऑगस्ट 1958 रोजी 'मराठवाडा विद्यापीठ' स्थापन झाले.

मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी 27 एप्रिल 1957 मध्ये शासनाने नेमलेल्या केलेल्या न्या.पळणिटकर समितीने शासनाला स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेची शिफारस करतांनाच विद्यापीठासाठी ज्या नावांची शिफारस केली होती, त्यात औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान, दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन व सातवाहन या स्थळवाचक नावांबरोबरच 'छत्रपती शिवाजी महाराज' व 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

दोन महनीय व्यक्तींच्या नावांचा देखील समावेश होता. पण अखेरीस सर्व नावे मागे पडून विद्यापीठासाठी प्रदेशवाचक 'मराठवाडा' हे नाव स्वीकारले गेले.3 दरम्यानच्या काळात कुरुक्षेत्र विद्यापीठास 'डॉ.बी.एन.चक्रवर्ती' यांचे नाव तर दक्षिणेतील मदुराई येथील विद्यापीठाला 'कामराज नायर' हे नाव देण्यात आले. तसेच राहुरी येथील कृषी विद्यापीठाला 'महात्मा फुले' यांचे तर अकोला येथील कृषी विद्यापीठाला 'पंजाबराव देशमुख' यांचे नाव देण्यात येऊन विद्यापीठांना व्यक्तींची नावे देण्याची प्रथा सुरू झाली. परिणामी औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी पुढे आली.4 ती रास्त देखील होती.

शिक्षणापासून वंचित, उपेक्षित व मागासलेल्या मराठवाड्यातील सर्वसामान्य जनतेच्या मुलांसाठी डॉ. आंबेडकरांनी औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेजची स्थापना करून मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासाला चालना दिली होती. त्यांचे हे ऋण मानून 1974 ते 1976 याकाळात दलित संघटनांकडून मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी प्रथम कोणी केली याविषयी वेगवेगळे दावे असून 26 जून 1974 रोजी रिपब्लिकन विद्यार्थी संघाने ही मागणी केली असा एक दावा आहे, तर 10 एप्रिल 1976 रोजी 'दलित पँथरने औरंगाबाद येथे रीतसर ठराव करून ही मागणी केल्याचा दुसरा दावा आहे. मात्र 1977 मध्ये खऱ्या अर्थाने या मागणीस चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.5

**मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीची वाटचाल**

महाड येथे दि. 1 मे 1977 रोजी चवदार तळे सत्याग्रह स्मृतिदिन निमित्त तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या उपस्थितीत एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराविषयी त्यांच्याशी चर्चा केली आणि औरंगाबाद परिसरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य पाहता या विद्यापीठाला त्यांचे नाव देण्याची मागणी केली त्यास तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी अनुकूलता दर्शविल्यामुळे दलित पँथरने नामांतराचा प्रश्न अग्रक्रमानेआपल्या कार्याचा भाग बनविला. त्यासाठी दलित पँथर, युवक क्रांती दल, विद्यार्थी कृती समिती, जातपात तोडक मंडळ, दलित युवक आघाडी, विद्यार्थी पदव्युत्तर संघटना इत्यादी संघटनांनी एकत्र येऊन दि. 7 जुलै 1977 रोजी औरंगाबाद मध्ये 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर कृती समिती स्थापन केली.6 या समितीने 2 जुलै 1977 रोजी तत्कालीन शिक्षणमंत्री प्रतिभाताई पाटील यांच्याकडे विद्यापीठाचे नामांतर त्वरित व्हावे अशी मागणी केली. तर 12 ऑगस्ट 1977 रोजी मुंबई येथे मंत्रालयावर समितीने मोर्चा काढून मुख्यमंत्र्यांना विद्यापीठ नामांतराच्या मागणीचे निवेदन दिले. मुख्यमंत्र्यांनी त्याचे स्वागत करत, जनतेकडून अशी मागणी आल्यास नामांतर करता येईल असे आश्वासन दिले. यानंतर नागरी समितीने 24 सप्टेंबर 1977रोजी औरंगाबाद मध्ये मोर्चा काढल्यानंतर 2 ऑक्टोबर 1977 रोजी दलित पँथरनेही औरंगाबाद शहरात चप्पल मोर्चा काढला. पुढे 29 जून 1978 पासून नामांतरासाठी राज्यव्यापी चळवळ सुरू झाली.7

विधिमंडळाची विद्यापीठ नामांतर प्रस्तावास मंजुरी: नामांतर विरोधी कृती समितीची स्थापना

24 व 27 फेब्रुवारी 1978 दरम्यान महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होऊन 11 मार्च 1978 रोजी वसंतदादा पाटील पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. परंतु अवघ्या तीन-चार महिन्यातच शरद पवारांनी विरोधी पक्षांसोबत हातमिळवणी करून'पुलोद सरकार' स्थापन करून ते स्वतः मुख्यमंत्री बनले. 'पुलोद सरकार'मधील सर्वच घटक पक्षांचा नामांतराला पाठिंबा असल्यामुळे मुख्यमंत्री शरद पवार यांनी स्वतः 27 जुलै 1978 रोजी नामांतराचा ठराव विधानसभेत मांडला8 आणि त्याच दिवशी राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात त्यावर सविस्तर चर्चा होऊन तो ठराव संमत करण्यात आला. विधिमंडळात नामांतराचा ठराव संमत होताच मराठवाड्यात नामांतर विरोधी कृती समितीची स्थापना करण्यात आली. मराठवाड्याला स्वतंत्र अस्मिता असल्यामुळे मराठवाडा हे नाव बदलून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापीठाला देऊ नये अशी या समितीची भूमिका होती. मराठवाड्यातील बहुसंख्य वृत्तपत्रे या समितीच्या बाजूने उभी राहिली त्यातून संपूर्ण मराठवाड्यात दंगलीचा आगडोंब उसळला.9 त्या दंगलींमध्ये सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर हानी झाली.

नामांतर विरोधकांमध्ये एकीकडे अनंतराव भालेराव, गोविंदभाई श्रॉफ असे मराठवाडा मुक्ती आंदोलनाचे नेतृत्व करणारे नेते होते तर दुसरीकडे दलितांच्या वाढत्या राजकीय शक्तीला विरोध करणारे स्थानिक पुढारी होते. या पुढाऱ्यांनी नामांतर विरोधी लढ्याची सूत्रे हाती घेतल्यामुळे जातीय अस्मिता उफाळून येऊन हिंसाचाराला सुरुवात झाली. संतप्त दंगेखोरांनी दलितांना लक्ष करून दलितांच्या वस्त्या जाळल्या. पोचीराम कांबळे, जनार्धन भोवाडे, दिवाकर थोरात, चंदन कांबळे हे तरुण मारले गेले. तर गोविंदराव भुरेवार या फौजदाराला जिवंत जाळण्यात आले. याप्रकारे दलितांवर विविध प्रकारचे अत्याचार सुरू झाले10 व वातावरण हिंसक बनले. मराठवाड्यातील ह्या हिंसक उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर सर्व घटकांना विश्वासात घेऊनच नामांतराच्या ठरावाची अंमलबजावणी केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्यावर दंगली थांबल्या परंतु त्यामुळे नामांतराचा प्रश्न मात्र तसाच भिजत पडला पण तरीही दलित जनता मात्र स्वस्थ बसली नाही व त्यांनी नामांतराचा प्रश्न ज्वलंत ठेवला.

**मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न : अस्मितांचा लढा**

नामांतराच्या ठरावाची अंमलबजावणी लांबणीवर पडू लागल्यामुळे1979 च्या डिसेंबर महिन्यात दलित नेत्यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले. 6 डिसेंबर 1979 रोजी प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा 'लॉंग मार्च' सुरू केला. तर रा.सु.गवई यांनी मुंबईत 'जेलभरो आंदोलन' सुरू केले. मात्र 1980 पासून 1988 पर्यंतच्या काळात नामांतर आंदोलन बऱ्याच प्रमाणात विस्कळीत राहिले. पण जुलै 1988 मध्ये नामांतराच्या मागणीसाठी विधानभवनावर आलेल्या मोर्चाद्वारे, तसेच 6 डिसेंबर 1988 रोजी डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या दिवशी दिल्लीत संसदेसमोर करण्यात आलेल्या निदर्शनांद्वारे या आंदोलनाने पुन्हा एकदा उचल खाल्ली त्यामुळे डॉ.आंबेडकर



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

यांच्या 1990 या जन्मशताब्दी वर्षात नामांतर चळवळीने आणखी जोर धरला.11 याप्रकारे नव्वदच्या दशकात नामांतराचा प्रश्न अधिकच पेटल्यावर नामांतर विरोधक देखील अधिक सक्रिय झाले. कोणत्याही परिस्थितीत नामांतर होऊ देणार नाही अशी भूमिका त्यावेळी शिवसेनेने घेतली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठवाड्यातील (नामांतरविरोधी) जनतेला पाठिंबा देण्यासाठी 18 डिसेंबर 1993 रोजी मराठवाडा बंदची घोषणा केली होती. या बंदला फार मोठा प्रतिसाद मिळाला. तसेच शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना' या वृत्तपत्रात 'नामांतर लादले तर याद राखा!' असा अग्रलेख लिहिला गेला. तसेच पुढे या विषयावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार आणि बाळासाहेब ठाकरे यांची भेट देखील झाली, पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. मराठवाड्याचे नेते गोविंदभाई श्रॉफ यांनी त्यांची नामांतर विरोधाची भूमिका कायम असल्याचे पुन्हा एकदा जाहीर केले. त्यानंतर रिपब्लिकन नेते रामदास आठवले यांनी बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली, परंतु बाळासाहेबांनी त्यांना स्पष्ट सांगितले की कोणत्याही परिस्थितीत नामांतर होऊ देणार नाही.12

अशाप्रकारे नामांतराचा हा प्रश्न मराठवाडा ही 'प्रादेशिक अस्मिता' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावात लपलेली 'दलित अस्मिता' अशा दोन अस्मितांमधील संघर्ष होता. निजामाच्या तावडीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठी प्रदीर्घ काळ चाललेल्या संघर्षात शेकडो लोकांचे बळी गेले असल्यामुळे मराठवाडा या प्रादेशिक अस्मितेला एक धार होती. नामांतराला विरोध करणारे बहुतेक नेते पुरोगामी विचाराचे होते व डॉ. आंबेडकरांच्या नावास त्यांचा विरोध नव्हता मात्र मराठवाडा हे नाव पुसून डॉ.आंबेडकरांचे नाव देण्यास त्यांचा विरोध होता.13

एकंदरीत मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकर यांचे नाव देण्याला दोन पातळ्यांवर विरोध होता. एकतर सवर्ण आणि खेड्यापाड्यातल्या सरंजामदारांचा त्यांच्या जाती श्रेष्ठतेच्या अहंकारातून असलेला विरोध व दुसरीकडे मराठवाड्याची अस्मिता बाळगणाऱ्यांचा विरोध. ही मंडळी दलितविरोधी किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर नव्हती. मात्र त्यांची भूमिका अशी होती की, डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य औरंगाबादपुरते मर्यादित आहे. तर त्यांच्यापेक्षा अधिक व्यापक शैक्षणिक कार्य व मराठवाड्याला निजामशाहीच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी केलेले असल्यामुळे मराठवाडा विद्यापीठाला खरेतर त्यांचेच नाव देणे योग्य आहे. मात्र 'मराठवाडा' हे या प्रदेशाची अस्मिता असणारे नावच कायम ठेवण्याचा स्वामी रामानंद तीर्थ यांची इच्छा असल्यामुळे त्यांचेही नाव विद्यापीठाला देण्यात आले नाही. त्यामुळे डॉ.आंबेडकरांचे नाव विद्यापीठास देऊ नये असा मतप्रवाह निर्माण झाला.14 याप्रकारे नामांतराचा प्रश्न हा 'दलित अस्मिता' व 'प्रादेशिक अस्मिता' यामधील खरा संघर्ष होता.

**मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार : समाधानकारक तोडगा**

नामांतराचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारने हालचाली सुरू करून डॉ.बापूसाहेब काळदाते यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय समिती स्थापन केली. या समितीच्या प्रयत्नांना यश मिळाले व सर्व बाजूंचे समाधान होईल अशा प्रकारचा तोडगा निघून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार मान्य करण्यात आला. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी 14 जानेवारी 1994 रोजी अधिकृतपणे या नामविस्ताराची घोषणा केली. त्याचबरोबर नांदेड येथे स्वतंत्र विद्यापीठाची घोषणा करण्यात येऊन या विद्यापीठाला मराठवाडा मुक्ती संग्रामातील अग्रणी नेते स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव देण्याचे निश्चित केल्याचे जाहीर केले15 अशाप्रकारे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराऐवजी नामविस्तार करून मोठ्या मुत्सद्देगिरीने हा प्रश्न सोडविला.

**समारोप व निष्कर्ष**

साधारणतः 1978 ते 1994 यादरम्यान 16 वर्षे मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी नामांतर आंदोलन चालले. नामांतराचा मुद्दा दलितांनी दलित अस्मितेचा मुद्दा बनवून त्याला सामाजिक परिवर्तनाचा लढा देखील मानले दुसऱ्या बाजूला नामांतर विरोधक नामांतराच्या प्रश्नाकडे प्रादेशिक अस्मिता व वर्ग-जात श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या दृष्टिकोनातून पाहत होते. यामुळे नामांतराचा प्रश्न हिंसक वळणावर गेला. तसेच नामांतराच्या प्रश्नाने पुरोगामी महाराष्ट्रातील विशेषता मराठवाड्यातील सामाजिक स्वास्थ्य बिघडवले आणि दलित-सवर्ण यांच्यामध्ये तणाव निर्माण झाला. अखेर नामांतरवाद्यांच्या अथक प्रयत्नानंतर 14 जानेवारी 1994 रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराऐवजी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करून नामांतराचा प्रश्न दोन्ही बाजूंचे समाधान होईल अशा पद्धतीने सोडविला.

**संदर्भसूची**

1. गजानन गजभिये, 'भारतीय रिपब्लिकन पक्ष बहुजन महासंघाची भूमिका आणि राजकारण, वेदमुद्रा प्रकाशन, अमरावती, 2011, पृ.107
2. https://mr.wikipidia.org/wiki/नामांतर_आंदोलन
3. https://www.loksatta.com/vishesh_news/rename_day_celebration_of_dr.babasaheb_ambedkar_marathwada_university_1060715/
4. उपरोक्त, गजानन गजभिये, 'भारतीय रिपब्लिकन पक्ष बहुजन महासंघाची भूमिका आणि राजकारण, पृ.107,108
5. सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर,'असा घडला भारत 1947-2012' रोहन प्रकाशन, पुणे, पृ.447
6. उपरोक्त, गजानन गजभिये, 'भारतीय रिपब्लिकन पक्ष बहुजन महासंघाची भूमिका आणि राजकारण, पृ.108
7. उपरोक्त, गजानन गजभिये, 'भारतीय रिपब्लिकन पक्ष बहुजन महासंघाची भूमिका आणि राजकारण, पृ.109



T.S.S's. Smt. V. U. Patil College Sakri ... Late Dr. B.S. Desale Science ... Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

8. रविकिरण साने व निलिमा साने, 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2009, पृ.117
9. उपरोक्त, रविकिरण साने व निलिमा साने, 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण', पृ.117
10. उपरोक्त, सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर,'असा घडला भारत 1947-2012' पृ.447
11. उपरोक्त, सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर,'असा घडला भारत 1947-2012' पृ.447
12. योगेंद्र ठाकूर (.संपा), 'शिवसेना @ 50 (50 वर्षांचा मराठी अस्मितेचा आणि हिंदुत्वाचा लढा(', आमोद प्रकाशन, मुंबई, 2016, पृ.84,85
13. उपरोक्त, रविकिरण साने व निलिमा साने, 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण', पृ.165
14. https://maharashtratimes.indiatimes.com/-/articleshow/5878834.cms
15. उपरोक्त, सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर,'असा घडला भारत 1947-2012' पृ.448

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist Dhule PIN-424304

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**February - 2021**

**ISSUE No - CCXLIV (274)**

# Impact of COVID-19 on Higher Education

**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editors**
Dr. Amol Bhuyar / Dr. Dinesh Deore
G. T. Patil College Nandurbar (M.S.)

**Editor**
Dr. Mahendra Raghuwanshi
G. T. Patil College Nandurbar (M.S.)

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**February- 2021**

**ISSUE No – CCXLIV (274)**

# Impact of COVID-19 on Higher Education

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Mahendra Raghuwanshi**
Editor
G. T. Patil College Nandurbar (M.S.)

**Dr. Amol Bhuyar**
**Dr. Dinesh Deore**
Executive Editors
G. T. Patil College Nandurbar (M.S.)

Aadhar International Publications

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

© **All rights reserved with the authors & publisher**



Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 274 (CCLXXIV) | Fabruary, 2021

# कोरोना महामारीचा प्रकोप: महाराष्ट्र शासनाचे प्रभावी आपत्ती व्यवस्थापन

शरद बाबुराव सोनवणे

सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला वकै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,साक्री जि.धुळे – ४२४३०४

सारांश (Abstract)

भारतात कोविड-19 विषाणूचा पहिला रुग्ण मार्च 2020 मध्ये महाराष्ट्र राज्यात सापडला आणि त्यानंतर संपूर्ण राज्यात व देशभरात कोरोना महामारीचा प्रसार सुरू झाला. यामुळे संपूर्ण देशावर कोरोना आपत्ती कोसळून देशभर लॉकडाऊन जाहीर करावे लागले. या संकटकाळात महाराष्ट्र शासन व प्रशासनाने प्रयत्नांची पराकाष्टा करून कोविड-19 विषाणूच्या प्रसारावर बहुतांशी नियंत्रण मिळवले. त्यासाठी शासनाची सर्व भिस्त ही प्रामुख्याने आरोग्य कर्मचारी व पोलिस प्रशासन यांच्यावर होती, त्यांनी आपले कर्तव्य चोखपणे बजावले. याप्रकारे, कोरोना महामारीचा प्रादुर्भाव नियंत्रणासाठी शासनाने प्रभावीपणे राबविलेल्या विविध उपाययोजनांचा थोडक्यात परामर्श प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.

## प्रस्तावना

संपूर्ण जगभरात कोरोना महामारीने थैमान घातले असतांनात्याचा प्रकोप भारतातही झाला. विशेष करून महाराष्ट्रामध्ये त्यातही मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद अशा महानगरांमध्ये तर कोरोना महामारीने कहरच केला होता. त्यामुळे संपूर्ण देशावर आणि राज्यावर कोरोना आपत्ती कोसळली. महाराष्ट्रात अनेक राज्यातील लोक कामधंद्यासाठी येऊन राहत असल्यामुळेही महाराष्ट्र राज्यातील कोरोना आपत्ती अधिक गंभीर बनली. अशा संकटकाळात महाराष्ट्र शासन व प्रशासनाने या आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी जी प्रयत्नांची शर्थ केली, त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

## कोरोनाविषाणूचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठीमहाराष्ट्रशासनाचे युद्धपातळीवरचे प्रयत्न

महाराष्ट्रात कोरोनाचा पहिला रुग्ण 9 मार्च 2020 रोजी आढळून आला असला तरी राज्य शासनाने खबरदारीच्या उपाययोजना जानेवारी महिन्यापासूनच सुरू केल्या होत्या. त्यासाठी 'एपिडेमिक ऍक्ट' लागू करण्यात येऊन रुग्णांच्या हिताच्या दृष्टीने या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. त्याचबरोबर मॉल, चित्रपटगृहे, शाळा, कार्यालये बंद करण्याबाबत टप्प्याटप्प्याने निर्णय घेण्यात आला. पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर तसेच मुंबईतही कोरोनाचे रुग्ण आढळल्यानंतर महाराष्ट्रात टाळेबंदी करण्याचा निर्णय झाला आणि मुंबईची जीवनवाहिनी अशी ओळख असलेली लोकल सेवाही बंद झाली. त्यानंतर राज्य शासनाने सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून विविध निर्णय घेतले. रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन खाजगी रुग्णालयातील 80 टक्के खाटा शासनाने ताब्यात घेतल्या.[1] मुंबईमध्ये दहा ते पंधरा दिवसाच्या कालावधीत 'जम्बो कोविड सेंटर्स' उभारण्यात आली. तसेच मार्च, एप्रिल, मे 2020 याकाळात दररोज राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री व आरोग्यमंत्री हे सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

आयुक्तांशी सतत संपर्कात राहून परिस्थितीचा आढावा घेत होते.तसेच जनतेशी दूरसंचार साधनांद्वारे संवाद साधून लोकशिक्षण करत होते.

दरम्यान केंद्र सरकारच्या नियामक टीमने 5 मे 2020 रोजी मुंबईचा दौरा करून नजीकच्या काळात या शहरांमध्ये हजारो मृत्यू होण्याची भीती व्यक्त केली होती. तसेच काहींनी मुंबई शहर लष्कराच्या ताब्यात सोपवण्याची मागणी केली होती. परिणामी मुंबईत दहशतीचे वातावरण पसरले होते.[2]परंतु या संकटावर महाराष्ट्र सरकार आणि मुंबई महानगरपालिका यांनी अत्यंत संयमाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने मात करत कोरोना नियंत्रणाचे 'धारावी मॉडेल' विकसित केले.तसेच कोरोना चाचणीसाठी राज्यातील प्रयोगशाळांची संख्या वाढविण्यात येऊन राज्यात सर्वसामान्य जनतेसाठी कोरोना चाचणी व मास्क'च्या किंमती देखील माफक करण्यात आल्या.यामुळे महाराष्ट्र शासनाला कोरोना महामारीचा वाढता प्रसार नियंत्रित ठेवणे शक्य झाले.

**कोरोनाविषाणूचा प्रसार नियंत्रणाचा'धारावी पॅटर्न' : जागतिक आरोग्य संघटनेकडून कौतुक**

देशातील इतरराज्याच्या तुलनेतमहाराष्ट्रातकोरोना महामारीचा प्रादुर्भाव अधिक असल्यामुळे मुंबई, पुणे यासारख्या दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये कोरोनाचा प्रसार अधिक वेगाने झाला होता.मुंबईच्या धारावी झोपडपट्टीतकोरोनाचे रुग्ण मोठ्या संख्येने सापडत असल्यामुळे मुंबईत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे पथक आले होते. धारावीची पाहणी केल्यावरतेथील स्थिती कशी नियंत्रित होणार? असा प्रश्न त्यांना पडला होता. खरेतर संपूर्ण मुंबईचेच काय होणार हा प्रश्न त्यांच्यासमोर होता. मात्र मुंबई महापालिकेने धारावीतील जवळपास 90 हजार संशयितांच्या चाचण्या केल्या. संपूर्ण देशातही एवढ्या चाचण्या कोणत्याही राज्याने केल्या नव्हत्या. यासाठी निश्चित व नियोजनबद्ध धोरण आखुन व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांचे सतत मार्गदर्शन घेतले. मुंबईची लोकसंख्या, घनता, झोपडपट्टी विभाग यासह अनेक गोष्टी विचारात घेऊन योजनाबद्ध पद्धतीने काम करत धारावीतील लोकसंख्येच्या घनतेचा विचार करून मुंबईत 75 हजार जणांसाठी संस्थात्मक क्वारंटाइनची व्यवस्था केली. तसेच जास्तीतजास्त स्क्रिनिंग करण्यावर भर दिला व यासाठी खासगी डॉक्टर व रुग्णालयांची मदत घेतली. या पॅटर्नमध्ये जास्तीतजास्त लोकांची तपासणी करून आवश्यक असलेल्या लोकांची चाचणी करून त्यानंतर उपचारांची व्यवस्था व त्यांना क्वारंटाइन केले जात होते. यासाठी शासकीय यंत्रणेबरोबरच स्थानिक खासगी डॉक्टरांना विश्वासात घेतल्यामुळे जलदगतीने जास्तीतजास्त लोकांची तपासणी करणे शक्य झाले. कारण स्थानिक डॉक्टरांमुळे लोकही पुढे येऊन सहकार्य करत होते.धारावीत प्रामुख्याने हातावर पोट असलेले लोक राहात असल्यामुळे प्रशासनाने 19 हजार लोकांची सकाळ, संध्याकाळ जेवणाची व्यवस्था करतत्यांना रोज 38 हजार अन्नाची पाकिटे पुरविली. तसेच 20 हजार कुटुंबांना स्वयंसेवी संस्थांच्या मदतीमधून धान्य वितरीत केले. साधारणपणे 520 एकरात पसरलेल्या धारावीत दाटीवाटीने घरे असुन त्यात साधारणतः8 लाख लोक राहतात.मात्र तेथे केवळ 400 ते 500 सार्वजनिक शौचालये[3]असल्यामुळे करोना बाधित व्यक्तींनाशोधून त्यांच्यावर उपचार करणे हे एक मोठे आव्हान होते.तरीही मुंबईतील धारावी झोपडपट्टी मधील कोरोनाचा प्रसार रोखण्यात सरकारने यश मिळविले.यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने'धारावी पॅटर्न'ची दाखल घेऊन महापालिका प्रशासन व महाराष्ट्र शासनाचे कौतुक केले. त्यानंतर फिलिपिन्स या देशाने कोरोना प्रादुर्भाव रोकण्यासाठी धरावी पॅटर्न'चे अनुकरण करण्याचा निर्णय घेतला.पुढे संपूर्ण भारतात आणि महाराष्ट्रातही हळुहळू व टप्प्याटप्प्याने अनलॉक'ची प्रक्रिया सुरु होऊन प्राथमिकतेनुसार निर्बंध उठविले जाऊ लागले. मात्र कोरोनाचे संकट संपलेले नव्हते.

PRINCIPAL
TSS's Smt. V.P. Patil Arts & ... Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' : जनजागृती व लोकसहभाग केंद्रित योजना

राज्यातील कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' योजना राबविण्यात आली. अतिशय सोप्या भाषेत प्रभावी संवादाच्या माध्यमातून ही संकल्पना समाजामध्ये रुजवून सर्वसामान्यांमध्ये आत्मविश्वास जगविण्याचे काम या माध्यमातून झाले. कोणत्याही वैद्यकीय चळवळीचा दीर्घकालीन लाभ मिळवून देण्यासाठी समाजाचा सहभाग अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे लोकांना त्यासंबंधीचे ज्ञान देऊन त्यांचे सक्षमीकरण करणे गरजेचे असते. त्यादृष्टीने कोरोना विरुद्धच्या लढाईसाठीसमाजात जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' ही योजना सुरु केली. या योजनेच्या माध्यमातून मास्कचा वापर, सुरक्षित अंतर आणि वारंवार हातधुणे या अतिशय मूलभूत दक्षतांची माहिती करून देत कोरोना विरुद्ध लोक लढा उभारला. या योजनेच्या द्वारे सरकारने समाजाला देखील त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी 'मी जबाबदारी घेतो, तुम्ही खबरदारी घ्या' असे आवाहन जनतेला केले होते. या योजनेच्या माध्यमातून खूप प्रभावीपणे आरोग्य संवाद साधण्यात येऊन कोरोना विरुद्धच्या लढ्यात प्रत्येक कुटुंब हे एकघटक मानून राज्यात सामूहिक सामाजिक फौज उभारण्यात आली.[4] त्यामुळे समाजात एक प्रकारची मानसिक प्रतिकारक शक्ती निर्माण झाली.

'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' ही योजना राज्यात दोन टप्प्यात राबविण्यात आली. पहिल्या टप्प्यात99 टक्के म्हणजे2.76 कोटी घरांपैकी 2.74 कोटी घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामाध्यमातून 12.43 कोटींपैकी 11.92 कोटी लोकांशी थेट संपर्क साधण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात 98 टक्के म्हणजे 2.70 कोटी घरांशी व 10.01 कोटी (81 टक्के) व्यक्तींशी थेट संपर्क साधण्यात आला. या दोन्ही टप्प्यांत प्रशिक्षित पथकाद्वारे राज्यातील घराघरांना प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक व्यक्तीची ताप व ऑक्सिजन पातळी यांची तपासणी करून इतर आजारांची चौकशी करण्यात आली.तसेच त्यांना कोरोना प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण देण्यात आले. या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणानुसार 3.57 लाख ILI / SARI रुग्णांपैकी सुमारे 3.22 लाख रुग्णांची कोविड तपासणी करण्यात येऊन कोविड-19 संसर्ग झाल्याचे आढळून आलेल्या 51 हजार रुग्णांना वेळीच उपचार करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून आरोग्य पथकाने घरोघरी भेटी देऊन केलेल्या सर्वेक्षणांमध्ये मधुमेह असलेले 8.70 लाख, उच्चरक्तदाब असलेले 13 लाख, हृदयविकार असलेले 73 हजार, कर्करोग असलेले 17 हजार आणि इतर आजाराचे 1 लाख असे एकूण सुमारे 24 लाख कोमॉर्बीड रुग्ण आढळले. त्यांना आवश्यकतेनुसार पुढील उपचाराची सोय करण्यात आली. याप्रकारे महाराष्ट्र सरकारने राबविलेल्या कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे राज्यात कोरोना'ची दुसरी लाट आली नाही. एकीकडे दिल्ली, राजस्थान आणि पाश्चिमात्य देशांत पुन्हा एकदा कोरोना'चा उद्रेक झाला असतानाही महाराष्ट्रातील दैनंदिन रुग्ण संख्या कमी होत गेली.[5]याप्रकारे दोन महिने राबविण्यात आलेल्या 'माझे कुटुंब माझी जबाबदारी'या अभियानांतर्गत 12 हजारआरोग्य कर्मचारी हे राज्यातील जनतेची आरोग्य तपासणी करण्यासाठी दोनदा 35 लाख कुटुंबापर्यंत पोहोचले. त्यानंतर 'नो मास्क नो एंट्री' हे अभियान सुरू करण्यात येऊन बसस्थानके, बसेस, टॅक्सी, दुकाने व कार्यालयांमध्ये हा संदेश असलेली



PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

भित्तीचित्रे आणि स्टिकर्स चिटकविण्यात आली.तसेच मास्क न घातलेल्या 5 लाखाहून अधिक लोकांना दंड आकारण्यात आला.[6]

पुढे भारतात कोरोनावरील लसी'ला मान्यता देण्यात येऊन जानेवारी 2021 मध्ये भारतभर प्रथम कोरोना योध्यांसाठी लसीकरण सुरु झाले. तत्पूर्वी महाराष्ट्रातील कोरोना महामारीचाप्रादुर्भाव कमी होऊन, रुग्णसंख्येतही खूप घट झाली व मृतांचा आकडाही घटला.

तक्ता क्र.१

राज्यातील रुग्णसंख्येचा आलेख[7]

| महिना | मार्च (२०२०) | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टें. | ऑक्टो. | नोव्हें. | डिसें. | जाने. (२०२१) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रुग्ण संख्या | १६१ | १०,०७६ | ४१,०७१ | २९,६८३ | ५६,४०८ | ४०,२६५ | ७०,८३७ | ५६,१४५ | २७,९४३ | १८,५७५ | ११,०७९ |

अशाप्रकारे, कोरोना विरुद्धच्या लढाईत भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने अत्यंत प्रभावीपणे राबवलेल्या अनेक उपययोजनांमुळे प्राथमिक अवस्थेतील यश मिळत असल्याचे दिसुन येत आहे. तरीपण अजूनही निम्मी लढाई बाकी असल्याचे विसरता येणार नाही.

शिवभोजन थाळी योजना : लॉकडाऊन काळातील गोरगरिबांचे अन्नछत्र

महाराष्ट्र शासनाने राज्यात 26 जानेवारी 2020 रोजी शिवभोजन योजनेचा शुभारंभ करून राज्यातील गोरगरीब नागरिकांना 10 रुपयांत शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात आली. पुढे मार्च महिन्यात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गोरगरीब, शेतकरी, मजूर व विद्यार्थी वर्ग उपाशी राहू नये यासाठी शासनाने 5 रुपयात गरजूंना जेवण देण्याचा निर्णय घेतला.[8]त्याचा अनेक असहाय्य गरजवंत व भुकेलेल्या जनतेस लाभ झाला.

महाराष्ट्र शासनाने शिवभोजन योजना सुरु केल्यापासून जानेवारी महिन्यात 79,918 फेब्रुवारीत 4,67,869 तरमार्च महिन्यात 5,78031 नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यानंतर कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र सरकारने लॉकडाऊनघोषित केल्यावर एप्रिलमहिन्यात24,99257,मे मध्ये 33,84,040 तर जून महिन्यात 30,96,232 इतक्या लोकांना'शिवभोजन थाळी' योजनेचालाभ मिळाला. तसेच लॉकडाऊन सुरु झाल्यावर जुलै महिन्यात 30,03,474ऑगस्ट'मध्ये 30,60,319 सप्टेंबर'मध्ये 30,59,176 ऑक्टोबर'मध्ये 31,45,063,नोव्हेंबर'मध्ये 28,96,130डिसेंबर'मध्ये 28,65,943तर 20 जानेवारी 2021 पर्यंत 19,26,054 एवढ्या गरजू नागरिकांना शिवभोजन थाळीचा लाभ मिळाला. अशाप्रकारेशिवभोजन थाळी वितरणाचा विक्रम झाला असून 20 जानेवारी 2021 पर्यंत 3 कोटी नागरिकया योजनेचेलाभार्थी ठरले आहेत.[9] याप्रकारे राज्यातील गरीब,मजूर व कामगार वर्गाला या योजनेचा फायदा होत असल्यामुळे ह्या योजनेचे यश हे ठाकरे सरकारच्या लोकप्रिय कामगिरीत भर टाकणारे आहे. महत्वाचे म्हणजे कोरोना महामारीच्या तीव्रतेच्या काळात रोजगार बुडालेल्या व हातावर


TSS's Smt. V.U. Patil Arts and Late Dr. B.S. Desale Science College, Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

पोट असलेल्या अहाय्य अशा गोरगरीब जनतेसाठी ही शिवभोजन थाळी योजना जीवनदायिनी ठरली असल्याचे दिसते.

देशभर पहिल्या टप्प्यातील लसीकरणाला सुरुवात आणि नवीन कोरोना विषाणूचे आव्हान

नववर्षाच्या सुरुवातीलाच कोरोनाविरुद्ध भारतात जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम सुरू झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने 'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे संतु निरामया'या श्लोकाने प्रारंभ या मोहिमेचा शुभारंभ झाला आणि दिल्लीत मनिष कुमार नामक स्वच्छता कर्मचाऱ्याला देशातील पहिला डोस देण्यात आला.[10]याप्रकारे, गेले दहा महिने सुरू असलेले कोरोनासाथी विरोधातील युद्ध जिंकून कोरोनाला हद्दपार करण्याची सुरुवात देशभरात 16 जानेवारी 2021 पासून झाली. लसीकरणाच्या पहिल्या दिवशी देशभरातील एक लाख सहा हजार कोरोना योद्ध्यांना लसीची पहिली मात्रा देण्यात आली.[11]महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मुंबईतील बीकेसी येथील कोरोना लसीकरण केंद्राचे उद्घाटन होऊन राज्यातील लसीकरणाच्या मोहिमेचा श्रीगणेशा झाला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, कोरोना'वरील लसीकरणाचा कार्यक्रम हे एक क्रांतिकारक पाऊल असले तरी लस घेतल्यानंतर देखील सर्वांनी 'मास्कचा वापर', 'हात धुणे' आणि 'सुरक्षित अंतर' या त्रिसूत्रीचा विसर पडू देता कामा नये.[12] कारण अजूनही कोरोना विषाणू संपूर्णपणे नाहीसा झालेला नसून ब्रिटन व इतर पाश्चिमात्य देशांमध्ये कोरोनाचा नवीन उतपरिवर्तित विषाणू आला असून तो अधिक घातक असल्याचे पुरले मिळाले असल्याची माहिती ब्रिटनचे पंतप्रधान बोरीस जॉन्सन यांनी दिली आहे.या नव्या कोविड -19 विषाणूच्या प्रकाराचा संसर्ग झालेल्या भारतातील लोकांची संख्या 150 वर पोहोचली असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.[13]म्हणून कोरोनावर जरी लस निघाली असली तरी नव्या कोरोना विषाणूचे आव्हान निर्माण झाले असल्याचे दिसते आणि या आपत्तीचे देखील निवारण करण्यासाठी नागरिकांनी शासन निर्देशांचे पालन गरजेचे आहे.

निष्कर्ष

एकंदरीत महाराष्ट्र शासनाने राज्यातील कोरोना महामारीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करीत आज त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर नियंत्रण मिळवल्याचे दिसते. यासाठी महाराष्ट्राचे शासन व प्रशासन यांनी अतिशय चोखपणाने काम केलेले आहे. कोरोना विषाणूचा प्रसार थांबविण्यासाठी कोरोना संशयित रुग्णांना विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले. तर कोरोना बाधित रुग्णांवर आवश्यक वैद्यकीय उपचार करण्याच्या दृष्टीने सरकारने खूप दक्षता घेतल्याचे दिसते. याबरोबरच मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्री यांनी सातत्याने राज्यातील जनतेला कोरोनासंबंधी माहिती देऊन जनतेचस आरोग्य शिक्षणही दिले. त्याचाही सकारात्मक परिणाम जनतेत दिसून आला. तसेच सरकारची महत्वकांक्षी शिवभोजन थाळी योजना लॉकडाऊन काळात गोरगरीब जनतेसाठी अन्नछत्र ठरली. कारण या काळात फक्त पाच रुपयात गोरगरिबांसाठी शिवभोजन थाळी देण्याचा जो निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला होता, त्याचा अनेक गरजू लोकांना त्याचा फायदा झाला. अशाप्रकारे कोरोना महामारीमुळे निर्माण झालेली आपत्ती हाताळत असताना महाराष्ट्र शासनाने केलेले नियोजन व राबविलेल्या उपाय योजना या प्रभावशाली होत्या. त्यामुळेच या कोरोना आपत्तीला हाताबाहेर न जाऊ देता व्यवस्थितपणे हाताळत ती नियंत्रित ठेवणे शक्य झाले. याचे संपूर्ण श्रेय महाराष्ट्राचे शासन व प्रशासन यांचेच आहे, असे म्हणावे लागेल. 16 जानेवारी 2021 पासून संपूर्ण देशासह राज्यात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिम सुरु झाली. तरीदेखील नव्याने आलेल्या नवीन कोरोना विषाणूचा सामना करण्यासाठी राज्यातील जनतेने जागृक राहणे गरजेचे



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी जनतेला कोरोना विषाणूविरूद्धच्या युद्धात जिंकण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेची त्रिसूत्री सांगितली असून त्याचे अनुपालन करणे राज्यातील जनतेचे कर्तव्य आहे. तरच नव्या कोरोनाविषाणूला हद्दपार करणे आपणास शक्य होईल.

संदर्भसूची

1. मार्मिक, दि. 26 डिसेंबर 2020,पृ.19
2. बुलेटिन ऑफ युनिक अकॅडमी, जानेवारी 2019,पृ.9
3. https://www.loksatta.com/mumbai-news/mumbais-dharavi-pattern-for-corona-control-scj-81-2149553/
4. मार्मिक, दि. 26 डिसेंबर 2020,पृ.15
5. कित्ता, पृ.21
6. बुलेटिन ऑफ युनिक अकॅडमी, जानेवारी 2019,पृ.9
7. सकाळ (जळगाव आवृत्ती), दि.२० जानेवारी २०२१, पृ.७
8. https://marathi.abplive.com/news/maharashtra/maharashtra-shiv-bhojan-thali-3-crore-citizens-tasted-shivbhojan-thali-claims-government-854455
9. कित्ता
10. दिव्य मराठी, दि. 17 जानेवारी 2021,पृ.1
11. लोकसत्ता, दि.17 जानेवारी 2021,पृ.1
12. सकाळ, दि.17 जानेवारी 2021,पृ.1
13. लोकसत्ता, दि. 24 जानेवारी 2021, पृ.4

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal


# जणनायक बिरसा मुंडा




डॉ. गजानन रामराव हाणवते

एम.ए., एम.फिल, सेट,पी.एच.डी.,

सहाय्यक आध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद

डॉ. शिवाजी एफ बोथीकर

एम.ए.बी.एड.एम.फील, पी.एच.डी.सेट

डी.आर.के कॉलेज ऑफ कॉमर्स, आझाद चौक, कोल्हापूर

डॉ. सुनिता जी. कांबळे (वनंजे)

एम.ए., बी.एड., पी.एच.डी.,

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

रामदास आठवले कला, वणिज्य, सायन्स महाविद्यालय

चौका. ता.जि. औरंगाबाद



PRINCIPAL

T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &

Late Dr.B.S.Desale Science College

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

# बिरसा मुंडा यांचे कार्य : एक जनआंदोलन

संपादक मंडळ

**प्रा.डॉ.गजानन रामराव हनवते**
एम.ए., एम.फिल, सेट,पी.एच.डी.,
सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद

**डॉ.शिवाजी फ.बोथीकर**
एम.ए., बी.एड., एम.फिल, पी.एच.डी.सेट,
डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स, आझाद चौक, कोल्हापूर

**डॉ.सुनिता जी.कांबळे (वनंजे)**
एम.ए., बी.एड., पी.एच.डी.,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
रामदास आठवले कला, वाणिज्य, सायन्स महाविद्यालय, चौका, ता.जि. औरंगाबाद

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

14

# धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे सांस्कृतिक जीवन

**डॉ. शरद बाबुराव सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक — राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे

**********

**प्रस्तावना**

धुळे व नंदुरबार जिल्ह्यात प्रामुख्याने मैदानी प्रदेशात 'भिल्ल' या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. तर सातपुडा पर्वताच्या सानिध्यातील पहाडी पट्टयात, घनदाट जंगलाच्या भागात प्रामुख्याने 'पावरा' या आदिवासी जमातीचे वस्तीस्थान आहे. यासोबतच 'कोकणी' व इतर काही आदिवासी जमाती या जिल्ह्यांमध्ये वास्तव्य करून आहेत. या आदिवासी समाजाने आजही आपली पारंपारिक संस्कृती जपून ठेवलेली आहे. आदिवासींची दैवते ही त्यांच्या जीवन जगण्याशी निगडित असून निसर्गातील घटक म्हणजेच त्यांची दैवते असतात. आदिवासींची निसर्गाप्रती असलेली कृतज्ञतेची भावना व श्रद्धा यामधूनच त्यांची दैवते निर्माण झालेली आहेत. याबरोबरच आदिवासींचे सण—उत्सव हे देखील निसर्गाला साद घालणारे असतात. त्यामुळे आदिवासी समाजाचे सांस्कृतिक जीवन हे निसर्गाप्रमाणेच विशुद्ध स्वरूपाचे असल्याचे दिसते. त्याचा थोडक्यात वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोधनिबंधात केला आहे.

**आदिवासी परंपरा — वृक्ष व प्राणीपूजा**

आदिवासींच्या धार्मिक परंपरा निसर्ग आणि प्राणी पूजेतून निर्माण झालेल्या आहेत. निसर्गातील अनाकलनीय हे पूजनीय मानण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत वैदिक काळापासून चालत आलेली आहे.



T.S.S's. Smt. V.U.P. Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

आकाश, चंद्र, सूर्य, तारे, ढग, वृक्ष, डोंगर, वाघ, सिंह, साप, विंचू, आकाशात लखलखनारी वीज अशा निसर्गनिर्मित सजीव व निर्जीव वस्तूंची आणि प्राण्यांची आदिवासी लोक पूजा करतात. त्याशिवाय आपल्या पूर्वजांना आणि पितरांनाही देव मानतात. त्यामुळे भूत–पिशाच्च देखील त्यांना देवासारखे वाटतात. आदिवासी समाज हा निसर्गाशी जवळीक साधणारा असून त्यांचे जीवन आणि संस्कृती हे जंगल, डोंगर व दऱ्याखोऱ्यांच्या सानिध्यात अलगदपणे फुलते व बहरते. त्यामुळे आदिवासी संस्कृतीत वेगवेगळ्या वृक्षांना जीवनातील विविध धार्मिक विधीप्रसंगी देव मानून पूजले जाते. वृक्षांप्रमाणेच वाघ, बैल यांची आदिवासी पूजा करतात. 'कोकणी' या आदिवासी जमातीत डोंगर देवाची१ पूजा केली जाते.

**निसर्गाशी निगडीत आदिवासींची दैवते व श्रद्धास्थाने**

**१. निलीचारी**

पावसाळा प्रारंभ होऊन जमिनीवर अंकुरणारे गवत बोटभर वाढल्यावर भिल्ल या आदिवासी जमातीचे लोक निलीचारी पूजनाचा दिवस ठरवितात. पूजेच्या दिवशी प्रत्येक घरातील व्यक्ती पूजेत सहभागी होतात. कारण ही वाऱ्यावर डोलणारी हिरवाई त्यांच्या गाई–गुरांच्या, शेळ्या–मेंढ्यांच्या तोंडाचा घास होण्यापूर्वी निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. भिल्ल लोक हा पूजाविधी करताना निसर्गाप्रती नतमस्तक होऊन आणि धरणी मातेला वंदन करून भूत–प्रेत व मृतात्म्यांना दारूचे अर्ध्य देतात. तसेच नारळ फोडून भूमातेकडून आणि निसर्गाकडून अशाच कृपावर्षावाची कामना करून घरी परत येतात. भिल्ल निलीचारी पुजतात, त्याप्रमाणेच पावरा जमात निलपा या दैवताची पूजा करतात.

**२. वागदेव**

खानदेशातील आदिवासी समाजात वागदेवाची (वाघाची) पूजा केली जाते. धुळे–नंदुरबार जिल्ह्यातील सपाट प्रदेशात राहणारे भिल्ल नारळी पौर्णिमेच्या संध्याकाळी वागदेवाची पूजा करतात. तर नवापूर तालुक्यात पोळ्याच्या दिवशी म्हणजेच चौवरी आमास च्या पूर्वसंध्येला वागदेवाची पूजा केली जाते. आदिवासींचे दैनंदिन जीवन हे कष्टमय आणि जंगल संपत्तीवर अवलंबून असते. त्यांच्या जीवनाचा आधार असलेले पशुधन हे त्यांना रोजच जंगलात चारण्यासाठी घेऊन जावे लागते. जंगलातील वाघ सिंह यासारख्या श्वापदांपासून आपल्या पशुधनाचे संरक्षण व्हावे या भीतियुक्त श्रद्धेतून त्यांनी वाघाला आपले दैवत मानले आहे.

**३. खेतराडचे देव**

वागदेवाच्या पूजेच्या विधीनाट्यनंतर लगेच दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी खेतराडचे देवाची पूजा केली जाते. खेतराडचे देव म्हणून शेता आणि परसबागेत पळसाची किंवा सागाची फांदी रोवून नारळ फोडतात. यामागे आदिवासींचा असा समज आहे की 'वागदेव' (वाघ) फिरत असताना त्याला खेतराडचे देवाचे प्रतिकरुपी पळसाच्या किंवा सागाच्या फांद्या दिसल्यावर इथे आपली पूजा झाली आहे, असे वागदेव समजतो. त्यामुळे तेवढ्या परिसरात तो उपद्रव करीत नाही, अशी आदिवासींची श्रद्धा आहे.

**४. गोवाल देव**

'गोवाल देव' म्हणजे 'श्रीकृष्ण पूजन' होय. गोवाल देव'च्या दिवशी प्रामुख्याने ज्यांच्या घरी गाईगुरे आहेत अशा प्रत्येक व्यक्तीच्या घरी गोठ्यांची पूजा करतात. त्यानंतर गावातील पंचवीस–तीस माणसे, अनुभवी अशा वयोवृद्ध व्यक्तीसोबत जंगलात वनऔषधी शोधायला जातात. पावसाळ्यात गाई–गुरांची खूर सडतात, पोट बिघडते, कधी–कधी सर्पदंश होतो. यावर औषध उपचार करण्यासाठी ही वनऔषधी जंगलातून शोधून आणली जाते.२

वरील सर्व आदिवासींची प्रतीकात्मक मानस दैवते आहेत. प्रत्येक देवतेच्या निर्मितीमागे, त्यांच्या पूजाविधीमागे निश्चित असे प्रयोजन असून आपल्या व पशुधनाच्या संरक्षणासाठी आदिवासी लोक हे सर्व विधी सामूहिक पद्धतीने करतात.

**आदिवासी भिल्ल जमातीच्या कुलदेवता**

यहामोगी उर्फ देवमोगरा, राजापांठो, विनोदेव, गिंबदेव, पांडोर ही भिल्लांची दैवते असून या दैवतांच्या मूर्ती आहेत. या दैवतांमध्ये अस्तंबा हे देखील त्यांचे श्रद्धेय दैवत आहे. त्यांच्या संप्रदायाच्या संदर्भात विचार



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

केल्यास आपमंडळ, भतिजी मंडळ ओ.सी. हे तीन प्रमुख कोणता आहेत. या आपमंडळांचा संदर्भ असणारे 'देवगोवी' हे धडगाव तालुक्यातील एक गावही भिल्लांच्या दृष्टीने श्रद्धास्थान आहे. या कुलदैवतांची व श्रद्धास्थानांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१. याहामोगी उर्फ देवमोगरा**

'याहामोगी' हे केवळ धुळे—नंदुरबार जिल्ह्यातील भिल्लांचीच नव्हे तर गुजरात व मध्यप्रदेश या राज्यातील आदिवासींचे देखील दैवत आहे. याहामोगी'चे मंदिर गुजरात, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील 'तीन खूना' या गावी आहे. या देवतेचा मौखिक परंपरेतून पिढ्यनपिढ्य चालत आलेला खूप प्राचीन इतिहास असून तो महाभारतपूर्व काळाशी जोडलेला आहे. महाभारतपूर्व काळात सातपुड्यातील 'दाब' हे थंड हवेचे स्थळ आदिवासी राज्याचे शक्तिस्थान होते. याहामोगी किंवा देवमोगरा या नावाने ओळखली जाणारी ही देवता नवसाला पावणारी जागृत देवी असल्याची आदिवासींचा श्रद्धा आहे. भिल्ल लोक या देवीला नवस करतात व नवसपूर्ती झाल्यावर देवीला कोंबडी किंवा शेळीचा बळी देतात अथवा जिवंत सोडून देतात. देवीची मूर्ती धान्याच्या कोठीत असून तिच्या एका हातात गाई—गुरांचा कासरा तर दुसर्यात हातात दुधाची चरवी आहे. महाशिवरात्री पासून या देवीच्या यात्रेला प्रारंभ होतो व होळीनंतर रंगपंचमीला या यात्रेची सांगता होते. लोक महाशिवरात्रीचा उपवास करून दोन—दोन दिवस रांगेत उभे राहून याहाचे दर्शन घेतात व उपवासाचे पारणे फेडतात.३

**२. अस्तंबा**

नंदुरबार जिल्ह्यातील भिल्लांचे अस्तंबा हे दैवत असून वैदिक काळात वैदिक वांग्मयात सातपुड्याचा उल्लेख ऋषक म्हणून येतो. या सातपुड्याच्या रम्य वनराईने नटलेल्या सर्वोच्च शिखराला अस्तंबा म्हटले जाते. महाभारतातील आचार्य द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वस्थामा या परिसरात राहतो असा भिल्लांचा समज आहे. यासंदर्भात भिल्लांच्या बोलीभाषेत प्रचलित असलेल्या मौखिक स्वरूपातील दंतकथा व आख्यायिका आहेत. अस्तंबा पूजनाची परंपरा भिल्लांमध्ये कित्येक शतकापासून रूढ आहे. खानदेशातील आदिवासी बांधवांना अस्तंबा श्रद्धेय आणि पूजनीय आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी हे सर्वोच्च शिखर भाविक सर करतात. याहाच्या पूजेला साळ, भगर असे दीर्घकाळ टिकणारे धन नेले जाते तर अश्वत्थाम्याच्या पूजेसाठी शेतातूनच भाताच्या मुठभर रोपाची जुडी तयार करून नेली जाते. भाविक ढोल, डफा'च्या तालावर नाचत गात अस्तंबा'च्या दर्शनाला जातात. अस्तंबा'च्या दर्शनाला फक्त पुरुष जातात. परंतु तेथे जाण्यापूर्वी पाच—सात दिवस पुरुषांना व्रतस्थ राहून ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते. दीपावलीच्या दिवशी अस्तंबाचा पुजारी अश्वत्थाम्याची पूजा करतो. पूजेच्या दिवशी पहाटेच पूजेचे सर्व साहित्य तोरणमाळहून आणले जाते. तोरणमाळशी आदिवासींची अतूट आणि अनामिक श्रद्धा जोडली गेलेली आहे. भिल्लांचे कुलदैवत४ असलेल्या 'याहादेवी'च्या पूजेचे साहित्य देखील तोरणमाळहूनच आणले जाते, असे म्हणतात.

**आदिवासी पावरा जमातीच्या देव—देवता**

पावरा या आदिवासी जमातीत पुढीलप्रमाणे अनेक देव—देवता आहेत. होलका—ऊली, इंदिराजा, बापदेव, गोविदेव, हिव्वारदेव, हुंडोव, गिरहुण, करहण/कणसरी, सीतामाता, कोवदेव, खोवो, खांदिराजा, आठ्ठी, आयखेडा—आयकुट्टी, वीरदाती, वीरदाता, ओछावत, चांदहुरेज, कुंभायराणा, हिव्वारीन, खारीवहायलो, बिजलाकुवर, डुडोद्या, मेंढ्येतारो, वाहत्या बामण, सुहूराणा, खेतरपाल, पांढर माता, राणी काजल इत्यादी. या पावरा जमातीच्या देव—देवतांना मूर्तीचे रुप नसते. तर चिकन दगड गोट्यांना शेंदूर लावून मोकळ्या जागेवर त्यांची स्थापना केलेली असते. त्यामुळे पावरा जमातीच्या देवदेवतांची देवळे किंवा मंदिरे आढळत नाहीत.५

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या प्रत्येक पावरा जमातीच्या घरात 'गिरहुण' म्हणजे कुलदेवता असतेच. अडीच—तीन फुटाचे सागाचे लाकूड जमिनीत रोवले जाते, त्यास ते गिरहुण कुलदेवता मानतात. पावरा लोकांच्या कुळातील रितीरिवाजानुसार कुलदेवतेची स्थापना केलेली असते. काही पावरा कुळातील लोकांच्या चुलीजवळ ही गिरहुण देवता असते. तर काही पावरा कुळातील लोक स्वयंपाक



T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & College Sakri
PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

घरातील भिंतीतील सागाच्या खांबास कुलदेवता मानतात. काही पावरा लोकांची कुलदेवता त्यांच्या कुळातील रिवाजानुसार मधल्या घरात असते. तर काहींच्या दाराजवळ असते. मराठी सण, उत्सव, विवाह आदी समारंभ साजरा करण्यापूर्वी अथवा ग्रामदेवतेची पूजा करण्यापूर्वी या गिरहोन जवळ पणती लावतात. याप्रकारे प्रथम कुलदेवतेच्या पुजेनंतरच पुढील विधीला सुरुवात केली जाते.६ घरात नववधू आल्याबरोबर तिने प्रथम गिरहोण च्याच पाया पडले पाहिजे अशी प्रथा पावरा जमातीत प्रचलित आहे. गिरहोण ला पाया पडल्यापासून नववधूला त्या घरातील सुन म्हणून मान्यता पावते.७

**धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे सण—उत्सव**

धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील 'भिल्ल' या आदिवासी जमातीमध्ये चोवरी आमास (पोळा), नोवाया—दोहरो (नवरात्री—दसरा), दिवाली(दिवाळी), ओली बाय(होळी) हे प्रमुख सण—उत्सव साजरे केले जातात. त्याचप्रमाणे 'पावरा' या आदिवासी जमातीत इंदल, होळी, दिवाळी, पोळा हे सण—उत्सव अनोख्या पद्धतीने साजरे केले जातात. त्यातही होळीच्या सणाला 'पावरा' समाजात अनन्यसाधारण महत्त्व असून हा सण आठवडाभर साजरा केला जातो. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे काही प्रमुख सण उत्सव पुढीलप्रमाणे आहेत.

**१. चोवरी आमास (पोळा)**

कृषी संस्कृतीशी निगडित असणारा व श्रावणी अमावस्येला येणारा बैल पोळा हा सण नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोक उत्साहाने साजरा करतात. पोळ्याच्या दिवशी बैलांना पूर्ण दिवस आराम दिला जातो व त्यांना सजवले जाते. पोळ्याच्या सणाला भिल्ल आदिवासी लोक हंगामातील पहिले पिक म्हणजेच परसबागेत पिकवलेली मकई वाफेवर शिजवून बैलांना नैवद्य म्हणून खाऊ घालतात. कारण या पहिल्या पिकावर त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही हक्क नसतो असे आदिवासी मानतात. याकाळात मकई पिकत आलेली असते व तिचे दाणे पक्व होऊन मकईच्या तुऱ्यांना चंदेरी रंग आलेला असतो. त्याला भिलोरी बोलीत होडा चोवऱ्या असे म्हणतात. त्यावरूनच पोळ्याला चौवरी आमास असे म्हटले जाते.

**२. नोवाया—दोहरो (नवरात्री—दसरा)**

नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल आदिवासी लोक नवरात्रीला नोवाया असे म्हणतात. भिल्ल समाजात असाही समज आहे की, या नवरात्री म्हणजे मंत्र—तंत्र शिकण्या, शिकविण्याचा पर्वकाल आहे. त्यामुळे भिल्ल समाजात याकाळात भीतीचे वातावरण देखील असते. पूर्वी दसऱ्याच्या दिवशी रेडा गावाभोवती फिरवून त्याचा बळी दिला जात असे. आता मात्र ही बळी देण्याची प्रथा नामशेष झाली असली तरी या प्रथेचे प्रतीकात्मक पालन आजही केले जाते. यासाठी गावाभोवती भुई कोहळा फिरवून तो फोडला जातो.

**३. दिवाळी**

धुळे—नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोक दिवाळी हा सण नेमक्या तिथीला साजरा करीत नाहीत. सुगी संपल्यानंतर दिवाळीचा सण ते सवडीने साजरा करतात. त्यांची दिवाळी म्हणजे सोंगाडे नाचवणे होय. नवापूर तालुक्यातील 'सोनारा' 'केवडीपाडा' ह्या सोंगाड्या पार्टी तर नंदुरबार तालुक्यातील लोय ही सोंगाड्या पार्टी प्रसिद्ध आहे. सोंगाड्यांना सुपारी दिली जाते आणि ठरलेल्या दिवशी सोंगाडे येतात. प्रथम सर्व ग्रामदेवतांचा पूजाविधी झाल्यावर सोंगाडे तयार होऊन खुल्या रंगमंचावर येतात आणि रात्रभर सूर्योदय होईपर्यंत नाचतात. एकीकडे सोंगाड्यांच्या या कलास्वादात सारे चिंब भिजत असताना दुसरीकडे लक्ष्मीला प्रसन्न करून घेण्यासाठी 'जुगार' खेळला जातो.

**४. होळी**

होळी हा नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचा सर्वात प्रमुख व महत्त्वाचा सण आहे. आदिवासी भिल्ल जमातीची मूळची होळी ही नंदुरबारच्या अक्कलकुवा तालुक्यातील 'दाब' (मोरीई राह) येथे सर्वप्रथम पेटविली जाते. नंतर अक्राणी तालुक्यातील 'गोवऱ्या' व 'काकरपाटी' येथे बांबूची होळी पेटविली जाते. त्यानंतर 'भगदरी' (पोट्गी), 'काठी' येथे पौर्णिमेच्या रात्री रात्रभर नाचून झाल्यानंतर पहाटे होळी पेटवतात. पौर्णिमेच्या दिवशी नंदुरबारमधील सपाटीच्या भागात रात्री नऊ दहा वाजता 'डांड' पेटवला जातो. भगदरी, काठीच्या होळीनंतर दुसऱ्या दिवशी मोलगी येथील



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

सुप्रसिद्ध होळी पेटवतात. त्यावेळी मेलादा (मेळा) फार उत्साहाने साजरा केला जातो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी जामलीची होळी व मेलादा झाल्यानंतर अक्राणी तालुक्यातील असली, जमान्याची होळी व मेळा साजरा करतात. त्यानंतर अक्राणीतील तनाजा, बुगवाडा या गावांच्या होळ्या व मेलादा फार मोठ्य प्रमाणावर साजरे होतात.८

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींची होळी ही मौज मजा करण्यासाठी असल्याचा दाखला ऐतिहासिक देवदेवतापासून मिळतो. मौखिक इतिहासावरून सातपुड्यातील 'दाब' हे थंड हवेचे ठिकाण 'राजा फानठा' व 'गांडा ठाकूर' या देवतांचे मूळ जन्म ठिकाण आहे. राजा फानठाचे वडील तारहमल, त्यांचा भाऊ पोरबदेव यांना तीन मुली होत्या. त्या तिघींची नावे 'देव–दिवाली तथा रोडाली दिवाली', 'ओली तथा ओली जोगन', व तिसरी 'आगखात्री' असे होते. या तिघी बहिणी तारुण्यसुलभ मजा करणाऱ्या होत्या. या तीन बहिणींपैकी 'दिवाली' व 'ओली' यांच्या लीला चारी खंडात प्रसिद्ध आहेत. याप्रकारे सातपुड्यातील होळी शृंगारिक जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी आहे. होळीचे मूळस्थान नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील दाब (मोरीई राह) हे ठिकाण आहे. तर ओलीच्या आईचे म्हणजेच मामाचे गाव सिंदवाडा (इंद्राई) गुजरात राज्यात आहे. ओलीच्या गोपीलीलांचा महिमा सर्वत्र माहित असून दर्याकिनारी व डोंगर सपाटीवर तिचे जीवन गेलेले आहे. डोंगर भागात काही ठिकाणी होळीला मुलीचा मान दिला जातो. ओली अत्यंत सुंदर, देखणी व तारुण्याने ओथंबून वाहणारी असल्याने ती सर्वांना मोहित करणारी होती. त्यामुळे बहुतेक ठिकाणी तिला मौजमजा करण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. त्यामुळेच आजची होळी साजरी करण्याची पद्धत ही प्रातिनिधिक आहे.९

होळीचा सण म्हणजे आदिवासींचा खरा लोकोत्सव आहे. या उत्सवात मुख्य विधान असते ते होलिका दहनाचे म्हणजेच होळी पेटविण्याचे. आदिवासी भिल्ल जमातीत होळीचा उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा होतो. होळी पेटवायच्या दिवशी संध्याकाळी मुले व मुली घरोघरी होळीची स्वागतपर गिते गाऊन जे मिळेल ते घेतात. मात्र कोणत्याही घराकडून त्यांना रिकाम्या हाती पाठवले जात नाही. होळी पेटवल्यावर कोतवाल दवंडी देतो आणि सगळे गावकरी नटून–थटून ओली (होळी) मातेच्या दर्शनाला जातात. होळीला गुळ, खोबरे डाळ्या, हार कंगन यांचा नैवेद्य अर्पण करतात. दुसऱ्या दिवसापासून होळीचे 'गेर' नृत्य सुरू होते. गेर' हे भिल्लांचे होळीनृत्य आहे तर 'दिंडण' हे मेवास इस्टेटीतील राजेशाही नृत्य आहे. हा नृत्यप्रकार एक वर्षात होतो. हे नृत्य फक्त तळोदा' अक्कलकुवा' धडगाव या तालुक्यातील गावांमध्ये सादर होते. अर्थात तापी नदी ओलांडून हे नृत्य सादर होत नाही.

काठीच्या होळीला पहिला मान असल्यामुळे काठीची राजवाडी होळी पेटविल्या शिवाय दुसऱ्या होळी पेटविल्या जात नाहीत. होळीच्या पाचव्या दिवशी होळी विझवण्याचा विधी केला जातो. त्याला 'डुडुली' असे म्हणतात.१० आदिवासी पट्ट्यात आठ–पंधरा दिवस होळीच्या सणाची धामधूम असते. आदिवासी पावरा समाजात होळी सणाच्या अगोदर गुलाल्या बाजार, भोंगर्या. बाजार आठ–आठ दिवसांनी भारतात. त्यानंतर होळीचा मुख्य सण साजरा होतो. त्यानंतर 'रंगपंचमी', 'मेळादा'चे उत्सव साजरे होतात आणि यानंतर होळी सणाची सांगता होते.

पावरा जमातीचे वास्तव्य असलेल्या परिसरातील काही गावांमध्ये नेहमीचा आठवडे बाजार भरत असतो. मात्र होळी या सणाच्या १५ दिवस अगोदर भरणारा बाजार हा आदिवासींचा 'गुलाल्या बाजार' असतो. या बाजारात आदिवासी लोक होळी सणासाठी लागणारे सामान खरेदी करण्यासाठी येतात. वयस्कर मंडळी या बाजारात एकमेकांच्या कपाळाला गुलाल लावून गळाभेट घेतात व राम राम करतात. म्हणून याला गुलाल्या बाजार असे म्हणतात.

गुलाल्या बाजारानंतर होळीच्या आठ दिवस अगोदरचा आठवडे बाजार भोंगर्या बाजार म्हणून असतो. या बाजारात परिसरातील पावरा लोक आपापल्या गावातील ढोल घेऊन येतात. ज्या गावाचा ढोल वाजवण्याचा पहिला मान असेल तो ढोल मिरवणुकीत अग्रभागी असतो. ढोलाच्या तालावर लोक नाचत असतात व मिरवणूक मंदिराजवळ आल्यावर तेथे प्रथम



T.S.S's. Smt. V.U.P. College Sakri, Dr. B.S. Desale Science, Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

क्रमांकाचा ढोल पोहोचतो. त्यानंतर मानाच्या क्रमानुसार त्या–त्या पाड्यांचे पोलीस पाटील देवळातील देवतांची पूजा करतात. या बाजारात देखील होळीच्या साज सामानाची खरेदी होते.

गुलाल्या बाजार व भोंगर्या बाजारानंतर होळीच्या मुख्य सणाला सुरुवात होते. पावरा जमातीमधील होळी हा सर्वात मोठा सण आहे. आदिवासी पट्ट्यातील सर्व पाड्यांवर होळी पेटवतात. परंतु काही विशिष्ट गावांमध्ये किंवा पाड्यांमध्ये होळी दहनाचा खास आगळावेगळा कार्यक्रम असतो आणि त्यास विशिष्ट अशी पार्श्वभूमी असते. होळी पेटल्यानंतरच्या पाचव्या दिवसापासून आदिवासी पट्ट्यात रंगपंचमीचा उत्सव मोठ्या धामधुमीत सुरू हतो. रंगपंचमीच्या दिवशी आदिवासी लोक एकमेकांच्या अंगावर रंग उधळतात. तसेच एकमेकांना गुलाल व रंग लावून रामराम करून गळाभेट घेतात. वर्षभरातील भांडण–तंटे, हेवे–दावे विसरून रंग उधळण्याचा कार्यक्रमात अबालवृद्ध सामील होतात. रंगपंचमीचा कार्यक्रम दुपारपर्यंत चालतो. त्यानंतर गोट खाण्याच्या (बोकडाचा बळी देऊन त्याच्या शिजवलेल्या मटणाचा प्रसाद सर्वांना वाटणे) कार्यक्रमास सुरुवात होते. होळी'ची सांगता म्हणून प्रत्येक पावरा जमातीच्या पाड्यांवर गोट खाण्याचा कार्यक्रम११ साजरा होतो.

### आदिवासी लोकनृत्य

जगातील बहुतेक राष्ट्रांना लोकनृत्याची समृद्ध व वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. भारतातही आदिवासी जमातींमध्ये व बहुजन समाजात लोकनृत्याची प्रदीर्घ परंपरा आहे. त्याप्रमाणेच महाराष्ट्र राज्यालाही लोकनृत्याची समृद्ध परंपरा असून वेगवेगळ्या भागातील विविध लोकनृत्य त्या–त्या प्रदेशाची विशेषता आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडवतात. आदिवासी समाजातील लोकनृत्य देखील प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहेत. ज्या वाद्यांच्या साथीने ती केली जातात त्या त्या नावाने लोकनृत्य ओळखले जातात. आपल्या खडतर अशा कस्टमय जीवनात नृत्य संगीताच्या धुंदीत आनंद शोधण्याची आदिवासींची जीवनशैली असल्यामुळे निरनिराळे धार्मिक विधी, सामाजिक समारंभ साजरे करण्यासाठी तसेच आनंद आणि शोक व्यक्त करण्यासाठी ते नृत्य करतात. आदिवासींची नृत्ये म्हणजे स्वयंस्फूर्त अंगविक्षेप अथवा उत्स्फूर्त भावनांच्या ओघात तालबद्ध झालेल्या त्यांच्या शारीरिक हालचाली असतात. या तालबद्ध हालचालींमधून त्यांच्या उत्कट भावना आविष्कृत होत असतात. रानावनातील आणि दऱ्याखोऱ्या मधील आदिवासींच्या कष्टमय जीवनात त्यांना करमणुकीची अथवा मनोरंजनाची कुठलीच साधने उपलब्ध नसल्यामुळे ते स्वाभाविकपणे नृत्य संगीतात रमुन आपला आनंद व दुःख व्यक्त करू लागले. त्यामुळे नृत्य आणि संगीत हे आदिवासींच्या जीवनाचे व संस्कृतीचे अविभाज्य अंग बनलेले आहे. या नृत्यांमध्ये देखील त्यांच्या बोलीइतकेच वैविध्य देखील आहे.

नंदुरबार जिल्ह्यात प्रामुख्याने भिल्ल, पावरा आणि कोकणी या आदिवासी जमातींची लोकसंख्या अधिक आहे. शिवाय त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मात्र त्यांची लोकनृत्ये अधिक आकर्षक व मनोहारी असून होलिकोत्सवाची नृत्ये विशेष लोकप्रिय आहेत. प्राप्त परिस्थितीनुसार होलिकोत्सवाच्या नृत्याचे स्वरूप बदलते. सपाट प्रदेशात वास्तव्य असणाऱ्या भिल्लांचे 'गेर नृत्य', मेवास इस्टेटीतील 'डिंडण नृत्य' ही होळी प्रसंगी केली जाणारी उत्सव नृत्ये आहेत. होळीनृत्याचा आणखी एक प्रकार म्हणजे 'बाबाबुध्याचे नृत्य' हा आहे. कोकणा या आदिवासी जमातीचे 'डोंगरदेवाचे नृत्य' विवाहप्रसंगी केले जाते. मृत व्यक्तीच्या उत्तरक्रियेला शोकात्म नृत्ये केली जातात.१२ याशिवाय आदिवासी समाजात प्रसंगपरत्वे केली जाणारी इतरही नृत्ये आढळतात.

### समारोप

आदिवासी समाजाचे संपूर्ण जीवन हे निसर्गाच्या सानिध्यात व्यतीत होत असल्यामुळे आदिवासींच्या संपूर्ण जीवनावर निसर्गाचा प्रभाव दिसतो. त्यामुळे निसर्गातील सजीव–निर्जीव घटकांना देव मानून आदिवासी त्यांना पूजतात. याप्रकारे आदिवासी संस्कृती अतिशय नैसर्गिक जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी निरागस व विलोभनीय संस्कृती असल्याचे दिसते. सात्विक पद्धतीने जीवनाचा आनंद लुटण्याची प्रेरणा देणारे आदिवासींचे सांस्कृतिक जीवन हे मोहक वाटते.



T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

संगीत, नृत्य व समूह भावनेनी ओतप्रोत असलेले आदिवासी समाजाचे सांस्कृतिक जीवन हे विशुध्द कलात्मकतेने भरलेले असून त्यात अश्लीलतेला कुठेच थारा नाही. म्हणून निसंदिग्धपणे असे म्हणता येते की, आदिवासी समाज व त्यांचे निसर्गाच्या सानिध्यातील जीवन हे जंगलातील वृक्ष, वेळी व फुला—फळा सारखेच नाजूक व रसभरीत आहे.

**संदर्भ**

१. पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०११, पृ. १८९—१९१

२. कित्ता, पृ.४२—४५

३. कित्ता, पृ.४५—४८

४. कित्ता, पृ.४८,१९७

५. डी.जी.पाटील, 'पावरा समाज व संस्कृती', भाषा संशोधन — प्रकाशन केंद्र, बडोदा, १९९८, पृ.८८

६. कित्ता, पृ.२४

७. उपरोक्त, पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', पृ.१४६

८. नाहार कंद, 'होळी विशेषांक', 'संपादकीय— होळी बाय रिंगणी डोलाप्यो', मानव मुक्ती ट्रस्ट, मुंबई, १९९७, पृ.६—७

९. गोविंद गारे, 'सातपुड्यातील भिल्ल : ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.५४

१०. उपरोक्त, पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', पृ.४९—५३

११. उपरोक्त, डी.जी.पाटील, 'पावरा समाज व संस्कृती', पृ.१०६—११०

१२. उपरोक्त, पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', पृ.२००—२०२

□□□

T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri,Tal.Sakri,Dist.Dhule